सार्वजनिक उपक्रम समिती

(२०१२-२०१३)

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

महाराष्ट्र शासनाच्या सन २००५-२००६ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील "महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ" यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक एक मधील परिच्छेद १.२८ व प्रकरण क्रमांक चार मधील परिच्छेद क्रमांक ४.१८.६ आणि सन २००६-०७ च्या वाणिज्यिक अहवालातील प्रकरण क्रमांक चार मधील परिच्छेद क्रमांक ४.२६ तसेच महाराष्ट्र शासनाच्या सन २००७-०८ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या वार्षिक अहवालातील "महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित" यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण दोन मधील परिच्छेद क्रमांक २.३.१ ते २.३.१२, "महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित" यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण तीन मधील परिच्छेद क्रमांक ३.७, ३.८ व ३.९ तसेच महाराष्ट्र शासनाच्या सन २००८-२००९ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील "महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनी मर्यादित" यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक चार मधील परिच्छेद क्रमांक ४.७, ४.८ व ४.९ तसेच "महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित" यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण चार मधील परिच्छेद क्रमांक ४.११ यावरील समितीचा

बारावा अहवाल

(दिनांक १७ एप्रिल, २०१३ रोजी विधानसभेस / विधानपरिषदेस सादर केला)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई.

सार्वजनिक उपक्रम समिती

(२०१२-२०१३)

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

महाराष्ट्र शासनाच्या सन २००५-२००६ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील "महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ" यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक एक मधील परिच्छेद १.२८ व प्रकरण क्रमांक चार मधील परिच्छेद क्रमांक ४.१८.६ आणि सन २००६-०७ च्या वाणिज्यिक अहवालातील प्रकरण क्रमांक चार मधील परिच्छेद क्रमांक ४.२६ तसेच महाराष्ट्र शासनाच्या सन २००७-०८ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या वार्षिक अहवालातील "महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित" यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण दोन मधील परिच्छेद क्रमांक २.३.१ ते २.३.१२, "महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित" यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण तीन मधील परिच्छेद क्रमांक ३.७, ३.८ व ३.९ तसेच महाराष्ट्र शासनाच्या सन २००८-२००९ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील "महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनी मर्यादित" यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक चार मधील परिच्छेद क्रमांक ४.७, ४.८ व ४.९ तसेच "महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित" यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण चार मधील परिच्छेद क्रमांक ४.११ यावरील समितीचा

बारावा अहवाल

अनुक्रमणिका

अनुक्रमांक (१)	तपशील (२)	पृष्ठ क्रमांक (३)
प्रस्तावना		
एक	**महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ (लेखा परिक्षा अहवाल २००५-२००६)**	**१**
	१) महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ (२००४-०५) (परिच्छेद क्रमांक १.२८)	
	२) महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ (महामंडळ) (परिच्छेद क्रमांक ४.१८.६)	
चार	**महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ (लेखा परिक्षा अहवाल २००६-२००७)**	
	३) कर्मचाऱ्यांच्या नुकसान भरपाईचे अनियमित प्रदान (परिच्छेद क्रमांक ४.२६)	
तीन	**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित (लेखा परिक्षा अहवाल २००७-२००८)**	
	४) प्रस्तावना (परिच्छेद क्रमांक २.३.१)	
	५) लेखापरीक्षणाची व्याप्ती (परिच्छेद क्रमांक २.३.२)	
	६) लेखापरीक्षणाची उद्दिष्टे (परिच्छेद क्रमांक २.३.३)	
	७) लेखापरीक्षण कसोट्या (परिच्छेद क्रमांक २.३.४)	
	८) लेखापरीक्षणाची पध्दती (परिच्छेद क्रमांक २.३.५)	

अनुक्रमांक (१)	तपशील (२)	पृष्ठ क्रमांक (३)
	९) लेखापरीक्षणाचे निष्कर्ष (परिच्छेद क्रमांक २.३.६)	
	१०) मागणीचे निर्धारण (परिच्छेद क्रमांक २.३.७)	
	११) विजेचे स्त्रोत (परिच्छेद क्रमांक २.३.८)	
	१२) खरेदी पध्दत (परिच्छेद क्रमांक २.३.९)	
	१३) विद्युत खरेदीचे परिमाण व भार नियमन (परिच्छेद क्रमांक २.३.१०)	
	१४) विद्युत खरेदी करार व्यवस्थापन (परिच्छेद क्रमांक २.३.११)	
	१५) स्वस्त स्त्रोतामधून कमी वीज घेणे (परिच्छेद क्रमांक २.३.१२)	
चार	**महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित (लेखा परिक्षा अहवाल २००७-२००८)**	
	१६) निष्फळ खर्च (परिच्छेद क्रमांक ३.७)	
	१७) औष्णिक विद्युत केंद्रामध्ये प्रदान झालेल्या कोळशातून दगड, शेल व इतर सामान काढून टाकण्यासाठीचे कंत्राट (परिच्छेद क्रमांक ३.८)	
	१८) अग्नि प्रतिबंधक उपकरणांची खरेदी (परिच्छेद क्रमांक ३.९)	

अनुक्रमांक (१)	तपशील (२)	पृष्ठ क्रमांक (३)
पाच	**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**	
	(लेखा परिक्षा अहवाल २००८-२००९)	
	१९) वीज देयकांची कमी वसुली	
	(परिच्छेद क्रमांक ४.७)	
	२०) टाळता येण्यासारखा खर्च	
	(परिच्छेद क्रमांक ४.८)	
	२१) वायफळ खर्च	
	(परिच्छेद क्रमांक ४.९)	
सहा	**महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित**	
	(लेखा परिक्षा अहवाल २००८-२००९०९)	
	२२) निष्फळ खर्च	
	(परिच्छेद क्रमांक ४.११)	
सात	**विभागाकडून प्राप्त झालेली माहिती- परिशिष्ट "अ"**	
आठ	**बैठकींचे परिशिष्ट**	

तीन

सार्वजनिक उपक्रम समिती
(२०१२-२०१३)

समिती प्रमुख

१) डॉ. कल्याण काळे, वि.स.स.

सदस्य

२) श्री.संग्राम थोपटे, वि.स.स.
३) श्री.सुभाष धोटे, वि.स.स.
४) श्री.जगन्नाथ शेट्टी, वि.स.स.
५) श्री.कैलास गोरंट्याल, वि.स.स.
६) श्री.दिनानाथ पडोळे, वि.स.स.
७) श्री.शिरीषकुमार कोतवाल, वि.स.स.
८) श्री.पंकज भुजबळ, वि.स.स.
९) डॉ.राजेंद्र शिंगणे, वि.स.स.
१०) श्री.संजय वाघचौरे, वि.स.स.
११) श्री.हनुमंत डोळस, वि.स.स.
१२) ॲड.अशोक पवार, वि.स.स.
१३) श्री.विकास कुंभारे, वि.स.स.
१४) श्री.कृष्णा खोपडे, वि.स.स.
१५) श्री.योगेश सागर, वि.स.स.
१६) श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स.
१७) श्री.एकनाथ शिंदे, वि.स.स.
१८) श्री.चिमणराव पाटील, वि.स.स.
१९) श्री.महादेव बाबर, वि.स.स.
२०) श्री.वसंतराव गिते, वि.स.स.
२१) श्री.संजय दत्त, वि.प.स.
२२) श्रीमती अलका देसाई, वि.प.स.
२३) श्री.राजेंद्र जैन, वि.प.स.
२४) श्री.सतीश चव्हाण, वि.प.स.
२५) डॉ.दिपक सावंत, वि.प.स.
*२६) ॲड.आशिष शेलार, वि.प.स. **(निमंत्रित)**

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

डॉ. अ.ना.कळसे, प्रधान सचिव,
श्री. विलास आठवले, उप सचिव,
श्री. दिलीप येवला, अवर सचिव (समिती),
श्री. अमरनाथ ल.जोशी, कक्ष अधिकारी

*ॲड.आशिष शेलार, वि.प.स. यांची मा.सभापती, विधानपरिषद यांनी निमंत्रित म्हणून दि. ३ जानेवारी, २०१३ रोजी पासून नियुक्ती केली आहे.

प्रस्तावना

मी, सार्वजनिक उपक्रम समितीचा समिती प्रमुख, समितीने अधिकार दिल्यावरुन महाराष्ट्र शासनाच्या सन २००५-२००६ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील "महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ" यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक एक मधील परिच्छेद १.२८ व प्रकरण क्रमांक चार मधील परिच्छेद क्रमांक ४.१८.६ तसेच सन २००६-०७ च्या वाणिज्यिक अहवालातील प्रकरण क्रमांक चार मधील परिच्छेद क्रमांक ४.२६ तसेच महाराष्ट्र शासनाच्या सन २००७-०८ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या वार्षिक अहवालातील "महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित" यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण दोन मधील परिच्छेद क्रमांक २.३.१ ते २.३.१२, "महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित" यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण तीन मधील परिच्छेद क्रमांक ३.७, ३.८ व ३.९ तसेच महाराष्ट्र शासनाच्या सन २००८-२००९ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील "महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनी मर्यादित" यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक चार मधील परिच्छेद क्रमांक ४.७, ४.८ व ४.९ तसेच "महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित" यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण चार मधील परिच्छेद क्रमांक ४.११ यावरील समितीचा बारावा अहवाल (बारावी महाराष्ट्र विधानसभा) सादर करीत आहे.

"महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ" यांच्याकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनावर लघु व मध्यम उद्योग विभागाचे सचिव, श्रीमती राधिका रस्तोगी तसेच "महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाचे" व्यवस्थापकीय संचालक, श्री.जे.पी.गुप्ता यांची समितीने दिनांक ६ फेब्रुवारी, २०१३ रोजी साक्ष नोंदवून घेतली.

"महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित" यांच्याकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनावर उद्योग ऊर्जा कामगार विभाग (ऊर्जा) विभागाचे अतिरिक्त प्रधान सचिव तथा महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित" यांचे व्यवस्थापकीय संचालक, श्री. अजय मेहता व "महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित" यांचे व्यवस्थापकीय संचालक, श्री.चंद्रकांत थोटवे यांची दिनांक २५ सप्टेंबर, २०१२ व दिनांक २८ फेब्रुवारी, २०१३ रोजी समितीने साक्ष नोंदवून घेतली.

"महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित" यांच्याकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनावर उद्योग ऊर्जा कामगार विभाग (ऊर्जा) विभागाचे अतिरिक्त प्रधान सचिव तथा महाराष्ट्र

राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित" यांचे व्यवस्थापकीय संचालक, श्री. अजय मेहता व "महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित" यांचे व्यवस्थापकीय संचालक, श्री.अरविंद सिंह यांची दिनांक २९ जानेवारी, २०१३ व दिनांक २७ फेब्रुवारी, २०१३ रोजी समितीने साक्ष नोंदवून घेतली.

श्रीमती पुनम पांडे, प्रधान महालेखाकार, श्री.पी.एन. शेषाद्री, महालेखाकार, श्रीमती आर.राजलक्ष्मी, उप महालेखाकार, श्री.आर.वेंकटरमन, उप महालेखाकार, तसेच श्री.एस.व्ही. खेडकर, वरिष्ठ लेखा अधिकारी (वाणिज्यिक लेखा परिक्षक) यांनी निमंत्रणानुसार समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीला केलेल्या मार्गदर्शनाबद्दल समिती त्यांचे आभार मानते. तसेच महाराष्ट्र लघु व मध्यम उद्योग विभागाच्या सचिव, श्रीमती राधिका रस्तोगी, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ यांचे व्यवस्थापकीय संचालक श्री.जे.पी.गुप्ता तसेच उद्योग, ऊर्जा व कामगार (ऊर्जा) विभागाचे अतिरिक्त प्रधान सचिव तथा महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांचे व्यवस्थापकीय संचालक श्री.अजय मेहता, "महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित" यांचे व्यवस्थापकीय संचालक, श्री. चंद्रकांत थोटवे, तसेच महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित यांचे व्यवस्थापकीय संचालक, श्री.अरविंद सिंह यांनी समितीला दिलेल्या संपूर्ण सहकार्याबद्दल समिती त्यांचे आभार मानते.

समितीने मंगळवार, दिनांक ९ एप्रिल, २०१३ रोजी झालेल्या बैठकीत या अहवालावर विचार करुन तो काही सुधारणांसह संमत केला.

विधान भवन,
मुंबई,
दिनांक : ९ एप्रिल, २०१३

डॉ. कल्याण काळे
समिती प्रमुख,
सार्वजनिक उपक्रम समिती.

महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ (२००४-०५)

एक : १.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००५-२००६ च्या (वाणिज्यिक) अहवालातील प्रकरण क्रमांक १ मधील परिच्छेद क्रमांक १.२८ मध्ये महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ (२००४-०५) या संदर्भात महालेखाकारांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले आहेत.

व्याज व वित्तीय खर्चामध्ये भारतीय लघु उद्योग विकास बँकेने मागणी केलेले दंडात्मक व्याज रुपये २.३० कोटी, मुंबई महानगर क्षेत्रीय विकास प्राधिकरण करणाऱ्या लघु मुदत कर्जावर देय असलेले व्याज रुपये २८.०१ कोटी व सब व्हेन्शन कर्जावर महाराष्ट्र शासनाचा देय असलेल्या रुपये ९.१५ कोटी व्याजाचा समावेश करण्यात आला नव्हता, त्यामुळे खर्च तोटा रुपये ३९.४६ कोटीने कमी दाखविण्यात आला होता.

१.२ या प्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करताना असे नमूद केले आहे की, महामंडळ आपले सर्व लेखे "रोखे पध्दतीने" तयार करीत असल्यामुळे त्यात महामंडळास देय झालेल्या व न दिलेल्या व्याजाचा तसेच महामंडळास कर्जदाराकडून येणे असलेल्या व्याजाच्या रकमेचा अंतर्भाव करता येत नाही.

सिडबीने महामंडळाच्या विरोधात पुनर्वित्त कर्जवसुलीसाठी कोर्टात ३१३ कोटी रुपयांचा दावा दाखल केला आहे. वरील ३१३ कोटी रुपयांच्या दाव्यामध्ये रु. २.३० कोटी दंडात्मक व्याजाचा अंतर्भाव केला आहे. महामंडळाने त्याबाबत आपले प्रतिज्ञापत्र न्यायालयास सादर करुन सिडबीने दाखल केलेला ३१३ कोटी रुपयांचा दावा अमान्य केला आहे. सदरचा दावा अजून न्यायप्रविष्ठ आहे.

मुंबई महानगर विभाग क्षेत्र प्राधिकरणास देय असलेल्या मुद्दल व व्याजाच्या रकमेबाबत मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दि. ३.१०.२००२, ११.५.२००४ व २१.२.२००५ रोजी झालेल्या आढावा बैठकांमध्ये ठरल्याप्रमाणे महामंडळाने सदर प्राधिकरणास देय असलेल्या रकमेची शासनाच्या अर्थसंकल्पात तरतूद करुन देण्याबद्दलच्या सुचना देण्यात आल्या आहेत. परंतु शासनाने अर्थसंकल्पामध्ये याबाबत अजून तरतूद न केल्यामुळे प्राधिकरणास देय असलेली रक्कम अदा करण्यात आलेली नाही.

शासनाने लाभांश देण्यासाठी दिलेल्या अर्थसहाय्यापैकी महामंडळाद्वारे शासनास ९.२३ कोटी रुपये मुद्दलाची रक्कम देय आहे. शासनाने लाभांशापोटी दिलेल्या अर्थसहाय्याच्या अटींमध्ये द्यावयाच्या व्याजाच्या दराचा अंतर्भाव असला तरी वित्तीय महामंडळ कायदा १९५१ मध्ये लाभांशापोटी शासनाकडून

मिळालेल्या अर्थसहाय्याची रक्कम परत करण्याबद्दलचे नियम ठरवून दिलेले नाहीत. महामंडळाने वरील अर्थसहाय्यावर शासनाने व्याज घेऊ नये म्हणून शासनास पत्रांद्वारे विनंती केली आहे.

१.३ शासनाने महामंडळाच्या खुलाश्यावर 'महामंडळाच्या पुनरुज्जीवन व पुर्नबांधणीचा निर्णय अद्याप प्रलंबित आहे.' असे म्हटले आहे.

१.४ महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ व लघु व मध्यम उद्योग विभाग यांच्याकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने लघु व मध्यम उद्योग विभागाच्या सचिव तसेच महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ यांचे व्यवस्थापकिय संचालक व इतर अधिकारी यांची बुधवार, दिनांक ६ फेब्रुवारी, २०१३ रोजी साक्ष घेतली. व्याज व वित्तीय खर्चामध्ये भारतीय लघु उद्योग विकास बँकेने मागणी केलेले दंडात्मक व्याज तसेच मुंबई महानगर क्षेत्रीय विकास प्राधिकरणाने लघु मुदत कर्जावर देय असलेले व्याज व सब व्हेन्शन कर्जावर महाराष्ट्र शासनाला देय असलेल्या व्याजाचा समावेश वित्तीय महामंडळाकडून देण्यांत आलेल्या ताळेबंदामध्ये नव्हता त्यामुळे खर्च व तोटा कमी दाखविण्यात आला होता, असा महालेखाकारांनी आक्षेप नोंदविला होता. यासंबंधाने अधिक स्पष्टीकरण करण्याविषयी समितीने सांगितले असता, विभागाच्या प्रधान सचिवांनी सांगितले की, यापूर्वी महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळामध्ये केवळ निव्वळ जमा रकमेनुसार लेखे तयार केले जात होते, परंतु त्यामध्ये आता बदल करण्यात आला असून मर्कंटाईल पध्दतीने लेखे तयार केले जातात. याबाबत अधिक स्पष्टीकरण करतांना महामंडळाचे व्यवस्थापकिय संचालक यांनी सांगितले की, महालेखाकारांनी आक्षेप घेतल्यानंतर दोन वर्षाच्या कालावधीनंतर आता मर्कंटाईल पध्दतीने लेखे तयार करण्याची पध्दत अनुसरण्यात आलेली आहे. चालू वार्षिक वर्षाचे लेखे तयार करतांना त्यामध्ये सुधारित पध्दत अवलंबिण्यात आलेली आहे. वित्तीय महामंडळ अनेक वर्षापासून तोट्यात सूरु असून महामंडळावर व्याजाची मोठी जबाबदारी आहे. सिडबी किंवा महाराष्ट्र शासनाच्या देयकांत प्रथम ही जबाबदारी दाखविली जात होती. त्यामुळे महालेखापालांनी काढलेला आक्षेप वित्तीय महामंडळास मान्य आहे. याबाबत सिडबीने महामंडळाच्या विरोधात न्यायालयात दावा दाखल केला होता व दाखल केलेल्या दाव्याच्या वरती दंडात्मक व्याजाचा अंतर्भाव केला होता. यासंबंधी अधिक स्पष्टीकरण करण्याविषयी समितीने सांगितले असता, व्यवस्थापकिय संचालक यांनी सांगितले की, याप्रकरणी महामंडळाने न्यायालयात आपले म्हणणे मांडलेले असून दाव्यातील रकमेसंबंधी मतभिन्नता आहे. सिडबीला देणे आहे ही वस्तुस्थिती महामंडळास मान्य आहे व मुख्यत्वे रिकन्सिलिएशनचा प्रश्न आहे. महामंडळाने प्राधिकरणास देय असलेल्या रकमेची तरतूद अर्थसंकल्पामध्ये करण्यासाठी शासनाला विनंती केली होंती परंतु शासनाने सदर विनंती मान्य केलेली नाही. सध्या महामंडळाकडे खेळते भागभांडवल नाही. १७८ कोटी रुपयांच्या मुळ रकमेची व सातशे ते

आठशे कोटी रुपयांच्या रकमेची वसुली करावयाची आहे. सन २००३-०४ मध्ये शासनाने मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चाधिकार समिती नेमली होती. त्या समितीमध्ये शासनाचे व सिडबीचे प्रतिनिधी होते. समितीने यासंबंधी सन २००५ मध्ये आपला अहवाल शासनाला सादर केला. त्यामध्ये महामंडळाचे पुर्नरुज्जीवन करणे शक्य नसून महामंडळ बंद करावे लागेल असा अभिप्राय व्यक्त केला होता व सदर अभिप्रायानुसार महामंडळ बंद करण्याची प्रक्रिया सुरु झाली आहे असेही व्यवस्थापकिय संचालक यांनी स्पष्ट केले. महामंडळ बंद करण्याच्या प्रक्रियेला विधि व न्याय विभागाचे मत घ्यावे लागेल. सध्या सिडबीच्या दाव्याचा प्रश्न शिल्लक असून शासनाने आगामी काळात याविषयासंबंधी चर्चेकरीता बोलाविलेल्या बैठकीमध्ये सदर प्रश्न मार्गी लागण्याची शक्यता आहे असेही त्यांनी चर्चेच्या शेवटी स्पष्ट केले.

१.५ अभिप्राय व शिफारशी :-

याप्रकरणी समितीला मिळालेली लेखी माहिती व साक्षीच्या वेळी मिळालेल्या माहिती यावरुन असे दिसून येते की, व्याज व वित्तीय खर्चामध्ये भारतीय लघु उद्योग विकास बँकेने मागणी केलेले दंडात्मक व्याज तसेच मुंबई महानगर क्षेत्रीय विकास प्राधिकरणाने लघु मुदत कर्जावर देय असलेले व्याज व सब व्हेन्शन कर्जावर महाराष्ट्र शासनाला देय असलेल्या व्याजाचा समावेश वित्तीय महामंडळाकडून देण्यांत आलेल्या ताळेबंदामध्ये केलेला नव्हता. त्यामुळे खर्च व तोटा कमी दाखविण्यात आला होता, असा महालेखाकारांनी आक्षेप नोंदविला होता. याबाबत साक्षीच्या वेळी समितीसमोर आलेल्या माहितीनुसार महालेखाकारांनी घेतलेला आक्षेप विभागाला व महामंडळ स्तरावर देखील मान्य होता. त्यानुसार काही कालावधीनंतर नवीन पध्दतीनुसार लेखे तयार करण्यास महामंडळाने सुरुवात देखील केली. यामुळे अचूक खर्चाचे विवरण मिळणे सहज शक्य झाले. त्यामुळे सिडबी या संस्थेला देय असलेल्या रकमेबाबत त्यांनी न्यायालयात केलेल्या दाव्यानुसार महामंडळाने आपले म्हणणे न्यायालयामध्ये सादर देखील केले होते परंतु मुळ रकमेतील तरतुदीसंबंधी दोन्ही पक्षकारांमध्ये मतभिन्नता असल्यामुळे याबाबत अद्यापही न्यायालयीन प्रक्रियेमध्ये निर्णय झालेला दिसून येत नाही. सिडबीला देणे बाकी असल्याचे महामंडळाने देखील मान्य केले आहे. **त्यामुळे बैठकीमध्ये सूचित केल्यानुसार शासनस्तरावर यासंबंधी बोलविण्यात आलेल्या आगामी बैठकीमध्ये महामंडळाचे आर्थिक नुकसान होणार नाही यादृष्टीने चर्चा करुन निर्णय घ्यावा व सदर निर्णय झाल्यानंतर महामंडळ बंद करावे किंवा कसे याबाबतचा योग्य तो निर्णय विधि व न्याय विभागाचे मत घेऊन अंमलात आणावा व याप्रकरणी करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांच्या आत कळविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

दोन : २.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००५-२००६ च्या (वाणिज्यिक) अहवालातील प्रकरण क्रमांक ४ मधील परिच्छेद क्रमांक ४.१८.६ मध्ये महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ यांच्या कामकाजासंदर्भात महालेखाकारांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले आहेत.

महाराष्ट्र राज्यातील लहान व मध्यम श्रेणीतील उद्योगांना वित्तीय सहाय्य पुरविण्याकरिता महामंडळाची स्थापना करण्यात आली होती.

महामंडळाच्या कार्यचालनावरील खर्च कार्यचालनातून प्राप्त झालेल्या उत्पन्नापेक्षा १९३.६३ टक्क्यांनी जास्त होता. अव्यवहार्य प्रकल्पांना कर्जे मंजूर करण्यात आली होती. पूरेसे तारण न घेताच निधीचे वितरण केल्यामुळे कर्जदार कर्जाची परतफेड करतांना हलगर्जीपणा करण्यास प्रवृत्त झाले.

थकबाकी वसूल करण्यात ढिलेपणा झाला व ती वसूल करण्यासाठी कायदेशीर कारवाई करण्यास महामंडळ अपयशी ठरले. वसुलीतील दुबळेपणामुळे पुन्हा नवीन उसनवारी देण्यासाठी निधी उपलब्ध होऊ शकला नाही. गेल्या तीन वर्षात कर्जाचे वितरण फारच नगण्य झाले. अंतिम रुप देण्यात आलेल्या वर्ष २००५-०६ च्या अद्ययावत लेख्यानुसार महामंडळाचा संचित तोटा रुपये ६१४.९७ कोटी एवढा होता व तो भरणा झालेल्या भाग भांडवलाच्या (रुपये ६२.६४ कोटी) म्हणजेच नऊपट एवढा जास्त होता.

(ही बाब शासनाला / व्यवस्थापनाला कळविण्यात आली (मे २००६) होती. त्याचे उत्तर मिळाले नव्हते. (डिसेंबर २००६))

२.२ या प्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करताना असे नमूद केले की, महामंडळाने सुरुवातीपासून आतापर्यंत २४७३ कोटी रुपयांचे कर्ज वितरण केले आहे. ही कर्जे प्रामुख्याने राज्याच्या मागास तसेच अविकसित भागात व पहिल्या पिढीतील उद्योजकांना दिली आहेत. महामंडळाने सुरुवातीपासून ३१.३.२००६ पर्यंत एकूण २१४० कोटी रुपयांची कर्ज वसुली केली आहे व ३३३ कोटी रुपयांचे कर्ज वसुल करावयाचे बाकी होते. महामंडळाच्या सततच्या पाठपुराव्यामुळे महामंडळाने गेल्या ५ वर्षात, कित्येक उद्योगघटक संपूर्णतः व काही अंशतः खेळते भांडवल न मिळाल्यामुळे, शासनाकडून वेळेत अंशदान न मिळाल्याने, वीजेचा तुटवडा इत्यादि करणामुळे बंद असतांना देखील एकूण ७६५ कोटी रुपयांची कर्जवसुली केली आहे. यावरुन असे दिसून येईल की बिकट परिस्थितीत देखिल महामंडळाने वर उल्लेखिलेली कर्जवसुली करुन दाखविली आहे. वीजमंडळ, विक्रीकर, अबकारी कर इ. पोटी असलेल्या थकबाकी महामंडळाच्या थकबाकीच्या आधी वसूल केल्या

जात असल्यामुळे महामंडळाच्या ताब्यात असलेल्या उद्योगघटकांना खरेदी करण्यासाठी मागणी नसल्यामुळे कर्जवसुलीत घट होत गेली व उद्योगघटक ताब्यात घेऊन ते विकणे दुरापास्त झाले आहे.

महामंडळाने सिडबीने ठरवून दिलेल्या नियमावलीनुसार उद्योगघटकांना कर्जे मंजूर केली आहेत. काही अपवाद वगळता, महामंडळाने कर्जे वाटप करतांना सिडबीने ठरवून दिलेल्या नियमांप्रमाणे योग्य ती प्रतिभूति असल्याची खातरजमा करुनच कर्जवाटप करण्यात आले आहे. जागतिकिकरणामुळे व उदारमतवादामुळे लधुउद्योगांवर झालेला विपरित परिणाम, आयात कराव्या लागणाऱ्या मालावर आयात करात सुट, लघुउद्योग क्षेत्रासाठी राखून ठेवलेल्या वस्तुंच्या यादीत झालेली घट इत्यादि कारणामुळे लघुउद्योगघटकांवर विपरित परिणाम होऊन व त्यामुळे उद्योगघटकांचा नफा कमी झाल्यामुळे ठरवून दिलेल्या मुदतीमध्ये ते कर्ज परतफेड करु शकले नाहीत, त्यामुळे अनुत्पादित मालमत्तेत वाढ झाली. मार्च २००६ अखेर अनुत्पादित उद्योगघटकांचे प्रमाण हे ९५% टक्के होते. महामंडळाने वसुलीसाठी उपलब्ध असलेल्या सर्व तरतुदीचा तसेच कायदेशीर कारवाईंचा वापर केल्यामुळेच अनुत्पादित उद्योगघटकांकडून मागील ५ वर्षात ७६५ कोटी रुपयांची कर्जवसुली करु शकली, तसेच महामंडळाने वेळोवेळी अंमलात आणलेल्या एक रकमी कर्ज परतावा योजनेमुळे कसुरदार उद्योगघटकांकडून कर्जवसुली करणे शक्य झाले आहे. त्यामुळे महामंडळ महालेखाकारांच्या आक्षेपाशी सहमत नाही.

महामंडळाचा कार्यचालनावरील खर्च कार्यचालनातून प्राप्त झालेल्या उत्पन्नापेक्षा १९३.६३ टक्क्यांनी ३१.३.२००६ संपलेल्या आर्थिक वर्षात जास्त नसून तो ३१.३.२००५ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाकरीता होता. परंतू त्या खर्चामध्ये बंधपत्रधारकांना व्याजापोटी दिलेल्या ६२७५.५८ लाख रुपयाचा समावेश आहे. ३१.३.२००६ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षात खर्चाचे प्रमाण हे ११३.४० टक्के होते, परंतू त्यामध्ये बंधपत्रधारकांना व्याजापोटी दिलेल्या ३८७९.९४ लाख रुपयाचा अंतर्भाव होता.

महामंडळाने आस्थापनांवरचा खर्च कमी करण्यासाठी काही शाखा व विभागीय कार्यालये बंद केली आहेत. अनेक अधिकारी व कर्मचाऱ्यांना "स्वेच्छा निवृत्ती" देऊन आस्थापनांवरील खर्च सिमित केला आहे. २००२-०३ या वित्तीय वर्षात आस्थापनांवरील झालेला एकूण २७.२८ कोटी रुपये खर्च २००५-०६ या वित्तीय वर्षात महामंडळाने उचललेल्या योग्य पावलांमुळे ९.६० कोटी रुपयांपर्यंत खाली आणला आहे. आस्थापनांवरील खर्चामधील ही घट सुमारे ६५% आहे.

महामंडळाची मालमत्ता व देणी यामध्ये प्रचंड तफावत असल्यामुळे महामंडळाने कर्जे मंजूर करणे बंद केली आहेत. या बाबतीत शासनाकडून मदत मिळाली असती व सिडबीकडून कमी व्याज दरात पुनर्वित्त कर्जपुरवठा झाला असता तर महामंडळाने कर्जमंजूरी चालू ठेवली असती.

महामंडळाचा मार्च २००६ अखेर असलेल्या ६१४.९७ कोटी रुपयांच्या संचित तोट्यामध्ये अनुत्पादित उद्योगधटकांसाठी (NPAs) सिडबीने ठरवून दिलेल्या निर्देशाप्रमाणे केलेल्या ३०४.५७ कोटी रुपयांच्या तरतूदीचा (Provisions) अंतर्भाव आहे.

२.३ शासनाने महामंडळाच्या अभिप्रायाशी सहमती दर्शविली आहे.

२.४ शासनाकडून व महामंडळाकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने लघु व मध्यम उद्योग विभागाच्या सचिव तसेच महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ यांचे व्यवस्थापकिय संचालक व इतर अधिकारी यांची बुधवार, दिनांक ६ फेब्रुवारी, २०१३ रोजी साक्ष घेतली. महाराष्ट्र राज्यातील लहान व मध्यम श्रेणीतील उद्योगांना वित्तीय सहाय्य पुरविण्याकरिता वित्तीय महामंडळाची स्थापना करण्यात आली होती. परंतु, महामंडळाच्या कार्यचालनावरील खर्च कार्यचालनातून प्राप्त झालेल्या उत्पन्नापेक्षा १९३.६३ टक्क्यांनी जास्त होता तसेच अव्यवहार्य प्रकल्पांना कर्जे मंजूर करण्यात आली होती. पर्यायाने कर्जाची वसूल होऊ शकली नाही असा महालेखाकाराने परिच्छेदामध्ये आक्षेप नोंदविला होता. यासंबंधी अधिक स्पष्टीकरण करण्याविषयी समितीने सांगितले असता, महामंडळाचे व्यवस्थापकिय संचालक यांनी सांगितले की, सन २००४-०५ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालामध्ये महामंडळाचे उत्पन्न २४ कोटी व ७१ कोटी खर्च दाखविलेला आहे. ७१ कोटीमध्ये एसएलआर बॉन्डच्या व्याजाची रक्कम समाविष्ट होती व त्यामध्ये ६३ कोटी व्याज दाखविले होते. महालेखाकारांनी सन २००३-०४ या वर्षाच्या अहवालानुसार खर्चाचे प्रमाण काढले आहे. त्यामुळे सदर रकमेत वाढ झाल्याचे दिसत आहे. प्रत्यक्षात प्रशासकिय खर्च कमी झालेला आहे. ६३ कोटी रुपयांची महामंडळावर कमिटेड लायबिलिटी होती. ती वजा केली असता १८ कोटी ८० लाख रुपये शिल्लक राहतात. महामंडळाने ९० साली एसएलआर बॉन्ड इश्यू केले होते. या बॉन्डचे लोकांना दरवर्षी व्याज द्यावे लागते. बॉन्डची मुदत आता संपलेली असल्यामुळे महामंडळ या जबाबदारीतून मुक्त झाले आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

महामंडळाने १९९५-९६ मध्ये एक नवीन योजना सुरु केली होती त्यामध्ये पुरेसे तारण न घेता लाभार्थ्यांना कर्ज दिले होते. या मुद्यांसंबंधी लोकलेखा व सार्वजनिक उपक्रम समितीच्या बैठकीमध्ये चर्चा झाली असून विभागाने योग्य कार्यवाही करावी अशी शिफारस समितीने केली होती, त्यानुसार त्यावेळी जबाबदार असलेले अधिकारी आता सेवानिवृत्त झालेले आहेत. काही कर्मचाऱ्यांनी स्वेच्छानिवृत्ती घेतली आहे. महामंडळाच्या अटी व शर्तीनुसार ते महामंडळाचे कर्मचारी नसल्यामुळे त्यांच्याविरुध्द कार्यवाही करता येणे शक्य नाही. मात्र, वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बाबतीत शासनाकडे अहवाल सादर केलेला आहे.

याबाबत अधिक स्पष्टीकरण करतांना विभागाच्या सचिवांनी सांगितले की, एसएलआर बॉन्डची हमी शासनाकडून दिली जाते. याबाबत एमएसएफसीने काढलेल्या बॉन्डच्या व्याजाची रक्कम राइट ऑफ करावी असा प्रस्ताव वित्त विभागाकडे सादर केला होता. वित्त विभागाने यासंबंधी उपस्थित केलेल्या मुद्यासंबंधी माहिती सादर करणे अशक्य होते. महामंडळाला सोसावा लागणारा भूर्दंड व व्याज माफ करावे यासाठी जानेवारी महिन्यापासून महामंडळामार्फत प्रयत्न सुरु आहेत. परिणामी महामंडळावरील आर्थिक जबाबदारी स्पष्ट होत नाही व काही गोष्टीचे समर्थनही करता येत नाही. वसुलीसाठी दोन वर्षे महामंडळ सुरु ठेवण्यात आले होते. आता यामध्ये त्यांच्या लेख्यामध्ये सुधारणा होणार नाही. त्यामुळे महामंडळ चालू ठेवल्यास तोटा होईल किंवा कसे याबाबत सद्यस्थितीत सांगणे कठिण आहे. यासंबंधीचा प्रस्ताव सादर केला असून त्यासंदर्भात निर्णय प्राप्त झाल्यानंतर पुढील योग्य ती कार्यवाही केली जाईल असे त्यांनी स्पष्ट केले. महालेखाकारांच्या आक्षेपासंबंधाने अधिक स्पष्टीकरण देतांना महामंडळाच्या व्यवस्थापकिय संचालकांनी सांगितले की, ८०० केसेस न्यायालयात प्रलंबित आहेत. मागील वर्षामध्ये ४० कोटी रुपयांची वसुली झाली असून वसुली व्हावयाच्या प्रत्येक प्रकरणात वसुली करण्यास वाव आहे असे आत्ताच सांगणे कठिण आहे. न्यायालयीन प्रकरणात बराच कालावधी जातो त्यामुळे ह्या प्रकरणांचा निकाल लागून वसुलीसाठी किती कालावधी लागेल हे आता सांगता येणे कठिण आहे. शासनाने वसुलीकरीता ३१ मार्च, २०१२ हा वेळ दिलेला होता. अजूनही वसुलीसाठी किती वाव आहे याचा अभ्यास करुन वसुलीसाठी प्रयत्न करण्यात येतील, असे स्पष्ट केले. याबाबत समितीने विचारले की, शासनाने हमी शुल्क माफ केले आहे काय? यावर उत्तर देतांना व्यवस्थापकिय संचालक यांनी शासनाने हमी शुल्क माफ केले नसल्याचे सांगितले. महामंडळाकडे उपलब्ध असलेल्या विभागीय कार्यालय व इतर ठिकाणातील कर्मचारी वर्ग कमी होत असून कर्मचाऱ्यांना वेतन देखील पाचव्या वेतन आयोगाप्रमाणे देण्यात येते. महामंडळाला विधीविषयक कामांसाठी मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागतो, असे शेवटी स्पष्ट केले.

२.५ अभिप्राय व शिफारशी :-

महाराष्ट्र राज्यातील लहान व मध्यम श्रेणीतील उद्योगांना वित्तीय सहाय्य पुरविण्याकरिता वित्तीय महामंडळाची स्थापना करण्यात आली होती. परंतु, महामंडळाच्या कार्यचालनावरील खर्च कार्यचालनातून प्राप्त झालेल्या उत्पन्नापेक्षा १९३.६३ टक्क्यांनी जास्त होता. तसेच अव्यवहार्य प्रकल्पांना कर्जे मंजूर करण्यात आली होती. पर्यायाने कर्जाची वसूल होऊ शकली नाही असा महालेखाकाराने परिच्छेदामध्ये आक्षेप नोंदविला होता. याबाबत समितीला साक्षीच्यावेळी असे दिसून आले की, महामंडळ स्तरावरील

कामकाज पूर्णपणे बंद असून देखील फक्त वसुलीच्या रकमेसाठी अधिकारी व कर्मचारी यांच्या नेमणूका केलेल्या आहेत. वसुल व्हावयाच्या रकमेपैकी बरीचशी वसुली ही नियमबाह्य कर्जे दिल्यामुळे न्यायालयीन प्रकरणात अडकल्याचे दिसून आले. परिणामी न्यायालयीन प्रकरणासाठी महामंडळाला खर्च करावा लागत असतो. प्रशासनावर देखील सद्य:स्थितीत खर्च करावा लागत असतो. मात्र उत्पन्नाचे साधन काहीही नाही. यापूर्वी सन १९९५-९६ मध्ये लाभार्थ्यांना दिलेल्या कर्जाच्या रकमेबाबत सार्वजनिक उपक्रम समिती तसेच लोकलेखा समितीने देखील कार्यवाही करण्याबाबत विभागाकडे शिफारस केली होती. यासंबंधात दिलेल्या उत्तरानुसार सेवानिवृत्त झालेले कर्मचारी व स्वेच्छानिवृत्ती घेतलेले कर्मचारी यांच्यावर महामंडळाच्या अटी व शर्तीनुसार कार्यवाही करता येत नसल्याचे महामंडळाने स्पष्ट केले याचे समितीला सखेद आश्चर्य वाटते. **सेवानिवृत्त झालेले कर्मचारी व स्वेच्छानिवृत्ती घेतलेले कर्मचारी त्यांच्या गैरव्यवहाराच्या प्रकरणाबाबतची चौकशी करुन त्यांचेवर जबाबदारी निश्चित करणे आवश्यक होते. तथापि, अशा प्रकरणाबाबत कुठलीही चौकशी करुन संबंधिताविरुध्द कार्यवाही केल्याचे समितीला आढळून आले नाही त्यामुळे महामंडळाने यापूर्वी लाभार्थ्यांना वितरीत केलेल्या कर्जाची वसूली विहित वेळेत होऊ शकली नाही. उद्योजकांना नियमबाह्य कर्ज वाटप झाल्यामुळे न्यायालयीन प्रकरणामधील अपव्यय व आर्थिक नुकसान महामंडळाला सोसावे लागत आहे. ही प्रथा वाणिज्यिक फायद्याच्या दृष्टीने अंगिकारली गेली नाही असे समितीचे स्पष्ट मत आहे. तरी याबाबत विभागाने त्वरेने चौकशी करुन महामंडळाचे आर्थिक नुकसान कसे भरुन काढता येईल याचा निर्णय घ्यावा व यासंबंधी जबाबदार असलेल्या कर्मचाऱ्यांविरुध्द चौकशी करुन कडक कारवाई करावी. महालेखाकारांच्या आक्षेपा संबंधाने अधिक स्पष्टीकरण देतांना महामंडळाच्या व्यवस्थापक व संचालकांनी समितीला माहिती देतांना सांगितले की, विविध न्यायालयात लघु उद्योजकांविरुध्द सुमारे आठशे दावे प्रलंबित असून मागील वर्षामध्ये ४० कोटी रुपयांची वसुली झाली असून वसूल व्हावयाच्या प्रत्येक प्रकरणात वसूल करण्यात वाव आहे असे सांगणे कठीत असल्याचे समितीसमोर सांगितले. शासनाने दिनांक ३१ मार्च, २०१२ ही तारीख वसुलीकरिता निश्चित करुनही त्या तारखेपर्यंत म्हणावी तेवढी वसुली होऊ शकली नाही सदरची बाब गंभीर आहे. सुमारे आठशे दावे निकाली लावण्यास प्रचंड कालावधी जाणार आहे हे गृहीतच आहे, असे असले तरी उक्त दाव्यामध्ये महामंडळाची जी कोट्यवधी रुपये रक्कम वसूल व्हावयाचे अडकून पडले आहे ती बाब गंभीर आहे. न्यायालयात सदरची प्रकरणे तातडीने निकाली काढण्यासंदर्भात योग्य ती कार्यवाही करणे आवश्यक आहे. यासाठी न्यायालयाद्वारे वेळोवेळी लोक न्यायालये आयोजित करण्यात येत असतात. अशा लोक न्यायालयांच्या माध्यमांतून सदरची प्रकरणे निकाली काढल्यास न्यायालयात अडकून पडलेले दावे निकाली लागतील व त्यामध्ये समुपदेशनाद्वारे तडजोड होऊन बराचसा निधी**

महामंडळाला मिळू शकेल म्हणून महामंडळाना या पुढील काळात संबंधित प्रलंबित प्रकरणे लोक न्यायालयांकडे नेता येतील किंवा कसे याचा गांभिर्याने विचारा करावा. अशी प्रकरणे लोक न्यायालयांकडून समुपदेशाद्वारे कसे निकाली निधतील याबाबत कार्यवाही करण्यात यावी अशी समिती आग्रहाची शिफारस करीत आहे. याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी.

तीन : कर्मचाऱ्यांच्या नुकसान भरपाईचे अनियमित प्रदान :-

महामंडळाने ज्या कर्मचाऱ्यांना इतर राज्य सार्वजनिक उपक्रमांमध्ये पुर्ननियुक्ती देण्यात आली त्यांना स्वेच्छा निवृत्ती योजने अंतर्गत द्यावयाच्या नुकसान भरपाईचे रु. ७७.०५ लाखाचे अनियमित प्रदान केले होते.

३.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००६-२००७ च्या (वाणिज्यिक) अहवालातील प्रकरण क्रमांक चार मधील परिच्छेद क्रमांक ४.२६ मध्ये "कर्मचाऱ्यांच्या नुकसान भरपाईचे अनियमित प्रदान" या संदर्भात महालेखाकारांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले आहे.

आस्थापनेवरील खर्च कमी करण्यासाठी व अतिरिक्त मनुष्यबळ कमी करण्यासाठी महामंडळाने स्वेच्छानिवृत्ती योजना (व्हीआरएस) लागू केली. (जून २००५) नेहमीच्या निवृत्ती फायद्या व्यतिरिक्त १.५ महिन्यांच्या पगार या दराने सेवा पूर्ण झालेल्या सेवा वर्षासाठी किंवा राहिलेल्या सेवा वर्षासाठी जे कमी असेल एवढी नुकसान भरपाई देण्याचे महामंडळाने मंजूर केले होते. या नुकसान भरपाईचा उद्देश कर्मचाऱ्यांना त्याच्या सेवेमधील नुकसानीचा भरपाई देणे हा होता.

स्वेच्छानिवृत्ती घेण्यापूर्वी महामंडळाच्या १८ कर्मचाऱ्यांना संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित, मुंबई (एसआरएल) या राज्य सार्वजनिक उपक्रमांमध्ये नोकरी मिळण्यासाठी योग्य स्त्रोतामार्फत अर्ज केले होते.

लेखापरीक्षण छाननीत खालील बाबी आढळून आल्या :

या कर्मचाऱ्यांचे अर्ज पाठविते वेळी महामंडळाने जर त्यांना इतर सार्वजनिक उपक्रमांमध्ये नोकरी मिळाली तर त्यांना स्वेच्छानिवृत्ती योजनेखाली नुकसान भरपाई मिळणार नाही, अशी अट घातली नव्हती.

महामंडळाने सप्टेंबर-२००५, नोव्हेंबर-२००६ या कालावधीत स्वेच्छानिवृत्ती घेतलेल्या १७ कर्मचाऱ्यांना रु. ७७.०५ लाख नुकसान भरपाईचे प्रदान केले होते व त्यांना त्यानंतर एसआरएलमध्ये पुर्ननियुक्ती मिळाली होती. परिणामस्वरुप त्यांना दुप्पट फायदा झाला व नुकसान भरपाई देण्याचा उद्देश सफल झाला नव्हता.

राज्य शासनाच्या सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभागाने वित्त विभागाच्या संमतीने स्पष्टीकरण दिले होते (डिसेंबर, २००६) की ज्या कर्मचाऱ्यांनी इतर सार्वजनिक उपक्रमांमध्ये पुर्नरोजगार स्वीकारला होता. त्यांना नुकसान भरपाई देय नव्हती. परंतु हा निर्णय / स्पष्टीकरण एक सारखी कारवाई होण्यासाठी राज्यातील सर्व राज्य सार्वजनिक उपक्रमांना वितरीत करण्यात आला नव्हता.

व्यवस्थापनाने म्हटले होते (जून २००७) की कर्मचाऱ्यांची इतर महामंडळे / सार्वजनिक उपक्रमांमधील पुर्ननियुक्तीची अट राज्य शासनाने महामंडळाची स्वेच्छानिवृत्ती योजनेचा प्रस्ताव मंजूर करतेवेळी त्यांत अंतर्भूत केली नव्हती. त्यामुळे आक्षेप घेण्यात आलेले अनियमित प्रदान कर्मचाऱ्यांना महामंडळाने केले नव्हते. हे उत्तर टिकवण्याजोगे नव्हते. कारण इतर सार्वजनिक उपक्रमांमध्ये पुर्ननियुक्ती करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना नुकसान भरपाई देय आहे की नाही हे महामंडळाला निश्चित करणे आवश्यक होते. राज्य शासनाने या संदर्भात स्पष्टीकरण दिल्यानंतर (डिसेंबर, २००६), जे कर्मचारी एसआरएल या सार्वजनिक उपक्रमांमध्ये सेवेत आहेत. त्यांच्याकडून नुकसान भरपाई वसुली करण्यास हवी होती.

राज्य शासनाने आपल्या उत्तरात (ऑगस्ट २००७) म्हटले होते की, महामंडळाला व एसआरएल यांना यासंदर्भात आवश्यक ते निर्देश जारी करण्यात आले होते.

३.२ या प्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करताना असे नमूद केले की, महामंडळाने आपल्या दिनांक २२/३/२०११ च्या पत्राद्वारे महामंडळातून स्वेच्छानिवृत्ती पत्करलेल्या व नंतर लिडकॉममध्ये काम केलेल्या / कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांकडून स्वेच्छानिवृत्ती रकमेची वसुली करण्यासाठी विनंती केली आहे.

लिडकॉमने सदरची रक्कम वसुल करण्यासाठी कारवाई पण चालू केली होती. परंतू लिडकॉममध्ये कार्यरत असलेल्या महामंडळाच्या माजी कर्मचाऱ्यांनी त्या विरोधात मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केली. त्यावर न्यायालयाने वसूली न करण्याबद्दलचा स्थगिती आदेश दिला आहे.

महामंडळ माजी कर्मचाऱ्यांनी दाखल केलेल्या याचिकेबाबत न्यायालयात नेटाने बाजू मांडत असून महामंडळाच्या माजी कर्मचाऱ्यांनी सदरची बाब लिडकॉमच्या निदर्शनास आणून द्यावयाची पाहिजे होती, पण त्यांनी तसे न केल्यामुळे दोन्ही महामंडळाची दिशाभूल केली आहे, असे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले आहे.

महामंडळ स्वेच्छानिवृत्तीच्या भरपाई रकमेची वसुली करण्यासाठी उचित कारवाई करीत आहे.

३.३ शासनाने पुढीलप्रमाणे अभिप्राय केले आहेत.

''सध्याच्या परिस्थितीनुसार त्यासंदर्भातील महामंडळाच्या अभिप्रायाशी सहमत आहे.''

३.४ या प्रकरणी लघु व मध्यम उद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई व महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने लघु व मध्यम उद्योगविभागाच्या सचिव व महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाचे व्यवस्थापकिय संचालक व इतर अधिकारी यांची बुधवार, दिनांक ६ फेबुवारी, २०१३ रोजी साक्ष घेण्यात आली. महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाने स्वेच्छानिवृत्ती देतांना ज्या कर्मचाऱ्यांना इतर राज्य सार्वजनिक उपक्रमामधून पुर्ननियुक्ती देण्यात आली त्यांना स्वेच्छानिवृत्ती योजनेअंतर्गत द्यावयाच्या नुकसान भरपाईचे अनियमित प्रदान केले होते असा महालेखाकारांनी आक्षेप नोंदविला होता. याबाबत समितीने अधिक स्पष्टीकरण करण्याविषयी सांगितले असता, महामंडळाचे व्यवस्थापकिय संचालक यांनी सांगितले की, महामंडळाच्या सेवेतील कर्मचाऱ्यांसाठी १९५६ चा कंपनी अधिनियम लागू आहे. सन २००९ मध्ये स्वेच्छानिवृत्तीची योजना मंजूर केल्यानंतर काही कर्मचाऱ्यांना स्वेच्छानिवृत्ती देण्यात आली. परंतु त्यांना शासनाच्या इतर महामंडळामध्ये पुर्ननियुक्ती देण्यात आली नाही. याबाबत जो शासन निर्णय देण्यात आला होता त्यामध्ये स्पष्ट करण्यात आले होते. परंतु शासनाचा दुसरा अंगिकृत व्यवसाय असलेल्या चर्मोद्योग विकास महामंडळाकडे नोकर भरती करावयाची होती. त्यांनी महामंडळाकडे स्वेच्छानिवृत्ती घेतलेल्या कर्मचाऱ्यांची यादी मागितली होती. त्यानुसार सन २००५ मध्ये वित्तीय महामंडळाने चर्मोद्योग विकास महामंडळाकडे स्वेच्छानिवृत्ती घेतलेल्या कर्मचाऱ्यांची यादी पाठविली होती. यासंदर्भात सन २००६ मध्ये सामाजिक न्याय विभागाच्या प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक झाली व त्यामधील इतिवृत्तामध्ये असे होते की, महामंडळाकडून स्वेच्छानिवृत्ती घेऊन बाहेर पडलेल्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती बाहेर झाली तर स्वेच्छानिवृत्ती धारकांना द्यावयाची रक्कम व दिलेली रक्कम वसुल करावी. ह्या इतिवृत्तांतील मजकूराच्या आधारे महालेखाकारांनी आक्षेप नोंदविला होता. इतिवृत्ताच्या आधारे आक्षेप नोंदविणे चुकीचे आहे असे महामंडळाचे म्हणणे आहे. याबाबत शासनाने धोरणात्मक

निर्णय घेण्याची गरज आहे. यासंदर्भात शासनाने अद्याप कोणताही निर्णय घेतलेला नाही. स्वेच्छानिवृत्ती घेतलेले कर्मचारी शासनाच्या दुसरा अंगिकृत असलेल्या महामंडळाच्या सेवेत रुजू झाले तर पर्यायाने ते पुन्हा शासन सेवेत रुजू झाले असा त्याचा अर्थ होत नाही काय? असे समितीने विचारले असता, महामंडळाचे व्यवस्थापकिय संचालक यांनी सांगितले की, शासनाचा याबाबत धोरणात्मक निर्णय झालेला नसून इतिवृत्तातील नमूद असलेल्या आक्षेपाच्या आधारे महालेखाकारांनी आक्षेप घेतलेला आहे व तो चुकीचा आहे एवढेच महामंडळाचे म्हणणे आहे. याबाबत चर्मोद्योग विकास महामंडळाकडे कार्यरत असलेल्या वित्तीय महामंडळाकडील कर्मचाऱ्यांकडून स्वेच्छानिवृत्ती पोटी दिलेला लाभ वसूल करण्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे? असे समितीने विचारले असता, व्यवस्थापकिय संचालक यांनी सांगितले की, यातील अनेक कर्मचारी न्यायालयात गेले असल्याने न्यायालयीन प्रकरणाच्या निवाड्यानंतरच वसूलीबाबतची कार्यवाही करता येईल असे स्पष्ट केले.

विभागाच्या सचिवांनी महालेखाकारांनी घेतलेल्या आक्षेपाबाबत सहमती दर्शवितांना विशद केले की, कर्मचाऱ्यांनी स्वेच्छानिवृत्ती घेतल्यानंतर राज्य शासनाच्या दुसऱ्या अंगिकृत व्यवसायामध्ये सेवा स्विकारली तर त्यांच्याकडून स्वेच्छानिवृत्तीपोटी दिलेले लाभ वसूल केले पाहिजेत. यासंदर्भात उद्योग विभाग वित्त विभागाकडे प्रस्ताव सादर करील व त्यानुसार पुढील योग्य ती कार्यवाही केली जाईल, असे त्यांनी आश्वासित केले.

३.५ अभिप्राय व शिफारशी :-

महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाने स्वेच्छानिवृत्ती देतांना ज्या कर्मचाऱ्यांना इतर राज्य सार्वजनिक उपक्रमामधून पुर्ननियुक्ती देण्यात आली त्यांना स्वेच्छानिवृत्ती योजनेअंतर्गत द्यावयाच्या नुकसान भरपाईचे अनियमित प्रदान केले होते असा महालेखाकारांनी आक्षेप नोंदविला होता. समितीसमोर झालेल्या साक्षीपुराव्यावरुन असे स्पष्ट होते की, महामंडळाने त्यांच्याकडे स्वेच्छानिवृत्ती स्विकारलेल्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या सेवानुकसान भरपाईपोटी अनुज्ञेय असलेले लाभ प्रदान केले होते. परंतु, त्यातील काही कर्मचाऱ्यांनी महाराष्ट्र शासनाच्या अंगिकृत असलेल्या महाराष्ट्र राज्य चर्मोद्योग विकास महामंडळाकडे सेवा स्विकारली. याबाबतची स्वेच्छानिवृत्ती स्विकारलेल्या कर्मचाऱ्यांची यादी वित्तीय महामंडळानेच महाराष्ट्र राज्य चर्मोद्योग विकास महामंडळाकडे त्यांच्या विनंतीनुसार पाठविली होती. त्यामुळे चर्मोद्योग विकास महामंडळाने अशा कर्मचाऱ्यांना सेवा स्विकारण्यापूर्वी त्यांना प्रदान केलेल्या लाभाची वसूली भरण्यासाठी सांगणे आवश्यक होते. वित्तीय महामंडळाने देखील सन २००६ मध्ये सामाजिक न्याय विभागाच्या सचिवांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत यासंदर्भातील निर्णय

घेतला होता. परंतु शासन स्तरावर त्याची मान्यता घेऊन अंमलबजावणी केली नाही. राज्य शासनाचे याबाबत स्पष्ट धोरण आहे. त्यामुळे तशी अंमलबजावणी होणे आवश्यक होते. त्यामुळे लघु व मध्यम उद्योग विभागाच्या सचिवांनी साक्षीच्यावेळी महालेखाकारांच्या अभिप्रायाशी सहमती दर्शवून याप्रकरणी करावयाच्या कार्यवाहीसंदर्भात उद्योग विभागाकडून वित्त विभागाकडे प्रस्ताव सादर केला जाईल व त्यानुसार कार्यवाही करण्याचे स्पष्ट केले. **याप्रकरणी विभागाने त्वरेने निर्णय घेतला असता तर स्वेच्छानिवृत्ती स्विकारलेल्या कर्मचाऱ्यांना न्यायालयात देखील जाता आले नसते. पर्यायाने न्यायालयीन प्रकरणामुळे झालेला कालापव्यय व आर्थिक नुकसान टाळता आले असते, असे समितीचे स्पष्ट मत आहे. विभागाच्या सचिवांनी उद्योग विभागामार्फत वित्त विभागाकडे सादर करावयाच्या प्रस्तावाबाबत त्वरेने निर्णय होण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी व वित्त विभागाने दिलेला निर्णय न्यायालयाच्या निदर्शनास आणून त्वरेने प्रकरण निकाली काढण्याच्या दृष्टीने योग्य ती कार्यवाही करावी. याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्याच्या आत देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

____*

एक : १.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी सन २००७-२००८ च्या (वाणिज्यिक) अहवालातील प्रकरण क्रमांक २ मध्ये परिच्छेद क्रमांक २.३.१ ते २.३.१२ मध्ये महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्यादित यांच्या कामकाजासंदर्भात महालेखाकारांनी पुढील प्रमाणे अभिप्राय व्यक्त केले आहेत.

प्रस्तावना (२.३.१)

पूर्वाश्रमीच्या महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाची महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाची (एमएसईबी) पुर्नरचना करण्यासंबंधीच्या राज्य सरकारच्या २४ जानेवारी, २००५ च्या निर्णयाची अंमलबजावणी जून २००५ मध्ये करण्यात आली होती. परिणाम स्वरुप एमएसईबी गुंडाळण्यात येऊन चार कंपन्या (एमएसईबी सुत्रधारी कंपनी मर्यादित, महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित व महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित) ६ जून २००५ रोजी स्थापित केल्या होत्या. विद्युत वापराचे कार्य विद्युत निर्मिती व विद्युत पारेषणापासून वेगळे ठेवण्यासंबंधीच्या विद्युत अधिनियम, २००३ च्या सांविधानिक तरतुदीमुळे राज्यामधील विद्युत वितरणाचे काम महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित (कंपनी) यांचेकडे सुपूर्द करण्यात आले होते.

औद्योगिक विकासामुळे व वाणिज्यिक व निवासी इमारतीच्या बांधकाम कार्यामधील वृध्दीमुळे राज्याची विजेची मागणी दरवर्षी वाढतच होती. महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादितने (एमएसपीजीसीएल) २००३-०७ या कालावधीत विद्युत निर्मिती क्षमतेमध्ये कोणतीही वृध्दी न केल्यामुळे, राज्यातील विजेची गरज भागविण्यासाठी कंपनीला बाहेरील संस्थाकडून विद्युत खरेदी करणे भाग पडले होते.

कंपनी विद्युत निर्मिती कंपन्याबरोबर वीज खरेदीबाबतचे करार करते. कंपनी यादी करण्यात आलेल्या २२ विद्युत व्यापार कंपन्यापैकी (पीटीसीस) पाच (अधानी एन्टरप्राईजेस प्रायव्हेट मर्यादित, जेएसडब्ल्यू विद्युत व्यापार कंपनी मर्यादित, जिंदाल विद्युत मर्यादित, एनटीपीसी विद्युत व्यापार निगम मर्यादित व पीटीसी इंडिया मर्यादित) आधारावर (एक वर्षापर्यंत) विद्युत खरेदी करते. कंपनीने राष्ट्रीय औष्णिक विद्युत महामंडळ (एनटीपी) (१२ एकक) व भारतीय अणुऊर्जा महामंडळ मर्यादित (एनपीसीआयएल) (तीन एकक) यांचेबरोबर १५ दिर्घ मुदतीचे (एक वर्षापेक्षा जास्त) करार केले होते. त्या व्यतिरिक्त मुंबई क्षेत्रासाठी कंपनी टाटा विद्युत कंपनी मर्यादित यांच्याकडून खरेदी करते. कंपनी अपारंपारिक ऊर्जा स्त्रोतामार्फत वीज घेत होती. (कॅपटीव्ह विद्युत उत्पादक व पवन ऊर्जा विकासक) विद्युत खरेदीचे कार्य कंपनीच्या विद्युत खरेदी विभागाद्वारे (सेल) हाताळण्यात येते.

कंपनीमधील विद्युत खरेदी व्यवस्थापनाची संघटनात्मक संरचना खालीलप्रमाणे होती.

व्यवस्थापकीय संचालक

संचालक (प्रवर्तक)	संचालक (वित्त)
कार्यकारी संचालक	मुख्य महाव्यवस्थापक (वित्त व लेखे)
मुख्य अभियंता (विद्युत खरेदी) मुख्य अभियंता (वाणिज्यिक)	महाव्यवस्थापक (वित्त)

१.२ याबाबत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने वस्तुस्थिती दर्शविली नाही.

१.३ याबाबत शासनाने अभिप्राय व्यक्त केले नाही.

लेखापरीक्षणाची व्याप्ती (२.३.२)

२.१ हे कामकाज प्रगती लेखापरीक्षण मे-जून २००८ या दरम्यान घेण्यात आले व त्यात एप्रिल, २००३ ते मार्च, २००८ या कालावधीत कंपनीने केलेल्या विद्युत खरेदी व्यवस्थापनाचा समावेश होता. कंपनीमधील विद्युत खरेदी व्यवस्थापनाने विश्लेषण करण्यासाठी विद्युत खरेदी व त्यांचे प्रदान याबाबतच्या कागदपत्राची तपासणी करण्यात आली होती. एकूण १५ दिर्घ मुदतीचे विज खरेदी करार होते त्यापैकी चार करार पूर्वाश्रमीच्या एमएसईबीचे होते. कंपनीने २२ पीटीसीसची यादी तयार केली होती परंतु त्यापैकी फक्त पाच पीटीसीस् प्रतिसाद देत होते व त्यांच्याकडून लघु मुदतीच्या आधारावर औपचारिक करार न करता फक्त कामाचे आदेश जारी करण्यात येऊन विद्युत खरेदी करण्यात येत होती. सर्व दिर्घ मुदतीचे करार व कामाच्या आदेशांची तपासणी लेखापरीक्षणात करण्यात आली होती.

२.२ याबाबत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने वस्तुस्थिती दर्शविली नाही.

२.३ याबाबत शासनाने अभिप्राय व्यक्त केले नाही.

लेखापरीक्षणाची उद्दिष्टे (२.३.३)

३.१ या आढाव्यासाठी लेखापरीक्षणाची उद्दिष्टे खालील बाबींचे निर्धारित करण्यासाठी होती;

- अंदाज/मागणी/उपलब्धता या आधारावर विद्युत खरेदीसाठीचे पर्याप्त नियोजन करण्यात आले होते.
- मागणीचे निर्धारण व करारांमधील अटी व शर्ती यासंदर्भानुसार दिर्घ मुदतीचे तसेच लघु मुदतीच्या स्त्रोतांमधुन विद्युत खरेदी काटकसरीने व परिणामकारकरित्या करण्यात आली होती;

- कंपनीने शासनाने, केंद्रीय विद्युत नियमन आयोग (सीईआरसी/महाराष्ट्र विद्युत नियमन आयोग (एमईआरसी) यांनी दिलेल्या पध्दती व धोरणासंबंधीच्या मार्गदर्शक तत्वांचे व कायदेशीर आवश्यकतेची कंपनीने पूर्तता केली होती;
- नियोजन केलेल्या कार्यानुसार प्रत्यक्ष साध्यता त्याप्रमाणे झाली होती व त्यामधील तुटवडा/फरकाचे सुयोग्य विश्लेषण करण्यात येऊन त्यावर सुधारात्मक कारवाई करण्यात आली होती; व
- विद्युत खरेदी कार्याचे संनियंत्रण व नियंत्रण करण्यासाठीचे अंतर्गत नियंत्रणे पर्याप्त होती.

३.२ महामंडळाचा अभिप्राय नाही.

३.३ याबाबत शासनाने अभिप्राय व्यक्त केले नाही.

लेखापरीक्षण कसोट्या (२.३.४)

४.१ खालील लेखापरीक्षण कसोट्या वापरण्यात आल्या.

- विद्युत खरेदीसाठी सीईआरसी/एमईआरसी यांनी निश्चित केलेले/वाटप केलेली मात्रा व मंजूर केलेले नियोजन;
- भारत सरकारच्या (जीओआय), विद्युत मंत्रालय (एमओपी), राज्य सरकार सीईआरसी/एमईआरसी यांनी जारी केलेली मार्गदर्शक तत्त्वे व विद्युत अधिनियम, २००३ च्या तरतुदी;
- दिर्घ मुदतीच्या करारांच्या व कामाच्या आदेशांमधील शर्ती व अटी;
- पारेषण व वितरण (टी ॲन्ड डी) हानी संदर्भात कंपनीने/सीईआरसी/एमईआरसी व भारत सरकार यांनी निश्चित केलेले निकष; व
- शक्तीचे प्रत्यायोजन, विद्युत खरेदी विवरणाचा ताळमेळ, अंदाजपत्रक व व्यवस्थापन माहिती पध्दतीचे अहवाल.

  याबाबत महामंडळाचा अभिप्राय नाही.

४.२ याबाबत महामंडळाचा अभिप्राय नाही.

४.३ याबाबत शासनाने अभिप्राय व्यक्त केले नाही.

लेखापरीक्षण पध्दती (२.३.५)

५.१ लेखापरीक्षणाने खालील पध्दतींचा वापर केला होता:

- एमईआरसी यांनी जारी केलेल्या मार्गदर्शक तत्वे/निर्देशांचे कार्यान्वयन/अंमलबजावणीबाबतची तपासणी व कंपनीने सादर केलेले वार्षिक महसूल आवश्यकता (एआरआर) अहवाल;
- महाराष्ट्र शासनाने (जीओएम) व एमईआरसीने विद्युत खरेदीबाबत जारी केलेली मार्गदर्शक तत्वे/निर्देशांची अंमलबजावणीचा अभ्यास;
- संचालक मंडळाच्या (बीओडी) बैठकींची कार्यसूची व कार्यवृत्तींची तपासणी;
- प्राप्त झालेली विद्युत व त्यांचे प्रदान याबाबतच्या सर्व कागदपत्रांची तपासणी; व
- व्यवस्थापनाबरोबरचा संवाद.

५.२ याबाबत महामंडळाकडून अभिप्राय नाही.

५.३ शासन कंपनीच्या उत्तराशी सहमत आहे.

लेखापरीक्षणाचे निष्कर्ष (२.३.६)

६.१ लेखापरीक्षणाचे निष्कर्ष राज्य शासनाला/व्यवस्थापनाला कळविण्यात (जुलै २००८) आले होते व त्यांची चर्चा राज्यस्तरीय सार्वजनिक उपक्रमाच्या लेखापरीक्षण समीक्षा समितीच्या (एआरसीपीएसई) बैठकीत (२९ ऑगस्ट २००८) करण्यात आली होती. बैठकीला महाराष्ट्र शासनाचे उपसचिव (उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग), कंपनीचे संचालक (वित्त), मुख्य अभियंता (विज खरेदी सेल), मुख्य अभियंता (वाणिज्यिक), अधिक्षक अभियंता (टीआरसी), महाव्यवस्थापक (वित्त व लेखे) हजर होते. व्यवस्थापनाने/शासनाने व्यक्त केलेल्या दृष्टीकोनाच्या आढाव्यास अंतिमरुप देतांना विचार करण्यात आला.

६.२ याबाबत महामंडळाकडून अभिप्राय नाही.

६.३ शासन कंपनीच्या उत्तराशी सहमत आहे.

मागणीचे निर्धारण (२.३.७)

७.१ मागणीचे निर्धारण व विजेची आवश्यकता मागील वापर सध्याचा वापर कल, भारवृध्दी कल यांच्या आधारावर काढण्यात येते सीईएने मंजूर केलेला मागील कालावधीतील पारेषण व वितरण हानी व त्याचा कल या सर्वांची बेरीज भविष्यातील विजेची मागणी दर्शविते. एमईआरसी हे विद्य ुत अधिनियम, २००३ अन्वये राज्यामधील विद्युत नियामक असल्याने विज खरेदीच्या स्त्रोतांना मान्यता देते व कंपनीने सादर केलेल्या एआरआर तपशीलानुसार दरपत्रक सुधारणेला मान्यता देते. २००४-०६ या

कालावधीसाठी एआरआरस् तयार करण्यात आली नव्हते. २००४-०६ या कालावधीचे एआरआरस् नसल्यामुळे २००३-०४ या कालावधीसाठी मंजूर करण्यात आलेली विज खरेदीची मात्रा तुटवडा काढण्यासाठी २००४-०६ या कालावधीसाठी गृहीत धरण्यात आली होती. या त्रुटीमुळे विजेची खरेदी तदर्थ व अनियोजित झाली होती.

एसीईएने केलेल्या १७ व्या इलेक्ट्रिक विद्युत सर्वेक्षणासाठी कंपनीने विद्युत मागणी म्हणून सादर केलेल्या माहितीच्या आधारावर २००३-०४ ते २००७-०८ या कालावधीतील एमईआरसीने मंजूर केलेली विज व प्रत्यक्ष खरेदी केलेली वीज याचा तपशील खालीलप्रमाणे होता.

वर्ष	सीईएने मंजूर केलेले भार वृध्दीच्या आधारावर वीजेची मागणी	एमईआरसीने मंजूर केली वीज खरेदी	प्रत्यक्ष केलेली वीज खरेदी	वीजेच्या मागणी मधील तुटवडा (२-४)	खरेदीमधील जादा / तुटवडा (४-३)
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
२००३-०४	७८,६६७	६२,५८३	६८,७५९	९,९०८	६,१७६
२००४-०५	८२,०४३	६२,५८३	६९,८४०	१२,२०३	७२,५७
२००५-०६	८६,४९५	६२,५८३	५८,५२७	२७,९६८	४,०५६
२००६-०७	९१,८७५	७४,९०७	७५,४३६	१६,४३९	५२९
२००७-०८	९७,६८९	७६,८५२	७८,५९७	१९,०९२	१,७४५

(स्त्रोत सीईएने अहवाल, एआरआर व वार्षिक लेखे)

- वरील तपशीलावरुन असे दिसून येते की वीजेची मागणी २००३-०४ मधील ७८,६६७ दशलक्ष युनिट वरुन २००७-०८ मध्ये ९७,६८९ दशलक्ष युनिट एवढी वाढली होती व प्रत्यक्षातील वीज खरेदी देखील २००३-०४ मध्ये ६८,७५९ दशलक्ष युनिट एवढी वरुन २००७-०८ मध्ये ७८,५९७ दशलक्ष युनिट एवढी वाढली होती व प्रत्यक्ष खरेदीमधील तुटवडा २००३-०४ मधील ९,९०८ दशलक्ष युनिट वरुन २००७-०८ मध्ये १९,०९२ दशलक्ष युनिट एवढा वाढला होता.
- २००३-०७ या कालावधीत एमएसपीजीसीएलने विद्युत निर्मिती क्षमतेत कोणतीही भर घातली नव्हती व कंपनीला विजेची खरेदी बाहेरील संस्थाकडून करणे भाग पडले होते.
- वीज मागणीमध्ये खूप मोठ्या तुटवड्यामुळे कंपनीला नियोजित केलेल्या एक ते १२ तास भारनियमनाच्या तुलनेत प्रत्यक्ष भारनियमन २.५ ते १५ तास एवढे अंमलबजावीत करावे लागले होते. त्याचा तपशील परिच्छेद क्रमांक २.३.१० मध्ये दिला आहे.

*यामध्ये पूर्वाश्रमीच्या एमएसईबीने २००३-०५ या कालावधीत (५ जून २००५ पर्यंत) केलेल्या वीज निर्मितीचा समावेश आहे.

७.२ महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडून वस्तुस्थिती दर्शविली नाही.

७.३ शासन कंपनीच्या उत्तराशी सहमत आहे.

विजेचे स्त्रोत (२.३.८)

८.१ कंपनीने २००३-०८ या कालावधीत खालील दर्शविल्याप्रमाणे ३,५१,१५९.३७ दशलक्ष युनिट विजेची खरेदी केली होती.

वर्ष	एमएसपीजीसीएल	केंद्रीय क्षेत्र	आयपीपीस्	इतर	एकूण
२००३-०४	४६,४६३.६३	१८,२२९.३७	४०.२२	४,०२६.०७	६८,७५९.२९
२००४-०५	४७,२४५.२३	१९,१०१.१२	३५.६२	३,४५८.३१	६९,८४०.२८
२००५-०६	३८,०५०.८३	१४,८०१.०५	४६.०४	५,६२८.८८	५८,५२६.८०
२००६-०७	४६,३८३.००	२२,४७९.००	१,६७९.००	४,८९५.००	७५,४३६.००
२००७-०८	४८,१३७.००	२२,०००.००	४,८५७.००	३,६०३.००	७८,५९७.००
एकूण	**२,२६,२७९.६९**	**९६,६१०.५४**	**६,६५७.८८**	**२१,६११.२६**	**३,५१,१५९.३७**

कंपनीने २००३-०८ या कालावधीत त्यांच्या विजेच्या आवश्यकतेच्या ६४ टक्के वीज आपल्या साथी कंपनी म्हणजे एमएसपीजीसीएलकडून २८ टक्के वीज केंद्रीय क्षेत्रातील कंपन्याकडून (एनटीपीसी एनपीसीआयएल) दिर्घ मुदतीच्या करारावर दोन टक्के स्वतंत्र वीज उत्पादकांकडून (आरजीपीपीएल) व सहा टक्के वीज खाजगी वीज व्यापार कंपन्याकडून (अधानी एन्टरप्रायजेस प्रायव्हेट मर्यादित, जेएसडब्ल्यू वीज व्यापार कंपनी मर्यादित, जिंदाल वीज मर्यादित, एनटीपीसी विद्युत व्यापार निगम मर्यादित व पीटीसी इंडिया मर्यादित) कडून महागड्या दराने लघु मुदतीच्या कराराच्या आधारावर खरेदी केली होती. २००३-०८ या कालावधीत कंपनीने पीटीसीस् व व्यापाऱ्यांकडून लघु मुदतीच्या आधारावर ७,०६७.१६ दशलक्ष युनिट (दोन टक्के) वीज खरेदी केली होती. परंतु, त्यासाठी देण्यात आलेले प्रदान एकूण खरेदी रुपये ६३,६७२.२७ कोटीचा तुलनेत रुपये २,८०४.६३ कोटी (चार टक्के) एवढे होते. वीज खरेदी तपशीलावरुन असे दिसून येते की, एमएसपीजीएलकडून करण्यात आलेली वीज खरेदी अगदी थोडी म्हणजे २००३-०४ मधील ४६,४६३.६३ दशलक्ष युनिट वरुन २००७-०८ मध्ये ४८,१३७.०० दशलक्ष युनिट एवढीच वाढली होती. दरवर्षीची वीज खरेदी जवळ जवळ सारखीच होती अपवाद फक्त २००५-०६ वर्ष हा होता. जेव्हा वीज खरेदी एमएसपीजीसीएल विद्युत केंद्रामध्ये निर्धारित आऊटेजेस असल्याने ३८,०५०.८३ दशलक्ष युनिट एवढीच झाली होती.

८.२ महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडून वस्तुस्थिती दर्शविली नाही.

८.३ शासन कंपनीच्या उत्तराशी सहमत आहे.

खरेदी पध्दत (२.३.९)

९.१ महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादितच्या भार जावक केंद्राने रोज / मासिक / वार्षिक राज्याच्या भार जावक अहवालाच्या आधारावर सीईए राज्याचा जास्तीत जास्त भार त्यामधील

राज्यामधील वीज केंद्रांतील वाढ, हा तपशील असलेली पंचवार्षिक योजना तयार करते. सीईएने संकलीत केलेल्या माहितीच्या आधारावर कंपनी पाच वर्षासाठी वीज मागणी अंदाज तयार करुन तो एमईआरसीला मंजूरीसाठी सादर करते. विविध स्त्रोतामधून उपलब्ध होणाऱ्या वीजेच्या आधारावर खरेदी करावयाच्या वीजेच्या मात्रेस एमईआरसी मंजूरी देते. एमईआरसीची मंजूरी मिळाल्यानंतर कंपनी बाहेरील संस्थाकडून दिर्घ मुदतीच्या व लघु मुदतीच्या आधारावर विजेची खरेदी करते.

एमएसपीजीसीएलकडून उपलब्ध असलेली वीज निर्धारित केल्यानंतर राहिलेला विजेचा तुटवडा कंपनी केंद्रीय विभागातील कंपन्या व स्वतंत्र विद्युत उत्पादकांकडून (आयपीपी) विजेची खरेदी दिर्घ मुदतीच्या कराराद्वारे करीत होती. कंपनीला विजेची खरेदी प्रत्यक्ष खरेदीच्या वेळी उपलब्ध असलेल्या स्त्रोतामधील वीज विचारांत घेऊन करणे आवश्यक होते. महागड्या वीजेची खरेदी सर्व कमीदराच्या विजेचे स्त्रोतातून मिळणारी वीज संपल्यानंतर व त्या स्त्रोताला एमईआरसीने मंजूरी दिल्यानंतरच करण्यात येत होती. त्यानंतरच वीजेचा तुटवडा काढण्यात येऊन तो तुटवडा भरुन काढण्याचे प्रयत्न लघु मुदतीच्या कराराद्वारे पीटीसीकडून खरेदी करुन भागवायचा होता व त्यापूर्वी यादी केलेल्या कंपन्यांकडून निविदा मागवून व त्यास त्यांनी दिलेला प्रतिसाद व कमीत कमी दराच्या देकारावरच खरेदी करावयाची होती.

कॅपटीव्ह वीज उत्पादक (सीपीपी) व पवन ऊर्जा विकासक (डब्ल्यूएमडी) यांच्याबरोबर दिर्घ मुदतीचे करार करुन कंपनी अपारंपारिक ऊर्जा स्त्रोतामधून ही वीज घेत होती. २००३-०८ या कालावधीत कंपनीने असे ५८१ करार (५४१ पीडब्ल्यूएमडी व ४० बगास) केले होते.

दिर्घ मुदतीच्या विद्युत खरेदीची पध्दती :- कंपनीला वीज खरेदीसाठीच पाच वर्षाचा प्लॉन संचालक मंडळाच्या मान्यतेने तयार करुन तो एमईआरसीला मंजूरीसाठी सादर करावा लागतो. सीईए केंद्रीय निर्मिती केंद्रामधील (सीजीएस) वीजेचा वाटा कंपनीला नियतवाटप करते व त्या केंद्रांचा वीजेच्या दराला सीईआरसी मंजूरी देते. कंपनी सीजीएस बरोबर दिर्घ मुदतीचे करार करते व वीज केंद्रीय व राज्याच्या पारेषण लाईनस मधून वीज व्हील करुन घेते. वीजेचे लेखांकन बीलांसाठी प्रादेशिक विद्युत समितीद्वारा केले जाते.

लघु मुदतीच्या विद्युत खरेदीची पध्दती :- लघु मुदतीच्या वीजेची खरेदी (पीटीसीस् व इतर) आवश्यकतेनुसार मागणी आदेश नोंदवून करण्यात येते. परंतु पीटीसीस् बरोबर औपचारिक करार करण्यात येत नाहीत. कंपनीकडे मागणी आदेशाचा प्रमाणित केलेला कोणताही नमूना नाही.

लघु मुदतीवर वीजेची खरेदी करण्यासाठी कंपनीच्या संचालक मंडळाने कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालकाला प्राधिकृत केलेले आहे. वीजेची खरेदी करण्यासाठी कंपनीला मोठ्या प्रमाणावर जाहिरात करुन निविदा / चौकशी देकार मागवावे लागतात. विविध बोल्या / देकार उपलब्ध झाल्यानंतर

तुलनात्मक विवरणपत्र तयार करण्यात येऊन कमीत कमी देकार असलेल्या बोलीदाराकडून विजेची खरेदी करण्यात येते.

९.२ याप्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करतांना असे नमूद केले आहे की, दिर्घ मुदतीच्या आणि मध्यम मुदतीच्या प्रकरणी औपचारिक करार केले जातात. मात्र लघु मुदतीच्या सर्व प्रकरणात तशी कार्यवाही केली जात नाही. खरेदी विशेषत: लघु मुदतीच्या खरेदीसाठी उद्दिष्टांचे पत्र (LOI) यातील अटी व शर्ती लागू असतात. कार्य आदेश (Work order) आणि उद्दिष्टांचे पत्र (LOI) ही सर्वसाधारणपणे प्रमाणित नमुन्यात असतात. काही प्रकरणी देकार (offer) आणि आदेशाच्या अटी यानुसार काही अटी व शर्ती यामध्ये फरक होऊ शकतो.

९.३ शासन कंपनीच्या उत्तराशी सहमत आहे.

विद्युत खरेदीचे परिणाम व भार नियमन (२.३.१०) :-

१०.१ २००३-०८ या कालावधीत एमईआरसीने मंजूर केलेल्या वीज खरेदीच्या तुलनेत (३,३९,५०८.०० दशलक्ष युनिट) प्रत्यक्ष केलेली वीज खरेदी (३,५१,१५९.३७ दशलक्ष युनिट) यांचा तपशील जोडपत्र १० मध्ये देण्यात आलेला आहे.

एमईआरसीने मंजूर केलेल्या वीज खरेदीच्या तुलनेत कंपनीने प्रत्यक्षात खरेदी केलेली वीजेची मात्रा वर्ष २००५-०६ चा अपवाद वगळता सर्व वर्षात जास्त होती.

बाहेरील संस्थाकडून वीज खरेदी करुन देखील कंपनी वीजेची मागणी भागऊ शकली नव्हती व त्यामुळे वीजेचे भारनियमन म्हणजेच वीजेचा कमी पुरवठा करावा लागला होता. भारनियमन करण्यासाठी कंपनीने क्षेत्राचे वर्गीकरण केले होते. प्रत्येक क्षेत्राचे शहरी व औद्योगिक क्षेत्र, इतर व कृषि वर्चस्व असलेले क्षेत्र असे दोन विभाग केले होते. सरासरी, वितरण हानी व वसुली कार्यक्षमता विचारांत घेऊन भारनियमन काढण्यात येते व अ, ब, क व ड गट केले होते. २००७-०८ यावर्षी संपलेल्या मागील तीन वर्षाच्या कालावधीत नियोजित व प्रत्यक्ष भारनियमनाचा तपशील खालील तक्त्यात दर्शविला आहे.

गट	**नियोजित**			**प्रत्यक्ष**		
	शहरी व औद्योगिक क्षेत्र	इतर क्षेत्र	कृषि वर्चस्व क्षेत्र	शहरी व औद्योगिक क्षेत्र	इतर क्षेत्र	कृषि वर्चस्व क्षेत्र
२००५-०६						
अ	१.०	२.०	५.०	२.५	४.५	११.०
ब	२.०	४.०	८.०	३.०	५.०	११.५
क	२.०	४.०	८.०	३.५	५.५	१२.०

ड	२.०	४.०	८.०	४.०	६.०	१२.०
२००६-०७						
अ	२.५	४.५	११.०	४.७५	६.७५	१४.०
ब	३.०	५.०	११.५	५.२५	७.२५	१४.५
क	३.५	५.५	१२.०	५.७५	७.७५	१५.०
ड	४.०	६.०	१२.०	६.२५	८.२५	१५.०
२००७-०८						
अ	३.०	५.०	११.०	३.०	५.०	११.०
ब	३.७५	५.५	११.५	३.७५	५.५	११.५
क	४.५	६.०	१२.०	४.५	६.०	१२.०
ड	५.२५	६.५	१२.०	५.२५	६.५	१२.०

(स्त्रोत : कंपनीने वेळोवेळी जारी केलेले परिपत्रक)

वरील तपशीलावरुन असे दिसून येते की, कंपनीने नियोजित एक ते १२ तासाच्या भारनियमनाच्या २.५ ते १५ तास एवढे होते. एमईआरसीने मागणी व पुरवठा यामधील तफावतीची कमाल मर्यादा निश्चित करुन भारनियमनाचे तास विहीत (२००६-०७) केले होते. कृषि वर्चस्व असलेल्या क्षेत्रासाठी जास्तीत जास्त भारनियमन दररोज १२ तास एवढे होते तर शहरी व औद्योगिक क्षेत्रासाठी ४.० तास एवढे होते. परंतु, प्रत्यक्षात दोन्ही क्षेत्रामध्ये भारनियमात वाढ झालेली होती. २००६-०७ या वर्षामध्ये कृषीचे वर्चस्व असलेल्या क्षेत्रामध्ये प्रत्यक्ष भारनियमन १४ ते १५ तास एवढे होते व शहरी व औद्योगिक क्षेत्रामध्ये ते ४.७५ ते ६.२५ तास एवढे होते. २००७-०८ या वर्षामध्ये कृषि वर्चस्व असलेल्या क्षेत्रांमधील प्रत्यक्ष भारनियमन १२ तासापेक्षा कमी होते परंतु शहरी व औद्योगिक क्षेत्राचे भारनियमन ३.०० ते ५.२५ तास एवढे वाढले होते. अशारितीने अनियोजित वीज खरेदीमुळे वाढीव भारनियमन करावे लागले होते.

१०.२ याप्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करतांना असे नमूद केले आहे की :

भारनियमन :- भारनियमनाचा कार्यक्रम अपेक्षित मागणी आणि प्रणालीची उपलब्धता याचा विचार करुन तयार केला जातो. कारण प्रणाली ही गतीशिल असते मागणी व उपलब्धता यात आकस्मिक बदल होत असतात. वीज भाराच्या मागणीचे वैशिष्ट्य म्हणजे जी गतीशील असते व उपभोक्ते विजेचा वापर कसा करतात यावर भार अवलंबून असतो. अशा माप दंडातील कोणत्याही बदलामुळे मागणीत वाढ किंवा घट होते. महाराष्ट्राच्या काही क्षेत्रात पावसाचे प्रमाण नेहमीपेक्षा खाली आले तर कृषीसाठी विजेचा वापर वाढून विजेच्या मागणीत एकदम मोठी वाढ होते. मागणी वाढण्याचे हे महत्त्वाचे कारण आहे.

वीज मागणी, उपलब्धता आणि प्रणालीतील विजेची कमतरता यावर पुढील कारणामुळे परिणाम होत असतो.

- कृषी भार एकदम लक्षणिय प्रमाणात वाढल्यामुळे मागणी वाढते.
- निर्मिती केंद्रात बिघाड होणे.
- पारेषणाच्या मार्गाच्या उपलब्धतेवर मर्यादा असणे.
- कोयनाचे पाणी निर्मितीसाठी वापरण्यावर निर्बंध असणे.
- वीज निर्मितीसाठी वायुचा (Gas) वापरण्यावर निर्बंध असणे.
- पारेषणाच्या मर्यादा तसेच पुरवठादारांकडे वीज नसल्याने करारापेक्षा कमी वीज उपलब्ध होणे.
- वीज जाळ्यातील वारंवारता (Frequency) कमी होणे.

ऑक्टोबर २००५ पासून चांगला पाऊस झाल्यामुळे वीज मागणी वाढली आणि त्याचवेळी महानिर्मिती (Mahagenco) कंपनीचे चंद्रपुर येथील ५०० मे.वॅ. क्षमतेचा वीज निर्मिती संच उपलब्ध नसल्याने तसेच वीज जाळ्याच्या समस्येमुळे वीज खरेदीवर मर्यादा आल्यामुळे विजेची उपलब्धता कमी झाली. पुरवठ्यातील अडचणीमुळे तसेच पारेषण मार्गाच्या मर्यादा यामुळे महावितरण कं. ला अनियंत्रितपणे आणि अनिश्चित काळापर्यंत अती उच्च दाबाच्या तारा उघडणे संपुर्ण वीज प्रणालीच्या सुरक्षेसाठी करणे आवश्यक होते. असे अनियंत्रितपणे व अनिश्चित काळासाठी अती उच्च दाबाच्या (इ.एच.व्ही.) उघडण्याचे प्रकाराचे नियमन करण्यासाठी आणि संपूर्ण वीज जाळे कोसळून बंद पडू नये म्हणून महावितरण कंपनी मर्यादितने भारनियमनाच्या कार्यक्रमात सुधारणा केली.

दिनांक ९ फेब्रुवारी, २००७ रोजी मागणी पुरवठा परिस्थिती अतिशय वाईट झाल्याने महावितरणने भार नियमनाचे तत्व व शिष्टाचार यात बदल करण्यासाठी विनंती अर्ज सादर केला. महावितरण कं. लि.चे वर्ष २००१-०२ ते २००६-०७ या वर्षातील मागणी व पुरवठ्याची स्थिती खालीलप्रमाणे होती.

तपशिल	**२००५-०६**	**२००६-०७**	**२००७-०८**
मागणी (मे.वॅ.)	१४०६१	१४८२५	१५६८९
उपलब्धता (मे.वॅ.)	९८५६	१०२९८	१०४१२
कमतरता (मे.वॅ.)	४२०५	४५२७	५२७७

दिनांक २६ ऑगस्ट, २००६ रोजी उत्तरेच्या वीज जाळ्याचे संकलन (synchoonization) राष्ट्रीय / मध्यवर्ती केंद्रीय वीज जाळ्याशी झाले. त्यामुळे देशाच्या पूर्व प्रदेशातून पश्चिम प्रदेशाला मिळणारी प्रती दिवशी २५ ते ३० दशलक्ष युनिटची जादा उपलब्धता प्रती दिवशी फक्त १० दशलक्ष युनिट अशी कमी झाली.

वीजेची मागणी वाढली तेव्हाच उपलब्धता कमी असल्याने भार नियमनाचा कालावधी वाढवावा लागला. भार नियमन केल्यानंतरही उपलब्धता कमीच असल्याने मागणी व पुरवठा यातील अंतर भरुन काढता येत नव्हते. यामुळे वेळापत्रकात नसलेल्या अति उच्च व्होल्टता उघडून काही ठिकाणचा वीज पुरवठा सक्तीने बंद करावा लागत असे. यामुळे जनतेत असंतोष वाढून तो महाराष्ट्रात बऱ्याच ठिकाणी मोर्चा, घेराव, जन आंदोलने याद्वारे प्रकट झाला.

मागणी व पुरवठा यातील अंतर आणखी वाढल्याने महावितरण कंपनीने दिनांक १२ एप्रिल, २००७ रोजी महाराष्ट्र राज्यातील भार नियमनाची तत्वे व शिष्टाचार यात सुधारणा करण्यासाठी एक विनंती अर्ज दाखल केला. एप्रिल, २००७ या महिन्यात मागणी व पुरवठा यातील फरक खालीलप्रमाणे होते.

कालावधी	मागणी (मे.वॅ.)	उपलब्धता (मे.वॅ.)	तूट (मे.वॅ.)
सकाळ शिखर मागणी	१५०००-१५५००	८०००-९०००	६५००-७५००
सायंकाळ शिखर मागणी	१४५००-१५०००	९०००-९५००	५५००-६०००

उपलब्ध पुरवठा महानिर्मिती कंपनी कडून होणारा उपलब्धता सक्तीचे / नियोजित निर्मिती बंद करण्यामुळे मोठ्या प्रमाणात कमी झाली नवीन परळी (२५० मे.वॅ.) या केंद्राचे नुकतेच संकलन झाले असले तरी तेथे प्रारंभी काळात उद्‌भवणाऱ्या समस्या असल्याने तेथे केवळ ३०-३५ मे.वॅ.वीज निर्मिती होत होती व तिची माहिती दिली जात असे.

कोयनाचे पाण्याच्या मर्यादा :-

उरण वायु वीज निर्मिती केंद्र पूर्ण क्षमतेने कार्यरत होते. रत्नागिरी गॅस व पॉवर कं. (RGPPL) येथील विजेची उपलब्धता दिनांक ६ जानेवारी, २००७ पासून ७०० मे.वॅ. वरुन ३५० मे.वॅ. अशी कमी झाली.

प्रणालीची वारंवारता (Frequency) ही ४९.०० ते ४९.५ हर्टस (Hz) या दरम्यान होती. वारंवारता कमी होण्याचे एक कारण म्हणजे उत्तर भाग-पूर्व भाग यात २६ ऑगस्ट, २००६ पासून समांतरकरण झाल्याने (paralleling) उत्तर भागातील राज्यांनी जादा वीज खेचून घेणे हे होय. मार्च, २००७ या महिन्यात अशी वारंवारता कमी होणाचे (UFR) घटना ५० वेळा झाल्या. वीज जाळ्याच्या आचार संहितेनुसार प्रणाली ४९.०० ते ४९.५ हर्टस असताना त्यात खेचण्यासाठी जादा वीज उपलब्ध नसायची.

जरी महावितरण कं.लि. ने जेथे उपलब्ध असेल तेथून वीज खरेदी करण्याचे प्रयत्न केले. पण बाजारात योग्य दरात विक्रिसाठी वीज उपलब्ध नव्हती. त्यामुळे महाविरणकडे वीज पुरवठ्याचे व्यवस्थापन करण्यासाठी भार नियमनात सुधारणा करण्याशिवाय अन्य पर्याय नव्हता. उपलब्धता व मागणी यातील बदल व तूट यांची सांगड घालण्यासाठी महावितरणला वेळोवेळी भार नियमन कार्यक्रमात सुधारणा करावी लागते. म्हणून महावितरणने त्यासाठी विनंती अर्ज सादर केला.

१०.३ शासन कंपनीच्या उत्तराशी सहमत आहे.

११.१ विद्युत खरेदी करार व्यवस्थापन (२.३.११) :- कंपनीने २००३-०८ या कालावधीमध्ये रुपये ६०,८६७.६४ कोटी किंमतीची ३,४४,०९२.२१ दशलक्ष युनिट वीज दिर्घ मुदतीच्या स्त्रोतामार्फत व रुपये २,८०४.६३ कोटी किंमतीची ७,०६७.१६ दशलक्ष युनिट वीज लघु मुदतीच्या स्त्रोतामार्फत खरेदी केली होती. त्याचा तपशील परिच्छेद क्रमांक २.३.१० मध्ये देण्यात आलेला आहे. लेखापरीक्षण छाननीत खालील बाबी आढळून आल्या.

- वीजेची खरेदी २००३-०४ मधील ६८,७५९.२९ दशलक्ष युनिटवरुन २००७-०८ मध्ये ७८,५९७ दशलक्ष युनिट एवढी म्हणजे १४.३० टक्के वाढली होती तर वीज खरेदीवरील खर्च २००३-०४ मधील रुपये ८,७१६.२६ कोटीवरुन २००७-०८ मध्ये रुपये १७,००६.३८ कोटी एवढा वाढला होता म्हणजेच वित्तीय खर्च ९५.११ टक्क्यांनी वाढला होता.
- एसईआरसीने मंजूर केलेल्या २.१२७ दशलक्ष युनिट वीज खरेदीच्या ऐवजी कंपनीने २००५-०६ या वर्षात २,६९६.१६ दशलक्ष युनिट एवढी वीज पीटीसीस्कडून खरेदी केली होती.
- एमएसपीजीसीएल या सहयोगी कंपनीमध्ये विद्युत केंद्राची क्षमता वाढविण्यासाठी विहित निर्मिती बंद असल्यामुळे २००५-०६ या वर्षामध्ये ८,४२० दशलक्ष युनिटचा तुटवडा वीज निर्मितीमध्ये झाला होता.
- २००३-०८ या कालावधीमध्ये एमईआरसीने मंजूर केलेल्या ३,३९,५०८.०० दशलक्ष युनिट वीज खरेदीच्या तुलनेत प्रत्यक्ष वीज खरेदी ३,५१,१५९.३७ दशलक्ष युनिट एवढी करण्यात आली होती. एमईआरसीने मंजूर केलेल्या वीज खरेदीपेक्षा जास्त वीज खरेदी करुन देखील कंपनीला वाढीव वीज भारनियमन करावे लागले होते.

११.२ याप्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करतांना असे नमूद केले आहे की, वित्तीय वर्ष २००५-०६ मध्ये पूर्वी अस्तित्वात असलेल्या म.रा.वि.मंडळाचे विभाजन झाले आणि महानिर्मिती, महापारेषण आणि महावितरण अशा तीन कंपन्यांची

रचना करण्यात आली. त्यानंतर महावितरण कंपनी महापारेषण या कंपनीस "पारेषण आकार" भरु लागली. तसेच पूर्वी एकूण वीज खरेदी खर्चामध्ये फक्त इंधन वापर खर्चाची भर पडत असे तर त्रिभाजनानंतर महानिर्मिती कंपनीने महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगाने मंजूर केलेल्या दराप्रमाणे "ऊर्जा खर्च" वसूल केला. यामध्ये इतर सर्व खर्च म्हणजे घसारा, प्रशासन, नुतनीकरण व आधुनिकीकरण आर आणि एम आणि वित्तीय आकार आणि ROE याचा समावेश आहे. यामुळे वीज खरेदी खर्चात अतोनात वाढ झाली.

११.३ शासन कंपनीच्या उत्तराशी सहमत आहे.

स्वस्त स्त्रोतामधून कमी वीज घेणे (२.३.१२)

१२.१ दिर्घ मुदतीच्या वीज खरेदी कराराच्या छाननीमध्ये खालील बाबी आढळून आल्या :

केंद्रीय निर्मिती केंद्रामधून (सीजीएसस्) विजेचे वाटप सीईआरसीच्या मान्यतेसह विद्युत मंत्रालयाद्वारे अग्रिमरित्या ठरविण्यात येते. एनटीपीसी व एनपीसीआयएलकडून २००५-०८ या कालावधीत खरेदी करण्यात आलेल्या विजेची सरासरी किंमत रुपये ०.८५ व रुपये २.८८ प्रति युनिट यामध्ये होती असे निदर्शनास आले की एनटीपीसी व एनपीसीआयएल यांच्या केंद्रिय निर्मिती केंद्रामधून स्वस्त दराने नियतवाटप करण्यात आलेली संपूर्ण वीज पूर्णपणे घेण्यात आली नव्हती व त्याऐवजी रुपये २.९२ व ५.१८ प्रति युनिट या महागड्या वीजेची खरेदी पीटीसीस्कडून करण्यात आली होती. कंपनीने नियतवाटप करण्यात आलेल्या विजेच्या तुलनेत प्रत्यक्षात किती वीज मिळाली याचे नियतकालिक निर्धारण केले नव्हते. २००५-०८ या कालावधीत १,६६१.९० दशलक्ष युनिट कमी वीज घेण्यात आली होती. जर कंपनीने केंद्रीय स्त्रोतामार्फत नियमवाटप केलेली वीज संपूर्णपणे घेतली असती तर रुपये ३७४.७९ कोटीचा वीज खरेदी खर्च वाचविणे शक्य होते असे लेखापरीक्षणाच्या निदर्शनास आले.

व्यवस्थापनाने आपल्या उत्तरात (सप्टेंबर, २००८) ज्याची शासनाने पुष्टी केली होती (नोव्हेंबर, २००८) म्हटले होते की, लेखापरीक्षणाने प्रत्येक निर्मिती विद्युत केंद्रामधील कंपनीचा विजेचा वाटा काढतांना नॉरमेटीव्ह वीज निर्मिती विचारात घेतली होती, परंतु प्रत्येक वीज निर्मिती केंद्रामधील कंपनीचा विजेचा वाटा संचयित जाहीर उपलब्धता, गुणवत्ता आधारावर व प्रत्यक्ष वीज निर्मितीच्या आधारावरच ठरविला जातो. प्रत्यक्ष तथ्य असे होते की लेखापरीक्षणाने नॉरमेटीव्ह विद्युत निर्मिती विचारात न घेता विविध लाभधारकांना वितरणासाठी उपलब्ध असलेली वीजच विचारात घेतली होती.

१२.२ याप्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करतांना असे नमूद केले आहे की, प्रत्येक घटकाकडून वीज घेण्याचे प्रमाण भारत सरकारचे वीज

मंत्रालयाने निश्चित केलेले आहे. त्यानुसार महावितरण कंपनी लिमिटेडला देण्यात आलेला विजेचा वाटा जोडपत्र "अ" येथे दर्शविण्यात आला आहे. प्रत्येक घटकाकडून वीज घेण्याचे प्रमाण भारत सरकारचे वीज मंत्रालयाने निश्चित केलेले आहे. प्रत्येक दिवशी राष्ट्रीय औष्णिक विद्युत महामंडळ (NTPC) यांचे प्रत्येक वीज निर्मिती केंद्र त्याची दुसऱ्या दिवशीची विजेची उपलब्धता भार प्रेषण केंद्राला जाहीर करतो. महावितरण चा वाटा हा या जाहीर केलेल्या विजेच्या समतेनुसार मोजला जातो. प्रत्यक्ष वीज निर्मितीनुसार नाही. त्याप्रमाणे महावितरण एकूण मागणी, पुरवठा व विजेचा दर याचा विचार करुन विजेची सूची / पत्रक ठरविते. महावितरण कंपनी विजेची खरेदी ही गुणवत्तेच्या क्रमानुसार करण्याचे धोरण आहे. सामान्यत: महावितरण कंपनीने केंद्रीय स्त्रोताकडून मिळणारा विजेचा वाटा पूर्णपणे स्वीकारला आहे. मात्र काही वेळा प्रत्यक्ष वेळेची गरज आणि वीज जाण्याची स्थिती यानुसार वीज निर्मिती व मागणी यात सुधारणा करण्यात येते व संपूर्ण विजेचा वापर होत नाही. हवामानात वातावरणात होणाऱ्या आकस्मिक बदल झाल्यास विजेची मागणीही त्याप्रमाणे बदलते. वीज जाळ्याची वेळेवरची वारंवारता आणि वीज जाळ्याची शिस्त व आचारसंहिता याचाही विचार केला जातो. मागणीत होणाऱ्या अशा बदलामुळे वीज व्यापाऱ्यांकडील वीज खरेदी अशी एकाएकी बदलता येत नाही. कारण त्यामुळे दंड भरावा लागू शकतो व विजेच्या खुल्या प्राप्तीच्या नियमांचा भंग होतो. खुल्या वीज प्रवेशमार्ग रद्द करण्यासाठी किमान दोन दिवस आगाऊ पूर्वसूचना द्यावी लागते. (पूर्वी ५ दिवस) तर वीज प्रणाली व उपलब्ध वारंवारता याचा विचार करुन केंद्रीय वीज निर्मिती केंद्र वीज मागणीमध्ये काही तासात वीज जाळ्याची शिस्त पाळण्यासाठी सुधारणा करावी लागते.

म्हणून कंपनीने केंद्रीय निर्मिती केंद्राकडून कमी प्रमाणात वीज घेतली व व्यापाराकडून जादा दराची वीज घेऊन तुटीची भरपाई केली असा निष्कर्ष काढणे योग्य नाही.

जेथे REA यापासून युनिट्स व भागांची टक्केवारी यात फरक आहे (PGCIL विवरणपत्र) त्याबाबतच्या शासकीय लेखा परिक्षकाच्या विधानात सुधारणा केली आहे. सुधारित विवरण पत्र यामध्ये वर्ष २००५-०६, २००६-०७ आणि २००७-०८ विजेची वेळापत्रकानुसार निर्मिती, जाहीर केलेली निर्मिती, महावितरणचा हिस्सा आणि वापरलेली वीज हे दर्शविले असून ते (जोडपत्र-अ) येथे जोडले आहे. तीन वर्षासाठी महावितरणचा एकूण वाटा ३९४२७ दशलक्ष युनिट होता. त्यापैकी महावितरणने ३९२७७ दशलक्ष युनिट वापरले यावरून १५० दशलक्ष युनिट वीज कमी घेतली ती संपूर्णपणे वीज जाळ्याचे त्यावेळीचे असलेले प्रत्यक्ष कार्य व स्थिती यास अनुसरुन आहे.

१२. ३ :- वीज वितरण कंपनीने सादर केलेल्या स्पष्टीकरणाशी शासनाने सहमती दर्शविली आहे.

१२. ४ महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी व ऊर्जा विभाग यांनी सादर केलेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक व इतर अधिकारी यांची दिनांक २५ सप्टेंबर, २०१२ रोजी विधान भवन, पुणे येथे साक्ष घेतली. समितीने महालेखाकारांनी घेतलेल्या परिच्छेद क्रमांक २.३.१ ते २.३.१२ यांचा एकत्रितपणे विचार केला. त्याबाबत अधिक स्पष्टीकरण देतांना वीज वितरणच्या व्यवस्थापकीय संचालक यांनी सांगितले की, वीज खरेदी कमी कालावधीकरिता मध्यम कालावधीकरिता व दिर्घकालीन कालावधीकरिता अशा तीन प्रकारे केली जाते. कमी कालावधी १ वर्षासाठी असतो, मध्यम कालावधी १ ते ७ वर्षासाठी असतो व दिर्घकालीन कालावधी ७ ते २५ वर्षासाठी असतो. कमी कालावधी हा दिवसाच्या लागणाऱ्या वीज वापरावर अवलंबून असून त्याचा आढावा घेऊन वीज खरेदी केली जाते व त्याचा दर निश्चित केला जातो. यासाठी कोणताही करार केला जात नाही. दिर्घ मुदतीच्या करारामध्ये अटी व शर्तीचा भंग होत नाही. त्यामध्ये वेगवेगळ्या कंपनीचे विज खरेदीचे दर निश्चित असतात. वीज खरेदी करण्यासाठी निविदा प्रक्रिया अवलंबिली जात असते. सन २००६-०७ पासून खाजगी वीज निर्मिती करणाऱ्या कंपन्याबरोबर देखील निविदा प्रक्रिया अवलंबून वीज खरेदीचे करार केले गेले आहेत असे स्पष्ट केले. कमी-जास्त दराने वीज खरेदी केल्याने महाराष्ट्र राज्य वितरण कंपनीला जवळ-जवळ ३७५ कोटी रुपये जास्त खर्च करावे लागले व त्यापोटी अवाजवी दराने वीज खरेदीचा भार सामान्य जनतेला सोसावा लागला आहे. याबाबत स्पष्टीकरण करण्याविषयी समितीने सांगितले असता, व्यवस्थापकीय संचालक यांनी सांगितले की, विजेची मागणी दिर्घ कालावधीसाठी असली तर वीज खरेदीचा अंदाज बांधता येतो परंतु अचानक तांत्रिक बिघाडामुळे वीज निर्मिती कमी पडली तर वीज पुरवठा सुरळीत राहण्याच्या दृष्टीने तात्काळ बाहेरील वीज खरेदी करावी लागते व त्याचा अंदाज बांधता येत नाही. वीज निर्मिती कंपनी ही दर १५ मिनिटांनी उपलब्ध असणारी वीज ही संगणकाद्वारे दाखवित असते तर वीज वितरण कंपनी ही मागणी व सद्यस्थितीत मिळणारी वीज याचा आढावा घेऊन दर १५ मिनिटांनी वीजेची मागणी नोंदवत असते. यामुळे याचे दर हे निश्चित करता येत नाहीत. त्यामुळे विजेच्या खरेदीच्या दरात तफावत आढळत असते. खाजगी वीज निर्मिती करणाऱ्या कंपन्यांचा दर हा सरकारी वीज निर्मिती करणाऱ्या कंपन्यांच्या दरापेक्षा नेहमी जास्त असतो. त्यामुळे लेखापरीक्षणाच्यावेळी वीज खरेदीच्या दरामध्ये तफावत आढळत असल्यामुळे महालेखाकारांकडून आक्षेप घेतला जात असतो व त्यासाठी ते संपूर्ण वर्षाचा कालावधी विचारात घेत असतात.

लेखापरीक्षणाच्यावेळी वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांकडून महालेखाकार कार्यालयाच्या अधिकाऱ्यांना त्यांच्या आक्षेपासंबंधी विस्तृत प्रमाणात माहिती दिली जात नाही. त्यामुळे लेखापरीक्षणामध्ये आक्षेप नोंदविले जातात. याबाबत आपले काय मत आहे असे समितीने विचारले असता, व्यवस्थापकीय संचालक यांनी सांगितले की, वीज वितरण कंपनीमध्ये कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांना कंपनीच्या कार्यप्रणालीची माहिती आहे परंतु याबाबत समन्वय न झाल्याची शक्यता असल्यामुळे अशा बाबी घडल्या असण्याची शक्यता नाकारता येत नाही असे त्यांनी स्पष्ट केले. याबाबत सीइआरसीद्वारे वीजेचे दर निश्चित केलेले असून ते दर विजेच्या मागणी व पुरवठा यावर अवलंबून असतात. हे दर कमी कालावधीसाठी खरेदी करणाऱ्या विजेसाठीच असतात असे त्यांनी स्पष्ट केले. समितीला याबाबत अधिक स्पष्टीकरण देतांना महावितरणच्या (संचालन) अधिकाऱ्यांनी अधिक स्पष्टीकरण केले की, कायद्यानुसार आपल्याला पवन ऊर्जाद्वारे निर्मिती होणारी वीज ठराविक प्रमाणात घ्यावी लागते. राज्यामध्ये पवनऊर्जेद्वारे साधारणत: २२०० मे.वॅ.ची निर्मिती होत असून त्याचा खरेदीचा दर साधारणत: ५ रुपये आहे. पावसाच्या कालावधीत पवन ऊर्जाद्वारे चांगली वीज निर्मिती होत असते. उर्वरित कालावधीत त्याचे प्रमाण कमी असते. यासाठी सौर ऊर्जेतून मिळणारे उत्पन्न लक्षात घेऊन राज्य शासनाने महाजेनकोद्वारे सौर ऊर्जेचे प्रकल्प उभारण्याचा निर्णय घेतलेला आहे. फक्त नैसर्गिक वातावरणामुळे सौर ऊर्जेवरती संपूर्णपणे विसंबून राहता येत नाही. खाजगी कंपन्याकडून वीज खरेदी करण्यापेक्षा शासनाच्या अखत्यारित असलेल्या कंपन्यांकडून वीज खरेदी करावी जेणेकरुन शासकीय कंपन्यांना त्याचा नफा मिळू शकेल असे शासनाचे धोरण आहे. महालेखाकारांच्या आक्षेपावरुन त्यावेळी कार्यरत असलेल्या महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी व्यवस्थित माहिती दिली नसावी त्यामुळे वीज खरेदीच्या व्यवहारापोटी झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत आक्षेप घेतला गेलेला आहे. याबाबत महावितरण कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालकांनी देखील संचालक (संचालन) यांच्या खुलाशावर सहमती दर्शविली.

समितीने महामंडळाच्या खुलाशामध्ये सन २००५-०६ ते सन २००७-०८ या तीन वर्षाच्या कालावधीत महावितरणचा एकूण वाटा ३९,४२७ दशलक्ष युनिट इतका असताना त्यापैकी महावितरण कंपनी ३९,२७७ दशलक्ष युनिट इतकीच वीज खरेदी केली. यानुसार १५० दशलक्ष युनिट विज ही खाजगी कंपन्यांकडून विकत घेतली आहे हे निदर्शनास आणले असता, याबाबत व्यवस्थापकीय संचालक यांनी सहमती दर्शविली. राज्यातील सद्य:स्थितीतील विजेची परिस्थिती विशद करतांना व्यवस्थापकीय संचालक यांनी सांगितले की, सद्य:स्थितीत ११,००० ते ११,५०० मे.वॅ. इतकी विजेची मागणी आहे. जेनको कंपनीकडे औष्णिक विज निर्मितीतून साधारणत: ५,००० मे.वॅ. इतकी विज निर्मिती होते. त्यासाठी कोळसा ज्याप्रमाणात उपलब्ध व्हावयास पाहिजे त्याच्या उपलब्धतेवर विज निर्मिती अवलंबून

आहे. आगामी काळात महाराष्ट्रातील वीज निर्मितीचे काही प्रकल्प कार्यान्वित होणार आहेत. या एकंदरीत सर्व बाबींचा विचार करता, साधारणत: ३,००० मे.वॅ. विजेचा तुटवडा खाजगी कंपन्यांकडून वीज खरेदी करुन भरुन काढावा लागेल. डिसेंबर, २०१२ पर्यंत राज्य भारनियमनमुक्त होईल याबाबत स्पष्टीकरण करण्याविषयी समितीने सांगितले असता, व्यवस्थापकीय संचालक यांनी सांगितले की, कृषी क्षेत्रासाठी दिवसा ८ तास व रात्री १० तास वीज उपलब्ध होईल. काही ठिकाणी सिंगल फेजचे काम सुरु असल्यामुळे रात्री वीज उपलब्ध करुन देता येईल. तसेच गावठाण फिडर सेपरेशनचे काम काही ठिकाणी झालेले असल्याने त्याठिकाणी देखील वीज उपलब्ध करुन देता येईल. उद्योगधंद्यासाठी २४ तास विजेचा पुरवठा केला जातो. कृषी क्षेत्रासाठी असलेल्या विजेच्या पुरवठ्याची वेळेबाबत पडताळणी करावी लागेल. ज्याठिकाणी ३४ टक्क्यापेक्षा कमी तोटा आहे अशा ठिकाणी भारनियमन नाही. त्यापेक्षा जास्त टक्केवारी असलेल्या ठिकाणी त्याच्या वर्गवारीनुसार भारनियमन केले जात आहे. ह्या वर्गवारीमध्ये बदल करुन त्याच्या वरच्या श्रेणीच्या संवर्गामध्ये आणून भारनियमन कमी करण्याचा प्रयत्न सुरु आहे. शेती व गरीब लाभार्थींना वीज पुरवठ्यात सवलत मिळण्याच्या दृष्टीने त्याचा भार औद्योगिक ग्राहक, हॉटेल, मॉल, मल्टीप्लेक्स चालक, होर्डिंग्स, इ. कडून जास्त दर आकारुन वसूल केला जातो. राज्यामध्ये उद्योगाला जास्त महाग दराने वीज दिली जात आहे. राज्यातील १ कोटी १० लक्ष वीज ग्राहकांना तुटीच्या दराने वीज पुरवठा केला जात असल्याचे व्यवस्थापकीय संचालक यांनी स्पष्ट केले.

वीज चोरी व गळती यामध्ये सुसूत्रता आणल्याशिवाय आपण ठरविलेल्या सूत्रानुसार भारनियमन पूर्णपणे कमी होणार नाही याकडे समितीने लक्ष वेधले असता, व्यवस्थापकीय संचालक यांनी सांगितले की, वीजचोरीमुळे तोट्याच्या प्रमाणात जास्त वाढ होते व त्यावर लक्ष ठेवण्यासाठी स्थानिक अधिकाऱ्यांकडून कार्यप्रणालीचा वापर केला जातो. त्यामुळे यामध्ये भविष्यकाळात बदल होण्याची शक्यता आहे. शेतकऱ्यांना विजेची जोडणी त्वरेने दिली जात नाही याकडे समितीने लक्ष वेधले असता, व्यवस्थापकीय संचालक यांनी सांगितले की, सद्य:स्थितीत मिटरचा पुरवठा व्यवस्थित सुरु असल्यामुळे नवीन विज जोडणी देण्यात काहीही अडचण येणार नाही. वीजचोरी टाळण्याच्या दृष्टीने आधुनिक पध्दतीनुसार कार्यकारी अभियंता, शाखा अभियंता, लाईनमन यांना फिडरनिहाय जबाबदारी दिली असल्याने त्यांनी ठरलेल्या सुत्रानुसार बदल घडवून आणून भारनियमन व विजचोरी कमी करण्याचे उद्दिष्ट त्यांना ठरवून देण्यात आलेले आहे. हे उद्दिष्ट जे कर्मचारी पूर्ण करणार नाहीत त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. फिडरनिहाय संपूर्ण माहिती आता संगणकाद्वारे उपलब्ध होत असल्यामुळे त्यामध्ये पडताळणी करुन त्याबाबतचा निर्णय त्वरेने घेतला जातो असेही त्यांनी बैठकीच्या वेळी स्पष्ट केले.

१२. ५ अभिप्राय व शिफारशी :-

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी व ऊर्जा विभाग यांनी सादर केलेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक व इतर अधिकारी यांची दिनांक २५ सप्टेंबर, २०१२ रोजी पुणे येथे साक्ष घेतली. समितीने महालेखाकारांनी घेतलेल्या परिच्छेद क्रमांक २.३.१ ते २.३.१२ यांचा एकत्रितपणे विचार केला. महालेखाकारांनी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या कामकाजाबाबत "विद्युत खरेदी व्यवस्थापन" या शिर्षकाखाली आक्षेप नोंदविताना विद्युत पुरवठ्यामधील तुटवड्यामध्ये मागील काही वर्षातील पुरवठ्यावरुन वाढ झाल्याचे नमूद करुन बाहेरील संस्थेकडून महागडी वीज खरेदी करुन देखील विजेची गरज भागऊ न शकल्यामुळे विद्युत भारनियमन करावे लागले होते तसेच केंद्रीय स्त्रोतामधून मिळणारे कमी किंमतीच्या विजेचे पूर्ण नियम वाटप उपभोगले नाही त्यामुळे लघु मुदतीच्या आधारावर विद्युत खरेदी करावी लागल्यामुळे अतिरिक्त जादा खर्च केला गेला होता, असा आक्षेप नोंदविला होता. समितीसमोर साक्षीच्यावेळी या आक्षेपासंबंधाने साक्ष नोंदविताना असे दिसून आले की, विज खरेदीकरिता कमी कालावधी, मध्यम कालावधी व दिर्घकालीन कालावधी अशा प्रकारे विज खरेदी केली जात होती. कमी कालावधीच्या विज खरेदीसाठी कोणत्याही प्रकारे करार न करता प्रतिदिन उपलब्ध होणारी विज व करावा लागणारा पुरवठा याचे अत्यंत कमी कालावधीत परीक्षण करुन विज खरेदीचे व्यवहार केले जात होते, असे समितीला दिसून आले. सन २००६-०७ पासून खाजगी विज निर्मिती करणाऱ्या कंपन्याबरोबर देखील विज खरेदीचे करार केले गेले आहेत. अचानक उद्‌भवणाऱ्या विज निर्मितीच्या तांत्रिक कारणांमुळे विज पुरवठा खंडीत होत असेल तर विज खरेदी करावी लागते व त्याचे दर निश्चित स्वरुपात नसतात हे विभागाने केलेल समर्थन समितीला योग्य वाटत नाही. या व्यवहारामध्ये पारदर्शकतेचा अभाव असल्याचे समितीचे स्पष्ट मत आहे. महालेखाकारांकडून लेखापरीक्षण केले जात असतांना लेखापरीक्षणामध्ये उद्‌भवलेल्या बाबीचे योग्य स्पष्टीकरण कंपनीच्या अधिकाऱ्यांकडून दिले न गेल्यामुळे यासंबंधीचा आक्षेप महालेखाकारांनी नोंदविल्याबाबतची वस्तुस्थिती विभागाने देखील मान्य केली आहे. पवन ऊर्जा व सौर ऊर्जा यातून उत्पन्न होणारी विज खरेदी करणे कायदेशीरदृष्ट्या बंधनकारक असले तरी यामध्ये खाजगी विज निर्मिती करणाऱ्या कंपन्या जास्त असल्यामुळे त्यांचे दर देखील जास्तीचे लावले जात असतात. महाजेनकोद्वारे सौरऊर्जेद्वारे विज निर्मिती करणारे प्रकल्प उभारण्याचे ठरविले असल्यामुळे भविष्यात त्याचा लाभ मिळू शकेल याचे समितीला समाधान आहे. शासनाच्या धोरणानुसार व महालेखाकारांनी आक्षेपिलेल्या मुद्यानुसार शासनाच्या अखत्यारित असलेल्या व केंद्रीय स्त्रोतामधून मिळणारे विजेचे नियतवाटप पूर्ण उपभोगले असते तर त्याचा कंपनीला फायदाच झाला असता. जास्तीच्या दराने विज

खरेदी करावी लागल्यामुळे त्याचा वापर केल्यानंतर त्याचा भार ग्राहकांकडून वसूल केला जात असतो. महालेखाकारांनी देखील गेल्या काही वर्षातील विजेचा वापर व त्यानुसार खरेदी केलेली विज व त्याचे प्रमाण पाहता विद्युत वितरण कंपनीला करावे लागलेले भार नियमन याबाबत आक्षेप नोंदविला होता. ग्राहकाला विज पुरवठा करणे हे कंपनीला बंधनकारक आहे. त्यामुळे ग्राहकांवरती पडणाऱ्या या जादा खर्चाचा बोजा ग्राहकांना सोसावा लागणे अन्यायकारक आहे असे समितीचे मत आहे. केंद्रीय स्त्रोतांमधून कमी किंमतीद्वारे मिळणारे विजेचे नियतवाटप उपभोगणे अपेक्षित होते असा महालेखाकारांनी आक्षेप नोंदविला होता. **कंपनीने केंद्रीय स्त्रोतामधून स्वस्त मिळणारी विज विकत न घेता तसेच कंपनीचे स्वत:चे विज निर्मितीचे सुस्थितीतील संच बंद करुन ज्यादा दराने खाजगी विज कंपन्याकडून विज खरेदी करुन त्याचा भूर्दंड ग्राहकांवर लादला व पर्यायाने ग्राहकांना महागड्या दराने विजेचे देयके अदा करावी लागतात, ही जनतेची सरासरी लुट अथवा फसवणूक असल्याचे समितीचे मत आहे. यास्तव विज खरेदी प्रक्रीयेत समावेश असणाऱ्या सर्वसंबंधीत अधिकाऱ्यांनी ग्राहकांचे हित विचारात न घेता खाजगी कंपन्यांना कसा फायदा होईल या हेतूने विज खरेदी केल्याचे दिसून येते. सबब विज खरेदी प्रक्रीयेत समावेश असणाऱ्या सर्वसंबंधीत अधिकाऱ्यांची उच्चस्तरीय सखोल चौकशी करुन सर्वसंबंधीत अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करुन त्यांचे विरुध्द कठोर कारवाई करावी, अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे. तसेच महाराष्ट्र राज्य विज नियामक आयोग, शासनाचा ऊर्जा विभाग यांनी केंद्रीय विज आयोगाकडे व केंद्र शासनाकडे कमी कालावधीसाठी लागणारे विजेचे दर निश्चित स्वरुपाचे करण्याचे दृष्टीने आराखडा तयार करुन प्रस्ताव सादर करावा व त्याचा पाठपुरावा देखील करावा जेणेकरुन अवाजवी दराने विज खरेदीचा भार सामान्य जनतेला अनपेक्षितपणे सोसावा न लागता तो निश्चित स्वरुपात आकारला जाऊन त्यांच्यावर होणारा अन्याय दूर करता येईल व विज खरेदीच्या व्यवहारामध्ये वाणिज्यिक प्रथांचा वापर केल्यामुळे अधिक पारदर्शकता दिसून येण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी, अशी समितीची शिफारस आहे.** लेखापरीक्षणाच्या वेळेस कंपनीच्या अधिकाऱ्यांकडून लेखापरीक्षणाबाबत उपस्थित केलेल्या मुद्यांचे निराकरण त्वरेने करावे व त्यासाठी एक वरिष्ठ दर्जाचा अधिकारी नेमावा व सदर अधिकाऱ्यांवरती याबाबतची जबाबदारी सोपवावी. जेणेकरुन भविष्यकाळात महालेखाकारांच्या मुद्यांचे निराकरण झाल्यामुळे असे परिच्छेद त्यांच्या अहवालांमध्ये नमूद केले जाणार नाहीत व त्यादृष्टीने समितीचा देखील त्याचे परिक्षण करतांना वाया जाणारा अमूल्य वेळ वाचू शकेल. **शेतकऱ्यांना विजेची जोडणी त्वरेने मिळण्याच्या दृष्टीने विज जोडणीची मागणी केल्यानंतर ठराविक कालावधीत विज जोडणी दिली जाईल यादृष्टीने धोरण निश्चित करावे व त्याची अंमलबजावणी काटेकोरपणे केली जावी. भारनियमनाकरिता सद्य:स्थितीत वीज चोरी टाळण्याच्या दृष्टीने कंपनीचे अधिकारी जबाबदारीनुसार**

त्यांना आखून दिलेल्या उद्दिष्टानुसार ते जबाबदारी पार पाडत आहेत की नाही याची आधुनिक पध्दतीनुसार पडताळणी संगणकाद्वारे उपलब्ध होत असल्यामुळे प्रतिदिन याचा आढावा घेऊन जे कर्तव्यामध्ये कसूर करत असतील अशा कर्मचाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचे धोरण ठरविण्यात आलेले आहे. त्याची कडकपणे अंमलबजावणी करावी अशीही समितीची शिफारस आहे. याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्याच्या आत देण्यात यावी, अशीही समितीची शिफारस आहे.

******

महाराष्ट्र राज्य विज निर्मिती कंपनी मर्यादित

एक : निष्फळ खर्च :

१.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००७-२००८ च्या (वाणिज्यिक) अहवालातील प्रकरण क्रमांक तीन मधील परिच्छेद क्रमांक ३.७ मध्ये "निष्फळ खर्च" यासंबंधात महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले आहेत.

महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित (कंपनी) ने भुसावळ, चंद्रपूर, कोराडी, नाशिक व परळी या पाच औष्णिक विद्युत केंद्रामध्ये (टीपीएस) २१० मे.वॅट प्नेयुमॅटिक पध्दतीची कोळसा मिल रिजेक्ट हाताळणी पध्दती मधील (सीएमआरएचएस) च्या १२ एककांचे अभियांत्रिकीकरण, पुरवठा व स्थापना व ते चालू करण्यासाठीच्या कामाच्या जागतिक निविदा मागविल्या (मार्च २००३) होत्या. सीएमआरएचएस ही एक सध्या हाताने हाताळाच्या पध्दतीच्या बदल कोळसा रिजेक्ट गोळा करणे व वाहतुकीकरण साठवणूकीच्या ठिकाणी यासाठीची (टणक सामानाने कोळसा मिल मध्ये बारीक होऊ शकत नाही.) स्वयंचलित प्रणाली होती. या पध्दतीमध्ये परीक्षा खर्च कमी होणे व दोषरहित पर्यावरण हे अपेक्षित होते. कंपनीला फक्त एकच बोली मिळाली होती व त्यानुसार मॅकॅवेबर बीके खाजगी मर्यादित, (एमबीपीएल) यांना रुपये १८.१७ कोटीचा भुसावळ रु. ३.२९ कोटी, चंद्रपूर रु. ३.२९ कोटी, कोराडी रु. ४.१७ कोटी, नाशिक रु. ४.२७ कोटी व परळी रु. ३.१५ कोटी कळ फिरवणे आधारावर कामाच्या अंमलबजावणी करण्याचा मागणी आदेश देण्यात आला (नोव्हेबर २००३) होता. कराराच्या तरतुदीनुसार कंत्राटदाराला संयंत्राचा पुरवठा केल्यानंतर ८० टक्के प्रदान व उर्वरीत प्रदान (१० टक्के व पाच टक्क्याचे दोन हप्ते) अनुक्रमे संस्थापना, प्रायोगित चालन व अंतिमरित्या मालकाने स्वीकारल्यानंतर करावयाचे होते.

लेखापरीक्षणात निदर्शनास (जून २००७) आले की, कंपनीला अशी पध्दती स्थापित करण्याचा कोणताही अनुभव नव्हता. त्याशिवाय ही पध्दती स्थापित करण्यासाठी कंपनीला एकच बोली प्राप्त झाली होती. असे असतांनाही एक दोन एककांमध्ये यशस्वी प्रयोग झाल्यानंतर टप्प्याटप्प्याने स्थापनेचा आदेश देण्याऐवजी सर्व पाच औष्णिक विद्युत केंद्रामध्ये १२ एकक बसविण्याच्या कामाचे आदेश एकाच बोलीदाराला देण्यात आले होते.

असे निदर्शनास आले की, एमबीपीएल सीएमआरएचएस चे कार्यचालन नियत तारखेला (ऑक्टोबर २००४) व नंतर सुधारीत केलेल्या जून २००६ ला करणे शक्य झाले नव्हते. कालमर्यादेमध्ये वाढ देऊनही एमबीपीएलने काम पूर्ण केले नव्हते. काम पूर्ण करण्याच्या नियत तारखेनंतर तीन वर्षाचा

कालावधी जाऊन देखील एमबीपीएल कोराडी औष्णिक केंद्राचा अपवाद वगळता सीएमआरएचएसच्या कामकाजाची खात्री करु शकली नव्हती. ज्या चार औष्णिक केंद्रामध्ये सीएमआरएचएस कार्यान्वित झाले नव्हते त्याबाबत कंपनीने एमबीपीएलला रुपये १२.०६ कोटीचे प्रदान केलेले होते. अशारितीने, तंत्रशास्त्राची तपासणी न करता सर्व औष्णिक विद्युत केंद्रासाठी सीएमआरएचएसची खरेदी / स्थापना करण्याच्या घाईघाईने घेतलेल्या विवेकहीन निर्णयामुळे रुपये १२.०६ कोटीचा वायफळ खर्च झाला होता. त्या शिवाय कमी परिरक्षा खर्च व दोषरहित पर्यावरण हे अपेक्षित फायदे देखील साध्य झाले नव्हते व करारित श्रमिक लावून कोळसा रिजेक्ट हाताळणीचे काम मानवीय तऱ्हेने करणे चालूच होते.

व्यवस्थापनाने आपल्या उत्तरांत (मे २००८) ज्याची शासनाने पुष्टी केली होती (जून २००८) स्विकारले होते की, पुरवठा व कंत्राटदाराने काम पूर्ण करण्यामधील काही विलंब कार्यान्वित औष्णिक केंद्रामध्ये चालू असलेल्या कोळसा मिल बंद करण्यास न मिळाल्यामुळे झाला होता. त्यांनी पुढे असेही म्हटले होते की, कराराच्या तरतुदीनुसार लवादाची नोटीस जारी करुन कंत्राटदार दबाव वाढवित होता. सीएमआरएचएस ज्यासाठी कंपनीने २००३ मध्ये मागणी आदेश दिले होते त्या पाच औष्णिक विद्युत केंद्रापैकी चार औष्णिक विद्युत केंद्रामध्ये ही कार्यपध्दती अद्याप कार्यान्वित झालेली नव्हती, कंपनीकडे यापध्दतीत कोणताही मागील अनुभव नव्हता व निविदामध्ये फक्त एकच बोली प्राप्त झाली होती याबाबींचा विचार करता कंपनी एक दोन एककांमध्ये यशस्वी कार्यचालन झाल्यानंतर टप्प्याटप्प्याने मागणी आदेश द्यावयास हवे होते. त्याशिवाय ८० टक्के प्रदान मालाची पोहचवणी केल्यानंतर देण्याच्या तरतुदीमुळे कंपनीला आपले वित्तीय हित जपण्यात अपयश आले होते. पध्दती यशस्वीरित्या कार्यान्वित होण्यास जास्त महत्व देऊन हे प्रदान कमी करावयास हवे होते.

१.२ या प्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करतांना असे नमूद केले आहे की, न्यूमॅटीक पध्दतीची कोळसा मिल रिजेक्ट हाताळणी पध्दती (सीएमआरएचएस) हे काही नवे तंत्रज्ञान नाही. कारण हे तंत्रज्ञान नॅशनल थर्मल पॉवर कार्पोरेशनचे त्यांच्या बदरपूर विजनिर्मिती केंद्रातील २१० मे. वॅट क्षमतेच्या एककात फार पूर्वीपासून म्हणजे १९९१ मध्ये आणि एस.टी.पी.पी. सिम्हाद्री येथील ५०० मे.वॅ. क्षमतेच्या एककात वापरले होते. ही पध्दती मे. मॅकॅवेबर बी.के.प्रा.लि. यांनी स्थापीत केली होती. आमच्या अभियंत्यांच्या पथकाने या पध्दतीचा अभ्यास करण्यासाठी आणि मे.मॅकॅवेबर बी.के.प्रा.लि. यांचा मराविमच्या वीजनिर्मिती केंद्रासाठी ऑर्डर देण्यापूर्वी तिचे कार्यपध्दती समजावून घेण्यासाठी या (एनटीपीसीच्या) वीजनिर्मिती केंद्राना भेट दिली होती. या पथकाने अहवाल दिला की, मे.मॅकॅवेबर बी.के.प्रा.लि. यांना वरील वीजकेंद्राच्या स्थापन केलेल्या

पध्दतीचे कार्य सर्वसाधरणपणे समाधानकारक आहे. आता त्यांच्या कार्यपालनाचा अहवाल / अनुभवाची माहिती शासकीय लेखापरीक्षण कक्षाकडे पाठविण्यात आली होती. कोल माईन रिजेक्ट हॅडलींग सिस्टीम हे ५ वीज निर्मिती केंद्रात म्हणजे नाशिक, भुसावळ, कोराडी, परळी आणि चंद्रपूर येथील ७२ कोळसा गिरण्यांसाठी स्थापन करण्यासाठी निविदा प्रसारीत करण्यात आली होती. त्यासाठी मे मॅकवेबर बी.के. यांचाच केवळ एकमेव बोली प्रस्ताव आला. तेव्हा पुनः निविदा काढण्यासाठी वेळ लागेल आणि सदर फर्मने देऊ केलेला दर अंदाजे खर्चाच्या आतच आहे. याबाबींचा विचार करुन सर्व पाच विज केंद्रासाठी मे.मॅकॅवेबर बी.के. यांना मागणी आदेश देण्यात आला. महाराष्ट्रात विज टंचाई असल्यामुळे कोळशाच्या गिरण्या ह्या कंत्राटाच्या कामाला उपलब्ध करुन देणे शक्य झाले नाही. कारण या कंत्राटानुसार सदर काम रिट्रोफिट पाईपचे असून त्यासाठी कंत्राटदारास वीज केंद्रांनी कोळशाच्या गिरण्या बंद करुन उपलब्ध करुन द्यायच्या होत्या त्यांच्या उपलब्धतेनुसार मे. मॅकॅवेबर बी.के. यांनी यांची पध्दती स्थापन केली म्हणून काम करण्याची जागा उशिरा मोकळी केल्याने सदर काम संस्थेला त्यांच्या वेळेच्या व्याप्तीमध्ये पूर्ण करता आले नाही. तसेच संस्थेला काम पूर्ण करणे व पुरवठा करणे यातही विलंब झाला. ही पध्दती ज्या जुन्या २१० मेगावॅट एककात स्थापन करावयाची होती तेथे रिजेक्टचे प्रमाणे ५०० किलो ते २००० किलो / तास / गिरणी असे बदलते होते. अशी माहिती विविध जागेवरुन मिळाली. कोळशाचा दर्जा कमी स्तरावरील असल्यामुळे आणि रिजेक्टचे प्रमाण खूप जास्त असल्यामुळे तेथे समस्या वाढून ही पध्दती योग्य प्रकारे काम करु शकली नाही. मे.मॅकॅवेबर बी.के. यांनी पध्दतीमध्ये आवश्यक ते बदल केल्यानंतर कोराडी औ.वि.केंद्रातील प्रणाली योग्य प्रकारे काम करीत आहे. असेच बदल इतर वीज केंद्रातही करण्यात आले. या बदलानंतर परळी एकक (युनिट) -३ आणि भुसावळ युनिट-३ येथील कोल मिल रिजेक्ट हॅन्डलींग प्रणाली समाधानकारक रित्या कार्यरत आहे. अशाच सुधारणाचे काम नाशिक व चंद्रपूर येथील वीज केंद्रातही करण्यात येत असून या औ.वि.केंद्रातही ही पध्दत या बदलानंतर समाधानकारकरित्या कार्यरत होईल. मे. मॅकॅवेबर बी.के. यांनी सदर पध्दती कार्यान्वित करण्यास विलंब लावल्यामुळे या कार्यालयाने निर्धारित नुकसान भरपाईची वसुली करता यावी म्हणून कंत्राट किंमतीच्या १० टक्के अशी पुरेशी रक्कम ठेवून घेतली आहे. ही रक्कम या कार्यालयात खालील प्रमाणे उपलब्ध आहे.

कार्यचालनाच्या बँक हमीची रक्कम	रु. १,८१,७९,३१२
प्रलंबित इन्हॉइस (बीजक) आणि ठेवून घेतलेली रक्कम	रु. २,४६,९६,३८५
महानिर्मितीकडे उपलब्ध असलेली एकूण रक्कम	रु. ४,२८,७५,६९७

ही रक्कम एकूण कंत्राट मूल्याच्या २३.५८ टक्के आहे

ज्याअर्थी कोराडी औ.वि.केंद्रात १८, भुसावळ औ.वि.केंद्रात ६ आणि परळी औ.वि.केंद्रात ६ या सर्व कोल मिल्स रिजेक्ट पध्दतीत तेथे सुधारणा केल्यानंतर सुरळीतपणे कार्यरत आहेत. म्हणून असेच चांगले परिणाम इतर वीज केंद्रात दिसून येतील अशी अपेक्षा आहे. कोराडी औ.वि. केंद्रात केलेल्या कामानुसार अन्य वीज केंद्रातही अशाच सुधारणा लवकरच करुन तेथील कामे लवकरात लवकर पूर्ण करावीत यासाठी या संस्थेचा सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे. वरील परिस्थितीनुसार नमूद करण्यात येते की, मे.मॅकॅवेबर बी.के. यांच्याकडून सदर पध्दत पूर्ण करण्यास विलंब झालेला आहे. यामुळे कंत्राटाच्या अटीप्रमाणे त्यांच्यावर काम पूर्ण करण्यासंबंधीची निर्धारीत नुकसान भरपाई लावण्यात येवू शकते. तसेच काम लवकर पूर्ण करण्यासाठीही सदर संस्थेला वेळोवेळी आग्रह करण्यात आला. त्यासाठी पध्दतीत काही बदलही करण्यात आले. कोराडी, भुसावळ आणि परळी औ.वि. केंद्र येथील सदर पध्दतीचा कार्यपालनाचा समाधानकारक अहवाल पाहता यासाठी आतापर्यंत झालेला खर्च अवाजवी नाही.

१.३ शासन कंपनीच्या अभिप्रायाशी सहमत आहे.

१.४ याबाबत महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी व ऊर्जा विभाग यांनी पाठविलेल्या लेखी स्पष्टीकरणाच्या आधारे समितीने प्रथम दिनांक २५ सप्टेंबर, २०१२ रोजी विधान भवन, पुणे या ठिकाणी साक्ष घेतली. परंतु, सदर साक्षीच्यावेळी समितीचे समाधान न झाल्याने समितीने पुन्हा दिनांक २८ फेब्रुवारी, २०१३ रोजी महामंडळाचे अधिकारी व विभागाचे सचिव यांची साक्ष घेतली. राज्यातील पाच औष्णिक विद्युत केंद्रांमध्ये एकाच वेळी कोळसा हाताळणी पध्दती स्थापित करण्यासाठी कंपनीने घेतलेल्या घाईच्या निर्णयामुळे झालेला खर्च निष्फळ गेला होता व सदर खर्चामुळे दोषरहित पर्यावरण व अपेक्षित फायदे सुध्दा मिळू शकले नव्हते असा महालेखाकारांनी आक्षेप नोंदविला होता. याबाबत अधिक स्पष्टीकरण करण्याविषयी समितीने सांगितले असता, कंपनीचे संचालक यांनी दिनांक २५ सप्टेंबर, २०१२ रोजी समितीला सांगितले होते की, यासंबंधी दगड व बाह्य पदार्थ बाहेर काढण्यासाठी २००३ साली निविदा काढण्यात आली होती. त्यातील संरचनेमध्ये काही अडचणी आल्यामुळे सदर यंत्रणा कार्यान्वित झाली नाही. यानंतर कंपनी आणि कंत्राटदार यांच्यामध्ये वाद सुरु झाला त्यामुळे सदर प्रकरण लवादासमोर गेले व ते सध्या प्रलंबित आहे. याबाबत असलेल्या कागदपत्रांच्या तपासणीमध्ये पाच

लोकांनी निविदा सादर केल्या होत्या त्यातील एका बोलीदाराकडून प्रस्ताव आला होता. पुन्हा फेरनिविदा काढण्यासाठी वेळ लागला असता. तसेच कंपनीने देऊ केलेला दर अंदाजे खर्चाच्या कमी असल्याने संबंधित बोलीदाराला कंत्राट देण्यात आले. याबाबत अधिक स्पष्टीकरणासाठी दिनांक २८ फेब्रुवारी, २०१३ रोजी साक्षीमध्ये स्पष्ट करतांना कंपनीच्या संचालकांनी सांगितले की, कोल मिलमध्ये कोळशाचे फाईन पावडरमध्ये रुपांतर करुन पावडर कोळशाचा पुरवठा केला जातो व असा कोळसा गाळणारी मिल म्हणजे कोल मिल होय. त्यातील दळला न जाणारा कोळसा म्हणजे दगड हा रिजेक्टच्या माध्यमातून बाहेर पडतो. पूर्वी असा दगड कोळसा माणसाद्वारे वेगळा केला जात असे. याचा परिणाम कार्यपध्दतीवर होत असल्याने वीज निर्मितीने असा दगड कोळसा हायप्रेशर एअरने वेगळा करुन तो सरळपणे डंपींगमध्ये टाकण्यासाठी निविदा पध्दती अवलंबून निविदा मागविण्यात आल्या. जागतिक पातळीवर निविदा काढण्यात आल्यामुळे पाच निविदा भरल्या गेल्या होत्या. त्यामध्ये दिल्ली येथील असलेल्या बोलीधारकाने बोली प्रस्ताव सादर केलेला होता. एकच बोलीदार असल्याने निविदा सादर करण्याची तारीख वाढविण्यात आली. तरीसुध्दा त्यास प्रतिसाद न मिळाल्यामुळे व प्राप्त झालेले एक बोलीदार यांची निविदा तांत्रिक, वाणिज्यिक सुयोग्य असल्यामुळे त्यांना कामाचे आदेश देण्यात आले. सदर कार्यपध्दतीची सुरुवात तद्नंतर कंत्राटदारांकडून कोराडी, परळी, भुसावळ याठिकाणी राबविली गेली. पण ती यशस्वी झाली नाही. यासाठी सदर कार्यपध्दतीमध्ये आधुनिक पध्दतीने बदल करावयास लावले व त्यानुसार कोराडी व भुसावळ याठिकाणी सदर योजना चालू झाल्या. परंतु, दगड पध्दतीचा कोळसा रिजेक्ट सिस्टीममध्ये असलेली पध्दती व्यवस्थित कार्यरत होत नसल्यामुळे ती पध्दत बंद करण्यात आली. कारण सदर पध्दत चालू ठेवल्यास कोल मिल चालविणे व काम करणे कठीण झ ाले असते. तद्नंतर यासाठी आवश्यक ते संयंत्र लावण्यास सांगितले होते. परंतु, तसे झाले नाही. त्यानंतर कंत्राटदाराने काम करण्याचे थांबविले आणि काही रकमेची मागणी केली. साधारणतः याबाबत २६ कोटी रुपयांचे मागणीचा त्यांनी दावा केला असून सध्या हे प्रकरण लवादासमोर प्रलंबित आहे असे त्यांनी स्पष्ट केले. याबाबत कंत्राटदाराला ८० टक्के रक्कम संयंत्राचा पुरवठा केल्यानंतर प्रदान करावयाची होती व २० टक्के रक्कम प्रायोगिक चालन व अंतिमरित्या मालकाने स्विकारल्यानंतर करावयाचे होती, असे समितीने विचारले असता, याबाबत संचालक यांनी सांगितले की, कराराच्या अटी व शर्तीच्या अनुषंगाने ही बाब बरोबर आहे, असे त्यांनी मान्य केले. याबाबत अधिक स्पष्टीकरण करतांना विभागीय सचिव यांनी सांगितले की, निविदेचा कालावधी १२ महिन्याचा होता पण कोल मिल उपलब्ध करुन दिली नाही. वीज निर्मिती करणे आवश्यक असल्यामुळे ज्यावेळी कोल मिल उपलब्ध करुन देण्यात आली त्याच वेळी त्याने काम सुरु केले. यामध्ये दोन्ही पक्षकारांकडून विलंब झाला ही वस्तुस्थिती आहे.

एकंदर सहा वीज निर्मिती केंद्रासाठी काम देण्यात आले होते. त्यातील कोराडी येथील काम पूर्ण केले व परळी व भुसावळ येथील काम अर्धवट असून यासाठी संबंधितांना १२ कोटी रुपयांची आगाऊ रक्कम (Advance) कराराच्या अटी व शर्तीनुसार देण्यात आली आहे. सदर सामान हे वीज निर्मिती कंपनीच्या परिसिमेमध्ये असल्याने आपल्याच ताब्यात आहे असे त्यांनी स्पष्ट केले. याबाबत समितीने विचारले की, इतकी रक्कम आगाऊ प्रदान केल्यानंतर काम पूर्ण व्हावयास पाहिजे होते. तसेच त्यासाठी बँक गॅरंटी म्हणून किती रक्कम घेण्यात आली होती. त्यावर विभागीय सचिव यांनी सांगितले की, याबाबत १० टक्के रक्कम उभारणी (Erection) व १० टक्के रक्कम कमिशनिंग झाल्यानंतर प्रदान करावयाची होती. यासाठी कंत्राटदाराकडून नियमानुसार १० टक्के दराने १८ कोटी रुपयाच्या काम प्रदान केल्याप्रकरणी १ कोटी ८२ लाख रुपये बँक गॅरंटी घेण्यात आलेली आहे. तेथील असलेले सामान वगळता एकूण ४ कोटी रुपये कंपनीकडे आहेत. ही पध्दत प्रथमच स्विकारल्यामुळे व संपूर्ण देशामध्ये फक्त सदर पध्दत दोन ठिकाणीच कार्यरत आहे असेही त्यांनी स्पष्ट केले. अधिक स्पष्टीकरण करतांना कंपनीच्या संचालकांनी सांगितले की, पूर्वी कोळसा चांगल्या प्रतीचा मिळत होता व त्यामध्ये रिजेक्शनचे प्रमाण कमी होते. सन २००७-०८ या सालानंतर कोळशाच्या प्रतीमध्ये घट होत असून त्यामुळे रिजेक्शनचे प्रमाण वाढलेले आहे. पूर्वी रिजेक्शनचे प्रमाण १ टक्का होते त्यामध्ये वाढ झालेली असून आता साधारणपणे ३ टक्क्याच्या प्रमाणात कोळसा रिजेक्ट केला जातो. याबाबत संबंधितांना नोटीस देऊन नवीन तंत्रज्ञान पध्दत काढून टाकण्यात आली आहे. जर ही पध्दत सुरु केली ठेवली असती तर वीज निर्मितीवर त्याचा परिणाम झाला असता. महालेखाकारांनी उपस्थित केलेल्या आक्षेपाशी सहमती दर्शवून विभागीय सचिवांनी सांगितले की, त्यांच्या पहिल्या हरकतीनुसार एकाच वेळी सर्व औष्णिक विद्युत केंद्रामध्ये या पध्दतीचा अवलंब का करण्यात आला? प्रायोगिक पध्दतीने यांची चाचपणी करुन त्याचा वापर त्याच्या निरीक्षणानंतर अन्यत्र करावयास हवा होता. व त्यासाठी अदा करण्यांत आलेल्या रकमेबाबत त्यांनी आक्षेप नोंदविलेला आहे. त्यावर अधिक स्पष्टीकरण करतांना विभागीय सचिव यांनी सांगितले की, सध्याच्या काळात नवीन तंत्रज्ञान विकसित होत असते व अशा तंत्रज्ञानाचा वापर करावा अशी अपेक्षा असते. त्यानुसार या तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला, असे त्यांनी स्पष्ट केले. महालेखाकारांनी भविष्यकालीन काळासाठी अशा तंत्रज्ञानाचा वापर करतांना प्रथम त्याची पडताळणी करण्याबाबत सूचना केलेली आहे व ती अतिशय महत्त्वाची आहे, असेही विभागीय सचिव यांनी स्पष्ट केले. चुकीच्या पध्दतीने आगाऊ रक्कम अदा केल्याबाबत आपले काय म्हणणे आहे असे समितीने विचारले असता, विभागीय सचिव यांनी सांगितले की, तांत्रिक दृष्ट्या याबाबत विचार करता नवीन विकसित होणाऱ्या तंत्रज्ञानाच्या सामुग्रीसाठी पुरवठादार थांबत नाहीत. यासाठी त्यांच्याकडून आगाऊ रकमेची मागणी केली जात असते.

त्यासाठी पुरवठादार अटी व शर्ती देखील नमूद करीत असतात. या नवीन तंत्रज्ञानाबाबत यापूर्वी अन्यत्र वापरण्यात आलेल्या प्रयोगासाठी त्याठिकाणी त्यांना आलेला अनुभव याबाबत त्यांच्याकडे विचारणा केली गेली होती काय? असे समितीने विचारले असता, संचालक, वीज निर्मिती यांनी सांगितले की, एनटीपीसीमध्ये या तंत्रज्ञानाचा वापर केलेला आहे. त्यावर समितीने असे विचारले की, एनटीपीसीने या तंत्रज्ञानाच्या वापराबाबत अभिप्राय व्यक्त करतांना "सर्वसाधारणपणे हे तंत्रज्ञान बरे आहे." असे म्हटलेले आहे. त्यामुळे या तंत्रज्ञानाचा वापर करतांना घाईने निर्णय घेतला असे वाटत नाही काय? यावर विभागीय सचिव यांनी सांगितले की, याबाबत त्यावेळी व्यवस्थित निर्णय घ्यावयास हवा होता हे त्यांनी मान्य केले. याबाबत महालेखाकार यांनी दिलेला सल्ला अतिशय महत्त्वाचा असून भविष्यकाळात सदर सल्ल्याचा वापर करुन निर्णय घेतला तर योग्य होईल, असे त्यांनी पुनश्च विशद केले. ठेकेदाराकडील वीज निर्मिती कंपनीच्या अखत्यारित असलेली सामुग्री कुठल्या स्वरुपाची आहे? व त्याचा अन्यत्र वापर करता येणे शक्य आहे काय? असे समितीने विचारले असता, वीज निर्मितीच्या संचालकांनी सांगितले की, त्याचा वापर शक्य नसून त्याची किंमत काढून सदर सामुग्री विकावी लागेल याचे कारण यासाठी सदर यंत्रणा कार्यान्वित करणे किंवा सामान विकणे या दोन पर्यायापैकी पहिला पर्याय शक्य नसल्याने सदर सामुग्री विकून यासाठी ठेकेदाराला देण्यात आलेल्या रकमेपैकी काही रक्कम वसूल होऊ शकेल. याबाबत समितीने औष्णिक वीज केंद्रातील कोळसा शुध्द करण्याच्या प्रक्रियेला मानवी पध्दतीने करण्यात येत असलेल्या कामाला पर्याय असू शकतात व ते फायदेशीर आहेत काय? याबाबत तपासणी करुन निर्णय घ्यावा, असे समितीने सुचविले असता, यासाठी काही कालावधीसाठी वीज निर्मिती संच बंद करावा लागेल. तरीही ही बाब तपासून घेण्यांत येईल, असे वीज निर्मितीच्या संचालकांनी स्पष्ट केले.

१.५ अभिप्राय व शिफारशी :-

राज्यातील पाच विद्युत औष्णिक विद्युत केंद्रांमध्ये एकाच वेळी कोळसा हाताळणी पध्दती स्थापित करण्याच्या कंपनीने घेतलेल्या घाईच्या निर्णयामुळे झालेला खर्च निष्फळ गेला होता व सदर खर्चामुळे दोषरहित पर्यावरण व अपेक्षित फायदे सुध्दा मिळू शकले नव्हते असा महालेखाकारांनी आक्षेप नोंदविला होता. साक्षीमधून स्पष्ट झालेल्या मुद्यावरुन महाराष्ट्र विद्युत निर्मिती कंपनीने तांत्रिक आधुनिक पध्दतीने वीज निर्मिती करतांना औष्णिक वीज केंद्रामध्ये लागणारा कोळशाचे विघटन करण्यासाठी कोल मिल बसवून कोळशाची पावडर तयार करुन त्याचा वापर करण्यात येत असतांना त्यातील कठीण असलेल्या

दगडासारखा पदार्थ विघटन होत नसल्यामुळे सदर कठीण पदार्थ बाहेर काढण्यासाठी नवीन तांत्रिक यंत्रणा बसविण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार जागतिक पातळीवर निविदा देखील मागविण्यात आल्या. परंतु, त्यातील सादर झालेल्या निविदेमधून एकाच बोलीधारकाने बोलीचा प्रस्ताव सादर केल्यामुळे त्याला कामाचे कंत्राट देण्यात आले. त्यानुसार कंत्राटदाराला द्यावयाच्या जागेसाठी तांत्रिक अडचण झाल्यामुळे विलंब झाला. जागेची उपलब्धता झाल्यानंतर कंत्राटदाराने काम सुरु केले. परंतु, त्यामध्ये अडचणी आल्यामुळे कार्यपध्दतीमध्ये आधुनिक बदल करणे आवश्यक वाटल्याने सदर बदल करुन देखील नवीन आधुनिक कार्यप्रणाली यशस्वी होऊ शकली नाही. त्यामुळे सदर पध्दत नंतर बंद करण्यात आली. त्यानंतर कंत्राटदाराने देखील काम बंद केले व त्यांनी झालेल्या विलंबाचा आधार घेऊन काही आर्थिक मागणीचा प्रस्ताव सादर केला. त्यामध्ये मतभिन्नता झाल्यामुळे सदर प्रकरण लवादाकडे गेले. यामध्ये महालेखाकारांनी कंत्राटदाराला अग्रीम रक्कम दिलेल्या संबंधाने आक्षेप नोंदविला होता. त्याबाबत विभागाकडून समर्थन करतांना नवीन तांत्रिक कार्यप्रणाली विकसित करतांना त्यासाठी लागणाऱ्या सामुग्रीची आवश्यकता लक्षात घेऊन यावेळी लागलेले अग्रीम समर्थनीय होते, असे विशद केलेले कारण समितीला योग्य वाटत नाही. नवीन तांत्रिक कार्यप्रणाली विकसित करतांना राज्यातील पाच औष्णिक विद्युत केंद्रामध्ये एकाचवेळी कार्यप्रणालीसाठी सुरुवात केल्यामुळे त्याच्या पडताळणीकडे दुर्लक्ष झाल्याचे विभागीय सचिवांनी देखील मान्य केले. महालेखाकारांनी देखील नवीन कार्यप्रणालीच्या तांत्रिक बाबी उघड होण्याच्या दृष्टीने एकाच ठिकाणी कार्यपध्दती बसवून त्याची चाचणी घेणे आवश्यक होते असा आक्षेप नोंदविला होता व भविष्यकाळात अशा नवीन कार्यप्रणालीचा वापर करतांना प्रथम प्रायोगिक तत्त्वाचा अवलंब करण्याबाबत सूचना केली होती. सदरहू सूचना महत्त्वाची व मार्गदर्शक असल्याचे विभागीय सचिवांनी देखील साक्षीच्यावेळी मान्य केले. नवीन तंत्रज्ञान वापरतांना यापूर्वी अन्यत्र वापर झालेल्या विद्युत केंद्रांबाबतचा अनुभव यापूर्वी विचारात घेतला होता काय? या प्रश्नाला फक्त एनटीपीसीने या तंत्रज्ञानाचा वापर केला असून त्यांनी आपल्या अभिप्रायामध्ये "सर्वसाधारणपणे हे तंत्रज्ञान बरे आहे." असा केलेला उल्लेख देखील अनुमानावर आधारित असल्याचे समितीला वाटते. त्यामुळे वीज निर्मिती कंपनीकडून अशा तंत्रज्ञानाचा एकदम पाच वीज निर्मिती केंद्रामध्ये पध्दत अवलंबिण्याचा निर्णय घाईघाईने घेऊन अवलंबिल्याचे दिसून येते. या कामासाठी नेमण्यात आलेल्या ठेकेदाराने काम सोडून दिल्यानंतर त्यांनी वापरलेली साधनसामुग्री ही ज्या साधनसामुग्रीसाठी ठेकेदाराला आगाऊ रकमा दिल्या गेल्या होत्या ती देखील विनावापर वीज निर्मिती कंपनीच्या केंद्राच्या ठिकाणी पडून असल्याचे समितीला आढळून आले. या कारणासाठी वापरण्यांत आलेली आर्थिक तरतूद देखील सदर साधनसामुग्रीची विल्हेवाट लावून काही प्रमाणात वसूल करता आली असती, असे समितीचे स्पष्ट मत

आहे. यावरुन वीज निर्मिती कंपनीच्या तत्कालीन कार्यरत असलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सुयोग्य, वाणिज्यिक प्रथांचा अवलंब करुन व्यापारिक दृष्टीकोनातून कंपनीचे कसे आर्थिक हित साधता येईल याकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येते. यासाठी समिती अशी शिफारस करीत आहे की, **अशा कर्तव्यात कसूर करणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करुन त्यांच्यावर कडक कारवाई करावी. तसेच महालेखाकारांनी सुचविल्यानुसार कुठल्याही नवीन तंत्रज्ञानाचा वापर करतांना त्याचा प्रथम प्रायोगिक प्रकल्प तयार करुन त्यामध्ये यापूर्वी अन्यत्र वापरण्यांत आलेल्या ठिकाणचा पूर्वानुभव पूर्णपणे विचारात घ्यावा व प्रकल्प कार्यान्वित करण्यास सुरुवात करावी. त्याच्या फलनिष्पत्तीचा अभ्यास करुन अन्यत्र असे तांत्रिक प्रकल्प तद्नंतर सुरु करण्यात यावेत. तसेच औष्णिक वीज केंद्रातील कोळसा शुध्द करण्याच्या व वेचण्याच्या सद्य:स्थितीत मानवी पध्दतीने करण्यांत येत असलेल्या प्रक्रियेला पर्याय असू शकणाऱ्या फायदेशीर बाबीबाबत अभ्यास करण्यासाठी निर्णय घ्यावा, विनावापर वीज निर्मिती कंपनीच्या आवारात पडून असलेल्या साधनसामुग्रीची विल्हेवाट त्वरेने लावून त्यातील काही प्रमाणात झालेले आर्थिक नुकसान भरुन काढण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी. याप्रकरणी करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्याच्या आत कळविण्यात यावी. अशीही समितीची शिफारस आहे.**

दोन : औष्णिक विद्युत केंद्रामध्ये प्रदान झालेल्या कोळशातून दगड, शेल व इतर सामान काढून टाकण्यासाठीचे कंत्राट :

२.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००७-२००८ च्या (वाणिज्यिक) अहवालातील प्रकरण क्रमांक तीन मधील परिच्छेद क्रमांक ३.८ मध्ये "औष्णिक विद्युत केंद्रामध्ये प्रदान झालेल्या कोळशातून दगड, शेल व इतर सामान काढून टाकण्यासाठीचे कंत्राट" (२००७-०८) या संबंधात महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले आहेत.

कंपनीच्या भुसावळ, चंद्रपूर, खापरखेडा, कोराडी, नाशिक, परळी-वैजनाथ व पारस या सात औष्णिक विद्युत केंद्रासाठी (टीपीएसएस) कोळसाखाणी मधून कोळसा मिळतो त्यामध्ये दगड, शेल्स व बाहेरील सामान मिसळले असते व यंत्रसामुग्रीला होणारे नुकसान टाळण्यासाठी हा कोळसा मिलमध्ये टाकण्यापूर्वी ते सर्व काढून टाकणे आवश्यक असते. हे काम कोळसा हाताळणी संयंत्रावर (सीएचपीएस) दिवसरात्र तीन पाळ्यांमध्ये कामगार नेमून हाताने करण्यात येते. हे काम करण्यासाठी कामगार पुरवठा करण्यासाठी काम औष्णिक विद्युत केंद्राद्वारे स्थानिक पातळीवर निविदा मागवून प्रदान करण्यात येते. हे कामगार पुरवठा कंत्राट असल्यामुळे त्यास किमान वेतन कायद्याच्या तरतुदी लागू होतात. २००१-०८ या कालावधीमध्ये परळी-वैजनाथ, खापरखेडा, नाशिक व भुसावळ या चार औष्णिक विद्युत केंद्रामुळे दगड व शेल्स काढून टाकण्याचे कंत्राट परत प्रिन्स व कंपनी आणि चॅन्डी व कंपनी या दोन कंत्राटदारांनाच देण्यात येत होते. या प्रत्येक कंत्राटाचे मूल्य रुपये ४९.२८ लाख व रुपये १.४८ कोटी या दरम्यान होते व त्याचा तपशील जोडपत्र १३ मध्ये देण्यात आलेला आहे. या कंत्राटाच्या लेखापरीक्षण छाननीत (फेब्रुवारी ते एप्रिल २००८) खालील बाबी आढळून आल्या.

कंत्राटदारांसाठी महत्त्वपूर्ण पात्रता कसोट्या नसणे.

३.८.१ त्या कामासाठी बोली लावणाऱ्या कंत्राटदारांसाठी पात्रता कसोट्यांच्या छाननीत निदर्शनास आले की, त्या निर्बंधक स्वरुपाच्या होत्या व खाली दर्शविल्याप्रमाणे त्या स्पर्धेला उत्तेजन देण्याऐवजी मक्तेदारी निर्माण करणाऱ्या होत्या.

परळी-वैजनाथ औष्णिक विद्युत केंद्रात रुपये २४.८२ लाख अंदाजित किंमत असलेल्या निविदा मागवितांना (ऑगस्ट २००५) खालील कसोट्या कंत्राट तरतुदी विहित केल्या होत्या. बोलीदाराला ३५० मे.टन /तास स्थापित क्षमता असलेल्या सीएचपी हाताळणीचा तीन वर्षाचा अनुभव असायला हवा.

निविदेमध्ये दिलेल्या कामाच्या मूल्यापेक्षा ५० टक्क्यापेक्षा कमी नसलेल्या या सारख्याच कामाच्या एकाच आदेशाचा मागील पाच वर्षाचा किंवा मागील तीन वर्षात अंमलबजावित केलेल्या निविदा मागविलेल्या मूल्यापेक्षा कमी नसलेल्या कामाचा अनुभव असायला हवा.

लेखापरीक्षणाच्या असे निदर्शनास आले की, परळी-वैजनाथ औष्णिक विद्युत केंद्रामध्ये नोव्हेंबर, १९९० ते मार्च १९९३ या आधीच्या कालावधीमध्ये सारखेच काम समाधानकारक रित्या पूर्ण करुन देखील, ए.एस.गीते (आधीचा कंत्राटदार) कराराच्या अटीमध्ये अंमलबजावित केलेल्या कामाच्या मूल्याबाबत सुधारणा केल्यामुळे निविदेमध्ये भाग घेऊ शकला नाही व कंत्राट चॅन्डी ॲन्ड कंपनी या एकच बोली दिलेल्या कंत्राटदाराला प्रदान करण्यात आले होते.

व्यवस्थापनाने म्हटले (ऑगस्ट २००८) होते की, ए.एस.गीते यांने पात्रता कसोटी पूर्ण केली नाही म्हणून त्याचा देकार स्विकारण्यात आला नव्हता परंतु, जास्त पात्रता कसोटी निश्चित केल्यामुळे स्पर्धा सिमित करण्यात आली होती.

चंद्रपूर व कोराडी औष्णिक केंद्रामध्ये २००२-०४ या कालावधीसाठी निविदा मागवितांना कंत्राटदाराला औष्णिक विद्युत केंद्राच्या ५०० मे.टन / तास क्षमतेच्या कन्व्हेअर बेल्टवरुन दगड व शेल्स काढण्याचा पाच वर्षाचा अनुभव असण्याची अट विहित करण्यात आली होती. २००२-०३ व २००३-०४ च्या निविदा छाननीमध्ये असे आढळून आले की, एन.सी.बियानी, चंद्रपूर सीएसटीपीएस व कोराडी टीपीएससाठीचा देकार यांना दगड व शेल्स ६०० मे.टन क्षमतेच्या सीएचपी कन्व्हेअर बेल्टवरुन काढत्या वेस्टर्न कोलफिल्ड मर्यादित (डब्ल्यूसीएल), दुर्गापूर जे औष्णिक विद्युत केंद्रासारखेच होते त्याचा अनुभव असतांनाही त्यांचा देकार नाकारण्यात आला होता व कंत्राटदाराचा फक्त औष्णिक विद्युत केंद्राचा अनुभव असायला हवा ही अट निर्बंधक होती व त्यामुळे एन.सी.बियानी यांचा देकार नाकारण्यात आला होता. ही कंत्राटे प्रिन्स व कंपनी व चॅन्डी व कंपनी यांना प्रदान करण्यात आली होती.

व्यवस्थापनाने म्हटले होते (ऑगस्ट २००८) त्यांनी व भविष्यातील कंत्राटासाठी कोळसा खाणीचा अनुभव देखील सुधारित पात्रता कसोट्यांमध्ये अंतर्भूत केला होता.

<u>कामाची मात्रा व अनुभवासाठी पात्रता कसोट्या निश्चित करण्यात अदेय अनुग्राह</u>

३.८.२ कराराच्या अटीमध्ये विहित करण्यात आले होते की, कंत्राटदाराला कमीत कमी १५,००० (परळी-वैजनाथ) ते ५०,००० मे.टन (नाशिक-टीपीएस) एवढ्या मात्रेचे दगड व शेल्स काढण्याचा अनुभव असायला हवा होता. दगड व शेल्स याची मात्रा कोळसा खाणीमधून मिळणाऱ्या कोळशाच्या दर्जावर अवलंबून असल्यामुळे दगड व शेल्स काढण्याची कमीत कमी मात्रा कंत्राटाच्या समाधानकारक कार्यचालनासाठी विहित करणे संयुक्तिक नव्हते.

त्या उलट असे कलम विहित केल्यामुळे स्पर्धा मर्यादित झाली होती व स्पर्धात्मक दर मिळविण्यात सर्वात चांगले दर मिळण्यात तो एक अडथळा (डिटरन्ट) होता. कारण मात्रेवरील लादलेल्या निर्बंधामुळे इतर कंत्राटदार बोली देऊ शकत नव्हते त्यामुळे अस्तित्वात असलेल्या कंत्राटदारांना कंत्राट मिळविणे शक्य झाले होते.

२००१ मध्ये पात्रता कसोटी म्हणून मागील अनुभवाचा कालावधी तीन वर्षावरुन पाच वर्ष वाढविण्यात आला. ज्याची पूर्तता फक्त अस्तित्वात असलेला कंत्राटदारच करु शकत होता कारण आधीची कंत्राटे फक्त त्यांनाच प्रदान करण्यात आली होती. या पात्रता कसोट्यामुळे स्पर्धा मर्यादित झाली होती व प्रिन्स ॲण्ड कंपनी व चॅन्डी ॲन्ड कंपनी या अस्तित्वात असलेल्या कंत्राटदारांची मक्तेदारी चालू ठेवता आली होती व अशारितीने या दोन्ही कंत्राटदारांनी परळी-वैजनाथ, खापरखेडा, नाशिक व भुसावळ येथील औष्णिक विद्युत केंद्राची सर्व वार्षिक कंत्राटे मिळविली होती. अशा रितीने कंत्राटाच्या समाधानकारक कामकाजाशी संबंधित नसलेल्या पात्रता कसोट्या निविदांसाठी समाविष्ट केल्यामुळे व तीन ते पाच वर्षाचा अनुभवाची पात्रता ठेवल्यामुळे दोन कंत्राटदारांची (चॅन्डी ॲन्ड कंपनी व प्रिन्स ॲन्ड कंपनी) अनुक्रमे परळी, खापरखेडा व नाशिक औष्णिक विद्युत केंद्रामध्ये मक्तेदारी निर्माण झाली होती.

व्यवस्थापनाने म्हटले होते (ऑगस्ट २००८) की भविष्यातील कंत्राटांसाठी स्पर्धात्मक दर यावे म्हणून पात्रता कसोटी कमी करण्याची सुधारणा करण्यात आली होती.

<u>दंडाची वसुली न करणे.</u>

३.८.३ कोराडी औष्णिक विद्युत केंद्रामधील करारामध्ये जर कोळशामधील दगडे शेल्स व बाहेरील सामान काढून टाकण्यात अपयश आले तर नुकसान झालेल्या यंत्रसामुग्रीचे शेअर्सपिन यांचे व विद्युत निर्मितीचे

झालेले नुकसान वसुल करण्याची तरतूद करण्यात आली होती. औष्णिक विद्युत केंद्रात रुपये ३.२९ कोटी किंमतीच्या २५.१७ दशलक्ष युनिट विद्युत निर्मितीचे नुकसान झाले होते व रुपये १३.८४ लाख नुकसान झालेली साधन सामग्री बदलण्यावर खर्च करण्यात आले होते. विद्युत निर्मिती नुकसान वसुलीची करारामध्ये स्पष्ट तरतूद असतांनाही दंडाची रक्कम यंत्रसाधन सामुग्रीला झालेल्या नुकसानीसाठी फक्त रुपये ९.६९ लाख एवढीच मर्यादित करण्यात आली होती. यापुढे असेही निदर्शनास आले की, इतर औष्णिक विद्युत केंद्रांमध्ये विद्युत निर्मिती नुकसान भरपाई (रुपये २.५९ कोटी) चंद्रपूर : रुपये ५४.३४ लाख, खापरखेडा रु. ५४.१० लाख, परळी-वैजनाथ रुपये १.५१ कोटी व खराब झालेली

यंत्र सामग्रीसाठी (रुपये ३३.८० लाख) चंद्रपूर : रुपये १०.३० लाख, खापरखेडा रु. ७.१० लाख, परळी-वैजनाथ रुपये १६.४० लाख या बाबतची करारामध्ये तरतूद नसल्यामुळे वसुली करणे शक्य झाले नव्हते.

सीएसटीपीएस चंद्रपूर यांनी जारी केलेल्या कामाच्या आदेशामध्ये जर इतर सामान कन्व्हेयर बेल्टवरुन जाऊन बंकर येथे पोहचले तर दंडाची रक्कम वसूल करण्यासाठी तरतूद होती. २००५-०६ ते २००७-०८ या कालावधीमध्ये ५५७ वेळा असे प्रकार घडल्याचे निदर्शनास आले होते व त्यासाठी रुपये ३७.६५ लाखाचा दंड वसूल करावयाचा होता. पण प्रत्यक्षात फक्त रुपये १.०७ लाखाचा दंड वसूल करण्यात आला होता. कंत्राटदाराची कामकाज प्रगती असमाधानकारक असतांनाही हे कंत्राट चालू ठेवण्यात आले होते. अशारितीने, निर्बंधक करार तरतुदी करारात समाविष्ट घेतल्यामुळे दोन संस्थांची मक्तेदारी होण्यास मदत झाली होती व कंपनी स्पर्धात्मक दराला मुकली होती. औष्णिक विद्युत केंद्रामध्ये दंडाची रक्कम वसुली करण्याबाबत आपसात एकरुपता नसल्यामुळे कंत्राटदारांकडून रुपये ६.६३ कोटी दंडाची वसुली झाली नव्हती/ कमी वसुली झाली होती. ही कंत्राटे मोठ्या मूल्याची असतांनाही त्यांना औष्णिक विद्युत केंद्राच्या मुख्य महाव्यवस्थापकांनीच अंतिमरुप दिलेले होते व कंपनीच्या मुख्यालयाने त्याचे संनियत्रण केले नव्हते.

व्यवस्थापनाने म्हटले होते (ऑगस्ट २००८) सर्व औष्णिक विद्युत केंद्रामध्ये एकरुपता असण्याच्या उद्देशाने सर्व दगड उचलण्याच्या करारांमध्ये सारखाच प्रमाणात दंड वसूल करण्याचे काम समाविष्ट करण्याच्या नविन मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आल्या होत्या. ही बाब शासनाला कळविण्यात (जून २००८) आली होती. त्याचे उत्तर प्रलंबित होते. (डिसेंबर, २००८)

२.२ याप्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करतांना असे नमूद केले आहे की, सार्वजनिक उपक्रम समितीने दिलेल्या दि. १२.०९.२००७ रोजी दिलेल्या सुचनानुसार, महानिर्मिती कंपनीने वर्ष २००८-०९ साठी पात्रतेचे निकष शिथिल करण्याची तसेच भविष्यातील कंत्राटासाठी अधिक स्पर्धा विकसित करण्याची कार्यवाही केलेली आहे. यानुसार वर्ष २००८-०९ आणि वर्ष २००९-१० या वर्षातील निविदा खालील पात्रतेचे निकष समाविष्ट करुन मागविण्यात आल्या आहेत. त्यात कोळसा खाणी आणि इतर तत्सम उपयुक्त काम करणाऱ्या संस्था यांच्यातील अनुभवाचा समावेश आहे.

<u>पात्रतेचे निकष :-</u>

(अ) बोलीदारास २०० मे. वॅ. पेक्षा जास्त क्षमतेच्या औष्णिक विद्युत केंद्रातील अखंडपणे चालणाऱ्या कोल हॅन्डलिंग प्लान्टमधील फिरत्या कन्व्हेअर बेल्टमधून दगड आणि इतर बाह्य अप्रस्तुत पदार्थ बाहेर काढण्याच्या कामाचा किमान एक वर्षाचा अनुभव असावा.

(ब) बोलीदारास कोळशाच्या खाणी व इतर उपयुक्त काम करणाऱ्या संस्था यात ज्याची क्षमता ३५० टी./प्रती तास आहे व रुंदी १००० मि.मी. अशा चालत्या कन्व्हेअर बेल्टस् मधील दगड व इतर बाह्य अप्रस्तुत पदार्थ बाहेर काढण्याच्या कामाचा अनुभव असावा.

(क) १) बोलीदाराने बोली उघडण्याच्या तारखेपासून पूर्वीच्या त्यामागील ३ वर्षांच्या काळातील कोणत्याही एक वित्तीय वर्षात ज्याचे मूल्य ५० टक्क्याहून कमी नाही असे या प्रकारच्या किमान एका कामाच्या कार्य आदेशाची समाधानकारकरित्या कार्यवाही पूर्ण केली असली पाहिजे.

२) बोलीदार पात्रतेच्या बोलीसोबत तत्सम कामाचा समाधानकारकरित्या कार्यवाही केली आहे. या संबंधीचे कार्यपालन प्रमाणपत्र त्यासोबत संबंधित कार्यआदेशांसह सादर करील.

३) बोलीदाराने सर्व कामगार कायदे आणि नियम यांची पूर्तता केलीच पाहिजे.

४) पात्रतेच्या कसोट्या सिध्द करणारी सर्व कागदपत्रे व प्रमाणपत्रे यांचे नोटरी / राजपत्रित अधिकारी यांनी योग्य प्रकारे साक्षांकित केलेली असावीत व ती पात्रतेच्या बोलीसोबत काटेकोरपणे सादर केलीच पाहिजेत. अन्यथा निविदा नाकारण्यात येईल.

५) जर बोलीदार उपनिर्दिष्ट केलेल्या (१) अ, ब आणि क यातील पात्रतेच्या कसोट्या पूर्ण करीत नसेल परंतु, त्याला कोल हॅन्डलिंग प्लान्टमधील ३५० टी. प्रती तास या किंवा त्याहून अधिक क्षमतेच्या तसेच १०० मि.मी. रुंदीच्या ज्याची गती १.५ एम/एस इतकी किंवा अधिक असेल अशा चालत्या कन्व्हेअर बेल्टवरील दगड व अन्य बाह्य पदार्थ बाहेर काढण्याच्या कामाचा अनुभव असेल तर त्याचा विचार प्रायोगिक तीन महिन्याच्या मूल्याच्या कार्यादेशासाठी करता येईल. जर त्याचे कार्यपालन समाधानकारक असल्याचे दिसून आले तर कार्यादेश आणखी नऊ महिने म्हणजे एकूण कंत्राटाचा कालावधी १२ महिने होईल अशा प्रकारे चालू ठेवण्यात यावा.

अशा प्रकारे वरील माहिती लक्षात घेता असे दिसून येईल की, महानिर्मिती कंपनीने अधिक स्पर्धा निर्माण व्हावी यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केलेले आहेत.

मात्र पात्रतेच्या आवश्यकता शिथिल केल्यानंतरही फक्त पुढील तीन बोलीदार मे.चंडी कंपनी, चेन्नई, मे.प्रिया टेक, नागपूर आणि मे.एस.प्रिन्स हायटेक, नागपूर हे पात्र असल्याचे आढळून आले.

वरील पात्रतेच्या निकषांवरुन दिसून येईल की, भविष्यातील कंत्राटांमध्ये अधिक स्पर्धा आकर्षिली जावी यासाठी त्यात खालच्या दिशेने सुधारणा करण्यात आली आहे.

महानिर्मिती कंपनीनी जानेवारी २००० मध्ये सर्व औ.वि.केंद्रात दगड निवडण्याच्या कंत्राटासाठी प्रमाणित केलेल्या ताज्या महत्त्वाच्या मार्गदर्शक सूचना वितरीत केलेल्या आहेत. त्यात दंड देण्याचे कलम सुध्दा समाविष्ट आहेत ते पुढीलप्रमाणे :-

दंड : निविदा निनिर्दिष्टतेमध्ये, खाली प्रस्तावित केल्याप्रमाणे दंडाचे कलम समाविष्ट करण्यात यावे.

१) जर सदर कंत्राटदाराकडून प्रकल्पात काम करताना एखाद्या कन्व्हेअर बेल्टकडे लक्ष्य पुरविले गेले नसेल तर (तेथे मनुष्यबळाचा वापर न करणे.) त्या कन्व्हेअर वरुन झालेल्या प्रवाहाचे पैसे दिले जाणार नाहीत. याहून अधिक म्हणजे त्याच्याकडून अपयश झाल्यामुळे प्रतिदिवशी रु. १०००/- याप्रमाणे दंडाची रक्कम आकारण्यात यावी आणि ती कंत्राटदारांच्या मासिक देयकांमधून वसूल करण्यात यावी.

२) शियर पीनच्या दोषाबद्दल दंड :- जर कोळशातील दगड व बाह्य पदार्थ यामुळे शियर पीन पडली तर अशा पीन पडण्याच्या प्रत्येक घटनेसाठी रुपये ५००/- या दराने दंड आकारण्यात यावा आणि त्याच्या मासिक देयकातून वसूल करण्यात यावा.

३) **साधने, यंत्रे यांच्या नुकसानीबद्दल दंड :-** जर कंत्राटदाराचे काम समाधानकारक नसेल तर आणि त्याच्या दुर्लक्षामुळे कामावर अनिष्ट परिणाम झाला किंवा कोणतीही यंत्रसामुग्री किंवा इतर साहित्याची मोडतोड झाली तर सदर यंत्र किंवा साहित्य यांच्या प्रत्यक्ष खर्चापोटी अशा प्रत्येक घटनेसाठी रुपये ५०००/- एवढा दंड वसूल करण्यात यावा.

वरील बाबींचा विचार करता संबंधित लेखा परिच्छेद कृपया बंद करण्यात यावा.

२.३ शासन कंपनीच्या अभिप्रायाशी सहमत आहे.

२.४ याबाबत महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी व ऊर्जा विभाग यांनी पाठविलेल्या लेखी स्पष्टीकरणाच्या आधारे समितीने प्रथम दिनांक २५ सप्टेंबर, २०१२ रोजी पुणे या ठिकाणी साक्ष घेतली. परंतु, सदर साक्षीच्यावेळी समितीचे समाधान न झाल्याने समितीने पुन्हा दिनांक २८ फेब्रुवारी, २०१३ रोजी महामंडळाचे अधिकारी व विभागाचे सचिव यांची साक्ष घेतली. औष्णिक वीज केंद्रातून कोळशातून दगड, शेल व इतर कठीण सामान काढण्यासाठी कंत्राट देतांना करावयाच्या करारामध्ये पात्रतेच्या कसोट्या निर्बंधक असल्यामुळे कंत्राट सादर करणाऱ्यांची मक्तेदारी झाली होती. तसेच दंडात्मक स्वरुपात आकारावयाच्या रकमेकरीता कलमांमध्ये एकरुपता नव्हती. त्यामुळे दंडाची वसुली झाली नाही. व काही ठिकाणी कमी वसूली झाली असा महालेखाकारांनी आक्षेप नोंदविला होता. सदर आक्षेपाच्या अनुषंगाने समितीने दिनांक २५ सप्टेंबर, २०१२ रोजी साक्ष घेतली. सदर साक्षीच्यावेळी वीज निर्मिती कंपनीच्या संचालकांनी समितीने आक्षेपासंबंधात अधिक स्पष्टीकरण करण्याविषयी सांगितले असता, वीज

निर्मिती कंपनीच्या संचालकांनी सांगितले की, कंत्राटदाराची चार कोटीची रक्कम व अधिक बँक गॅरंटी वीज निर्मितीकडे जमा आहे. सदर प्रकरण लवादाकडे प्रलंबित असून लवादाच्या निर्णयानुसार पुढील कार्यवाही सुरु केली जाईल. सद्य:स्थितीत सदर ठेकेदार कंपनीला काळ्या यादीत टाकण्यात आले आहे. त्याबाबत समितीने २५ टक्के कामे पूर्ण झालेली नाहीत अशा कामाची एमबी रेकॉर्ड करण्यास विभागाला काय हरकत आहे? असे विचारले असता, कंपनीच्या संचालकांनी सदर कार्यवाही एक महिन्याच्या आत केली जाईल, असे स्पष्ट केले. तसेच अधिक स्पष्टीकरण देतांना त्यांनी असे सांगितले की, कोळशाच्या खाणीत मोठ्या प्रमाणावर दगड निघत असतात. चालत्या कन्व्हेअर बेल्टसमधील दगड, शेल व इतर सामान उचलण्यासाठी कंत्राट दिले जाते. प्रकल्पात काम करीत असतांना एखाद्या कन्व्हेअर बेल्टकडे लक्ष न दिल्यास किंवा तेथे मनुष्यबळाचा वापर न केल्यास कंत्राटदाराला त्या कन्व्हेअरवरुन झालेल्या प्रवाहाचे पैसे दिले जात नाहीत. त्यासाठी प्रत्येक दिवसासाठी १,००० रुपये दंड आकारला जातो. तसेच कोळशातील दगड व बाह्य पदार्थामुळे शिअर पीन पडल्यास प्रत्येक पीन पडण्याच्या घटनेसाठी ५००/- रुपये दंड आकारला जातो.

काही मुद्यांचे अधिक स्पष्टीकरण होण्याच्या दृष्टीने समितीने ऊर्जा विभागाचे सचिव व विद्युत निर्मिती कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक व इतर यांची दिनांक २८ फेब्रुवारी, २०१३ रोजी पुन्हा साक्ष घेतली. सदर साक्षीच्यावेळी महालेखाकारांनी घेतलेल्या आक्षेपासंबंधाने स्पष्टीकरण करतांना विज निर्मिती कंपनीच्या संचालकांनी सांगितले की, कोळशाच्या खाणीमधून आलेला कोळसा विज निर्मिती करतांना वापरला जात असतांना तो मशिनमध्ये जात असतांना दगड, शेल व इतर कठीण पदार्थ मानवी यंत्रणेद्वारे स्वतंत्र काढले जातात. सदर कठीण पदार्थ वेगळे न केल्यास यंत्रसामुग्रीला धोका उद्‌भवण्याचा संभव असतो. सदर नुकसान टाळण्यासाठी सन २००० पासून नाशिक या ठिकाणापासून या कार्यास सुरुवात होऊन त्याचा वापर अन्य औष्णिक वीज केंद्रात देखील केला जात आहे. रनिंग बेल्टवरुन दगड व इतर कठीण वस्तू वेगळे करणे कुशल व जोखमीचे काम आहे. यासाठी निविदा पध्दती स्विकारुन ठेकेदाराची नेमणूक केली जाते व त्यासाठी त्याचा कामाचा अनुभव व त्याची वित्तीय आर्थिक सुबध्दता या दोन गोष्टी गृहीत धरलेल्या असतात. याबाबत काही ठेकेदार निविदेमधील पूर्तता पूर्ण करु शकत नसतील तर अशा निविदा न काढता जे अर्हताधारक असतात त्यांच्या निविदा काढून त्यांना काम प्रदान केले जाते. प्रत्येक औष्णिक विज केंद्राच्या वेगवेगळ्या अटी व शर्ती आहेत. याबाबत महालेखाकारांच्या आक्षेपानुसार अर्हताधारक कंत्राटदार मिळण्यासाठी पात्रतेतील कसोट्या निर्बंधक असल्यामुळे काही नवीन पात्रता धारक या क्षेत्रामध्ये उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे आता प्रायोगिक तत्वावर एखाद्या इच्छूक असलेल्या नवीन ठेकेदाराला काम देण्याची तरतूद सुरु केली आहे. परंतु,

गेल्या तीन वर्षापासून नवीन ठेकेधारक आलेले नसून जुने काम करणारे ठेकेदारच हे काम करीत आहेत. हे काम ते कुशल कामगार तयार करण्याच्या दृष्टीने प्रशिक्षण देऊन नवीन कामगारांची नेमणूक करीत असतात. आता अर्हताधारक व दंडात्मक कार्यवाहीसाठी सर्वच औष्णिक विद्युत केंद्रामध्ये एकाच तऱ्हेच्या अटी व शर्ती ठेवण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे आता हे प्रश्न निर्माण होणार नाहीत. याबाबत समितीने विचारले की, पात्रतेच्या अटीबाबतच महालेखाकारांनी हरकत घेतली आहे. याबाबत आपले म्हणणे काय आहे? असे विचारले असता, कंपनीच्या संचालकांनी सांगितले की, प्रत्येक औष्णिक विज केंद्रासाठी वेगवेगळ्या निविदा काढल्या जात आहेत, असे स्पष्ट केले. याबाबत कंपनीचे कमी नुकसान होण्याच्या दृष्टीने कार्यवाही करणे गरजेचे असून अशा आर्थिक बाबींकडे अधिक लक्ष देणे गरजेचे असून दंडात्मक वसूल व्हावयाच्या रकमेमध्ये दोन औष्णिक विद्युत केंद्रातील रक्कमेबाबत एकरुपता नसुन कंत्राटदाराकडून दंडाची वसुली झाली नाही, यावर आपले काय मत आहे? असे समितीने विचारले असता, कंपनीच्या संचालकांनी सांगितले की, कोराडी व चंद्रपूर या दोन औष्णिक केंद्राच्या निविदेमध्ये जनरेशन लॉसचा उल्लेख असून अन्य औष्णिक विद्युत केंद्राच्या निविदेमध्ये वसुलीबाबत काही कलम नव्हते. जनरेशन लॉस हा यांत्रिक यंत्राच्या खराबीमुळे होत नसून इतर अन्य कारणांमुळे देखील होत असतो.

उक्त बाब विचारात घेता, समितीने दोन ठिकाणी असलेल्या जनरेशन लॉसच्या संदर्भातील दंडात्मक कार्यवाहीचा उल्लेख अन्य ठिकाणी असलेल्या विद्युत निर्मिती केंद्राच्या निविदेमध्ये का केला नव्हता? व प्रत्येक औष्णिक विद्युत केंद्राच्या निविदेमध्ये वेगवेगळया अटी व शर्ती असण्याचे कारण काय? असे विचारले असता, याबाबत विज निर्मितीच्या संचालकांनी सांगितले की, स्थानिक पातळीवर निविदा काढतांना तेथील असलेल्या प्रथांमुळे अटी व शर्ती होत्या त्यामुळे अडचण आलेली आहे. वेगवेगळ्या विद्युत केंद्रामधील निविदेमध्ये अटी व शर्ती वेगवेगळ्या असल्याचे मान्य केले. रनिंग बेल्टवरील दगड व कठीण वस्तू काढण्याच्या कामासाठी कामाचा अनुभव ही महत्वाची असलेली अट ही अन्य पात्रताधारक पूर्ण करु शकत नसल्यामुळे ठराविक कंपन्यांचीच मक्तेदारी आहे. त्यामुळे अन्य कंपन्या काम कसे मिळवू शकतील? असे समितीने विचारले असता, विज निर्मिती कंपनीच्या संचालकांनी सांगितले की, आपण विशद केलेली वस्तुस्थिती बरोबर असून आता नवीन धोरणानुसार सन २००८-०९ पासून साधारण कामाचा अनुभव असल्यास प्रथम तीन महिने प्रायोगिक तत्वावर देण्यात येऊन त्याचे कार्यपालन समाधानकारक दिसून आले तर कार्यादेशाचा कालावधी नऊ महिने अधिक देऊन त्याचे काम एक वर्षाच्या कालावधीकरीता चालू ठेवण्यात येते. तशाप्रकारची सुधारणा अटी व शर्तीमध्ये केलेली आहे तरीही कोणीही बोलीदार येत नाही, ही वस्तुस्थिती आहे, असे सांगितले. समितीने याबाबत इतर

देशामध्ये असलेल्या पध्दतीचा कशाप्रकारे अवलंब केला जातो याचे अवलोकन करण्याचे प्रतिपादन केले असता, विज निर्मिती कंपनीच्या संचालकांनी सांगितले की, इतर देशातील ठिकाणानुसार क्रॅश कोळसा वापरण्याच्या पध्दती आपल्याकडे देखील काही प्रमाणात वापरली जात आहे. याबाबत समितीने असेही निदर्शनास आणले की, प्रत्येक विज निर्मिती केंद्राच्या निविदेमध्ये अटी व शर्तीमध्ये असलेला फरक हे विभागाने मान्य केलेले असूनही त्याचे समर्थनीय असे कारण विभागाकडून सांगितले जात नाही, याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, महानिर्मिती कंपनीच्या निविदेमधील अटी व शर्ती निर्बंधक होत्या असे महालेखाकार यांनी म्हटल्यानंतर त्या शिथिल केल्या. तरीही नवीन बोलीदार प्राप्त झाले नाहीत. वेगवेगळ्या विज निर्मिती केंद्रातील वेगवेगळ्या असलेल्या निविदा व त्यातील अटी व शर्ती ही बाब लक्षात आल्यानंतर त्याबाबत कारवाई केली गेली आहे. दंडात्मक वसूल व्हावयाच्या रकमेबाबत ज्या ठिकाणी कठीण पदार्थ अडकल्यामुळे झालेले नुकसान लक्षात घेऊन त्याप्रमाणे वसुली देखील केली आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

२.५ अभिप्राय व शिफारशी :-

औष्णिक वीज केंद्रातून कोळशातून दगड, शेल व इतर कठीण सामान काढण्यासाठी कंत्राट देतांना करावयाच्या करारामध्ये पात्रतेच्या कसोट्या निर्बंधक असल्यामुळे कंत्राट सादर करणाऱ्यांची मक्तेदारी झाली होती. तसेच दंडात्मक स्वरुपात आकारावयाच्या रकमेकरीता कलमांमध्ये एकरुपता नव्हती. त्यामुळे दंडाची वसुली झाली नाही व काही ठिकाणी कमी वसुली झाली, असा महालेखाकारांनी आक्षेप नोंदविला होता. समितीसमोर साक्षीमधून प्राप्त झालेल्या माहितीनुसार औष्णिक वीज निर्मिती करणाऱ्या विज केंद्रातील रनिंग बेल्टवरुन वीज निर्मिती केंद्रामध्ये कोळसा वाहून नेला जात असतांना त्यातील दगड, शेल व इतर कठीण सामान काढण्याची पध्दत सन २००० पासून नाशिक येथील विज केंद्रापासून सुरु केली गेली व त्याचा अन्य विज केंद्रातून देखील वापर सुरु केला. यासाठी निविदा प्रक्रिया सुरु करुन कंत्राटदारांची नेमणूक केली जात होती. परंतु, यामध्ये आवश्यक असलेली कुशलता व कामाच्या अनुभवाचा कालावधी हा जास्त प्रमाणात असल्यामुळे निविदेकरीता जास्त बोलीधारक पुढे येत नव्हते. त्यामुळे स्पर्धात्मक बोली निर्माण होऊन त्याचा आर्थिक फायदा हवा तसा विज निर्मिती कंपनीला मिळत नव्हता. महालेखाकारांनी पात्रतेच्या कसोट्यासंदर्भात जाचक निर्बंधक असल्यामुळे बोलीदार प्राप्त नसल्याचे लेखापरीक्षणामध्ये नमूद केल्यामुळे त्यामध्ये सन २००८-०९ मध्ये बदल करुन प्रायोगिक तत्वावर नवीन बोलीधारकांना टप्प्याटप्प्याने कार्यादेश देण्यास सुरुवात केल्याचे निदर्शनास आले. यामुळे कंत्राटदारांमध्ये असलेली मक्तेदारी कमी होण्यास मदत होईल, असे वाटले. परंतु, बोलीधारक पुढे येण्यास तयार नसल्याची बाब देखील विभागाकडून समितीच्या निदर्शनास आणली गेली.

यासाठी निविदा प्रक्रिया अवलंबितांना प्रत्येक औष्णिक विद्युत केंद्रामध्ये निविदाकारासाठी अटी व शर्ती भिन्न असल्याचे समितीला दिसून आले. अशा भिन्न अटी व शर्ती वेगवेगळ्या ठेवण्यामागील कारण समितीला कळू शकले नाही. भिन्न अटी व शर्तींमुळे काही औष्णिक विद्युत केंद्रातील दंडात्मक वसुली व्हावयाच्या रकमेमध्ये काही ठिकाणी रक्कम वसूल झाली तर काही ठिकाणी रक्कम वसूल होऊ शकली नाही. ही बाब भिन्न अटी व शर्ती ठेवल्यामुळे घडून आली. खरे पाहता, सर्व औष्णिक विद्युत केंद्रातील निविदाधारकांसाठी एकच एकरुप असे निविदा धोरण अवलंबून तसा करार करणे आवश्यक होते. अशा त्रुटींमुळे विज निर्मिती कंपनीला दंडात्मक कलमातून मिळणाऱ्या आर्थिक बाबीपासून वंचित व्हावे लागले, ही बाब अतिशय गंभीर आहे. याबाबत कंत्राटदारांकडील काही रक्कम व बँक गॅरंटी विज निर्मितीकडे जमा असली तरी लवादातील प्रकरणांमुळे सन २००७-०८ या आर्थिक वर्षापासून विज निर्मिती कंपनीला आवश्यक मिळणार असलेली आर्थिक रक्कम मिळू शकलेली नाही. पर्यायाने त्यावरील व्याजाचे देखील नुकसान झालेले आहे. यावरुन असे दिसून येते की, निविदा प्रक्रियेचा मसुदा तयार करतांना त्यामध्ये असलेल्या त्रुटींकडे संबंधित अधिकाऱ्यांनी लक्ष दिलेले नाही. त्यामुळे त्यांनी विज निर्मिती कंपनीची आर्थिक सुबध्दता राखण्याकडे कर्तव्यदक्षतेने पाहिलेले नाही. यावरुन असे दिसून येते की, महालेखाकारांनी आपल्या वाणिज्यिक परिच्छेदांमध्ये नोंदविलेले आक्षेप हे सुयोग्यच होते. **यासाठी समिती अशी शिफारस करीत आहे की, औष्णिक विद्युत केंद्रातील कोळशामधून दगड, शेल व इतर कठीण वस्तू काढून टाकण्यासाठी निविदा करतांना त्या मुख्य कार्यालयाकडूनच वरिष्ठ पातळीवरुनच तयार केल्या जाव्यात. जेणेकरुन त्यामध्ये सुसूत्रता व एकरुपता राखता येईल. निविदाकारासाठी असलेल्या पात्रता कसोट्यांमध्ये निर्बंधक असलेल्या अटी शिथिल कराव्यात, जेणेकरुन स्थानिक पातळीवरील उच्च शिक्षित असलेल्या तरुण बेरोजगार युवकांकडून देखील अशा प्रकारच्या कामासाठी अनुभव घेण्याच्या दृष्टीने निविदा सादर करण्याचा दृष्टीकोन तयार होईल व त्यामुळे यासाठी कंत्राटदारांची असलेली मक्तेदारी देखील संपुष्टात येईल. दंडात्मक स्वरुपाच्या कलमांमध्ये एकरुपता नसल्यामुळे कंपनीच्या ज्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून त्यावेळी तयार करण्यात आलेल्या निविदा कलमांच्याबाबत त्रुटी राहण्यामागील कारणे स्पष्ट होण्याच्या दृष्टीने याबाबत वरिष्ठ स्तरावरुन चौकशी करावी. निविदातील त्रुटींमुळे दंडात्मक वसूलीच्या रकमेपासून वंचित रहावे लागल्यामुळे कंपनीचे आर्थिक नुकसान झाले. याबाबीस जे अधिकारी जबाबदार असतील अशा अधिकाऱ्यांवर कडक कारवाईचे धोरण अवलंबिण्यात यावे. इतर देशातील औष्णिक विद्युत केंद्रात वापरल्या जाणाऱ्या क्रॅश कोळसा पध्दतीबाबत आपल्या राज्यातील विद्युत केंद्रामध्ये काही प्रमाणात वापर होत असला तरी त्याचा पूर्णत: वापर होत नसल्यामुळे यांत्रिक बिघाडाबाबत सक्षमता निर्माण होणार नाही. यासाठी क्रॅश कोळसा पध्दतीचा वापर**

करण्याच्या दृष्टीने सर्वंकष विचार करुन धोरणात्मक निर्णय घ्यावा. याप्रकरणी करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्याच्या आत देण्यात यावी.

तीन :अग्नि प्रतिबंधक उपकरणांची खरेदी :

३.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००७-२००८ च्या (वाणिज्यिक) अहवालातील प्रकरण क्रमांक तीन मधील परिच्छेद क्रमांक ३.९ मध्ये "अग्नी प्रतिबंधक उपकरणाची खरेदी" या संबंधात महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले आहेत.

कंपनीने परळी-वैजनाथ (एनपीटीपी) येथील नवीन परळी औष्णिक प्रकल्पासाठी अग्नि प्रतिबंधक उपकरणाचे मागणीपत्र ऑक्टोबर, २००६ मध्ये दिले होते. त्यावेळी प्रचलित असलेल्या खरेदी पध्दतीनुसार, या खरेदी करारांना मुख्यालयानेच अंतिमरुप द्यावयाचे होते. मागणीपत्राच्या आधारावर कंपनीच्या मुख्यालयाने जानेवारी २००७ मध्ये निविदा मागविलेल्या व जून २००७ मध्ये मागणी आदेश देण्यात आले व रुपये ३३.८७ लाख किंमतीची उपकरणे एनपीटीपीमध्ये सप्टेंबर - ऑक्टोबर २००७ मध्ये प्राप्त झाली होती. त्या कालावधी दरम्यान कंपनीच्या कार्यकारी संचालकाच्या (ईडी) निर्देशानुसार (डिसेंबर २००६) एनपीटीपीने फेब्रुवारी व मे २००७ या कालावधी दरम्यान एकच देकाराच्या अधारावर रुपये ६०.५५ लाख किंमतीच्या अग्निप्रतिबंधक व उपकरणाची स्थानिकरित्या खरेदी करण्याचे मागणी आदेश दिले होते.

लेखापरीक्षणाच्या निदर्शनास आले (जुलै २००७) की एनपीटीपी यांनी अग्निप्रतिबंधक उपकरणे खरेदीचे अग्रिम नियोजन केले नव्हते व औष्णिक विद्युत केंद्र ऑगस्ट २००६ प्रज्वलीत झाल्यानंतर अग्निप्रतिबंधक उपकरणे खरेदी करण्यासाठी रेड इन्डेट कंपनीच्या मुख्यालयाला पाठवून (ऑक्टोबर २००६) दिले होते. औष्णिक विद्युत केंद्राचे संरक्षण करण्याचे ऑस्टेन्सिबल कारणावरुन त्याच विनिर्देशाची उपकरणे स्थानिकरित्या बाह्यकारी कारणावरुन खरेदी केली होती. कंपनीच्या मुख्यालयाने फेब्रुवारी, २००७ मध्ये मिळालेल्या देकाराच्या आधारावर मिळालेल्या दरांशी तुलना करता हे दर तीन पट जास्त होते. मुख्यालयामध्ये निविदाद्वारा मिळालेले दर व स्थानिक दरांमधील फरक खाली देण्यात आलेला आहे.

अ.क्र.	बाबींचा तपशील	स्थानिक खरेदीचे दर प्रति युनिट रुपयांमध्ये	मुख्यालय खरेदीचे दर प्रति युनिट रुपयांमध्ये	तफावत युनिट
१.	अभियांत्रिकी अग्निशामके आयएस ४९४७ (९ लिटर)	३,८६४	१,२३४	२,६३०

२.	अभियांत्रिकी अग्निशामके आयएस १३३८६ (५० लिटर)	२१,८५१	६,५८५	१५,२६६
३.	कोरडी रासायनिक भुकटी आयएस १०६५८ (७५ किलो)	५३,३२३	१५,४०७	३७,९१६
४.	कोरडी रासायनिक भुकटी आयएस १०६५८ (२५ किलो)	२१,४०२	९,२५७	१२,१४५
५.	कोरडी रासायनिक भुकटी आयएस २१७१ (१० किलो)	४,२१८	१,५१२	२,७०६
६.	सीओ २-२२.५ किलो आयएस २८७८/८६	२५,९९६	१०,०४१	१५,९५५
७.	सीओ २-६.५ किलो आयएस २८७८/८६	१५,२२७	३,९६२	११,२६५

औष्णिक विद्युत केंद्राने स्थानिकरित्या खरेदी केलेल्या सामानामध्ये एकूण रुपये ६०.५५ लाख सामान खरेदीमध्ये मुख्यालयाने खरेदी केलेल्या दरांशी तुलना करता रुपये ४१.६१ लाख एकूण जादा खर्च झाला होता. असेही निर्दशनास आले की, मुख्यालयाने फेब्रुवारी २००७ मध्ये कंत्राट दराचे देकार असलेल्या निविदा उघडल्या होत्या हे माहित असतानाही एनपीटीपीने (फेब्रुवारी व मे २००७) अत्यंत जास्त दराने स्थानिय खरेदी केली होती. त्याशिवाय कंपनीच्या मुख्यालयाने स्थानिक स्तरावर केलेली खरेदी विचारात न घेतल्यामुळे मुख्यालयाच्या मागणी आदेशानुसार रुपये ३३.८७ लाख किंमतीचे जादा सामाम प्राप्त झाले होते व ते भांडारात ठेवण्यात आले होते. (मे २००८)

व्यवस्थापनाने म्हटले होते (ऑगस्ट २००८) की, याबाबींची चौकशी करण्यासाठी अंतर्गत चौकशी आदेशित करण्यात आली होती व त्यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर उत्तर पाठविण्यात येईल. शासनाने (सप्टेंबर, २००८) देखील कंपनीच्या दृष्टीकोनाची पृष्टी केली होती. पुढील प्रगती प्रलंबित होती. (डिसेंबर २००८)

३.२ याप्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्म लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करतांना असे नमूद केले आहे की, संबंधित कर्मचारी म्हणजे महाव्यवस्थापक (प्रकल्प) आणि कार्यकारी अभियंता (प्रकल्प) नवीन परळी औष्णिक विद्युत केंद्र यांच्याविरुध्द कारवाई करण्यात आली आणि त्यांना खाली नमूद केलेली शिक्षा करण्यात आली. (पहा पत्र क्र. १/इडी (जीपी-१) ऑडीट पॅरा रिप्लाय १३२ दि. ५/०२/२०१० २) संदर्भ एचवआर-III २/डीसी/३१ दि. ११.१.२०१०.)

"एक वर्षाच्या कालावधीसाठी वेतनवाढ संचयी परिणामाशिवाय राखून ठेवणे."

३.३ शासनाने महाराष्ट्र राज्य विज निर्मिती कंपनीने सादर केलेल्या उत्तराशी सहमती दर्शविली आहे.

३.४ परळी-वैजनाथ औष्णिक विद्युत केंद्रामध्ये अग्नि प्रतिबंधक उपकरण लावण्यासाठी तातडीच्या आधारावर स्थानिकरित्या खरेदी केली. त्यामुळे जादा खर्च झाल्याचे निदर्शनास आणून काही अमूल्य किंमतीचे सामान अतिरिक्त सामान म्हणून भांडारात पडून राहीले, असा महालेखाकारांनी आक्षेप

नोंदविला होता. यासंदर्भात समितीने दिनांक २५ सप्टेंबर, २०१२ रोजी विधान भवन, पुणे या ठिकाणी साक्ष घेतली असता, विज निर्मिती कंपनीचे संचालक यांनी महालेखाकारांच्या आक्षेपासंबंधाने विशद केले की, याप्रकरणी महाव्यवस्थापक (प्रकल्प) आणि कार्यकारी अभियंता (प्रकल्प), परळी औष्णिक विद्युत केंद्र यांच्यासंबंधी वेतनवाढ संचयी परिणामाशिवाय राखून ठेवण्याची कार्यवाही केली आहे, असे नमूद केले. याबाबत अधिक स्पष्टीकरण होण्याच्या दृष्टीने ऊर्जा विभागाचे सचिव व महाराष्ट्र विज निर्मिती कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक व इतर अधिकारी यांनी दिनांक २८ फेब्रुवारी, २०१३ रोजी साक्ष घेतली. त्यावेळी समितीने सुचविल्यानुसार अधिक स्पष्टीकरण करतांना विज निर्मिती कंपनीचे संचालक यांनी सांगितले की, अग्नि प्रतिबंधक उपकरण खरेदीसाठी अग्रीम नियोजनाची कार्यवाही केली नव्हती. अग्रीम नियोजन केले गेले असते तर स्थानिक पातळीवरुन तातडीने खरेदी करण्याची अवस्था निर्माण झाली नसती. ही बाब मान्य असल्याचे त्यांनी नमूद केले. औष्णिक विद्युत केंद्र प्रज्वलित झाल्यानंतर संरक्षण करण्यासाठी अग्नि प्रतिबंधक उपकरण बसविणे गरजेचे होते. त्यासाठी थोड्या प्रमाणावर स्थानिक खरेदी करण्यास परवानगी दिली होती. परंतु, मुख्य कार्यालयाकडून अग्नि प्रतिबंधक वस्तुंची खरेदी केल्यानंतर स्थानिक पातळीवरील प्रक्रिया थांबविली गेली. स्थानिक पातळीवरील खरेदी व मुख्य कार्यालयाकडून करण्यात आलेली खरेदी यामध्ये तफावत होती. ही तफावत मुख्यत: ब्रॅन्डेड खरेदी व स्थानिक पातळीवरील खरेदी यामध्ये असलेली तफावत होती. ही बाब लक्षात आल्यानंतर याबाबत चौकशी केली गेली. याबाबत परळी येथील स्थानिक पातळीवरील खरेदी ही चौकशी करुन कोटेशन मागवून केली होती. तर मुख्य कार्यालयाकडून केलेली खरेदी निविदा प्रक्रिया अवलंबून केली होती. असे स्पष्ट केले. या मुद्याविषयी स्पष्टीकरण करतांना विभागीय सचिव यांनी सांगितले की, अग्नि प्रतिबंधक उपकरणासाठी खरेदी केलेल्या वस्तूंचा दर्जा हा सारखाच असतो. परंतु, स्थानिक पातळीवरील व मुख्य कार्यालयाकडील खरेदी व्यवहारामध्ये असलेल्या दरामध्ये फरक हा आक्षेप घेण्यासारखाच असतो हे मान्य आहे. यादृष्टीने या गैरप्रकाराबाबत चौकशी केलेली असून दोषींविरुध्द एक वेतनवाढ रोखण्याची शिक्षा केली आहे. ही शिक्षा किरकोळ स्वरुपाची आहे असे आपणांस वाटत नाही काय? असे समितीने निदर्शनास आणले असता, विभागीय सचिव यांनी सांगितले की, आपले म्हणणे बरोबर असून यासंदर्भात फेरअवलोकन करुन योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

३.४ अभिप्राय व शिफारशी :-

परळी-वैजनाथ औष्णिक विद्युत केंद्रामध्ये अग्नि प्रतिबंधक उपकरण लावण्यासाठी तातडीच्या आधारावर स्थानिकरित्या खरेदी केली. त्यामुळे जादा खर्च झाल्याचे निदर्शनास आणून काही अमूल्य

किंमतीचे सामान अतिरिक्त सामान म्हणून भांडारात पडून राहीले. असा महालेखाकारांनी आक्षेप नोंदविला होता. याबाबत साक्षीच्या वेळी समितीसमोर आलेल्या माहितीवरुन परळी येथील महाव्यवस्थापक (प्रकल्प) व कार्यकारी अभियंता महाव्यवस्थापक (प्रकल्प) हे चौकशी अंती जबाबदार असल्याचे निष्पन्न झाले. **त्यांच्यावर एक वर्षाच्या कालावधीसाठी वेतनवाढ रोखण्याची केलेली कारवाई ही सौम्य स्वरुपाची कार्यवाही असून विज निर्मिती कंपनीला आर्थिक दृष्ट्या नुकसानीस जबाबदार ठरलेल्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई होणे गरजेचे आहे, असे समितीचे स्पष्ट मत आहे. मुख्यत्वे स्थानिक पातळीवरील खरेदी व मुख्य कार्यालयातील खरेदी यामधील तफावत असलेल्या रकमेचा समावेश असला तरी यामधील खरेदी केलेले सामान अतिरिक्त पडून राहिल्यामुळे नुकसान झाले होते ही बाब दुर्लक्षित करण्यासारखी नाही. संबंधीत अधिकाऱ्यांनी कर्तव्यदक्षतेने वागणे अत्यंत गरजेचे होते. यासाठी समिती शिफारस करीत आहे की, याप्रकरणी कंपनीच्या झालेल्या आर्थिक नुकसानीस जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करुन संबंधित अधिकाऱ्यांकडून नुकसान झालेली रक्कम वसूल करण्यात यावी. याप्रकरणी करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्याच्या आत देण्यात यावी.**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी

एक : १.१ वीज देयकाची कमी वसूली :-

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००८-२००९ च्या (वाणिज्यिक) अहवालातील प्रकरण क्रमांक चार मधील परिच्छेद क्रमांक ४.७ मध्ये **वीज देयकाची कमी वसुली** यांचे संबंधात महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले आहेत की,

सात वाणिज्यिक ग्राहकांचे औद्योगिक ग्राहक म्हणून चुकीचे वर्गीकरण केल्याने त्यांच्याकडून विद्युत आकारापोटी रुपये ७.५९ कोटीची कमी वसूली झाली.

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या (एमईआरसी) मान्यतेने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित (कंपनी) ग्राहकांना पुरवठा करण्याच्या वीज दरामध्ये वेळोवेळी बदल करत असते. ज्या उद्देशाकरिता वीजेचा वापर केला जातो त्याला अनुसरून ग्राहकांचे वेगवेगळ्या प्रकारात वर्गीकरण-जसे की, औद्योगिक, रेल्वे, कृषि, व्यापारी वगैरे करण्यात येऊन त्याप्रमाणे वीज दर (टॅरीफ) निश्चित करण्यात येतात. या दृष्टीकोनातून विद्युत ग्राहकांचे नेमके वर्गीकरण करणे अतिशय महत्त्वाचे आहे कारण चूकीच्या वर्गीकरणामुळे कंपनीच्या महसूलावर प्रतिकुल परिणाम व्हायची शक्यता असते.

एमईआरसीच्या टॅरीफ ऑर्डरप्रमाणे (मे २००७) व्यापारी ग्राहकांचे वर्गीकरण एचटी-सहा या प्रकारात मे २००७ पासून करण्यात आले. यानंतर एमईआरसीने (मे २००८) उच्च दाब विद्युत पुरवठा (एचटी सप्ले) घेणाऱ्या व्यापारी ग्राहकांचा आधीच अस्तित्वात असलेल्या एचटी- I औद्योगिक या वर्गवारीत एचटी- II व्यापारी या नव्याने निर्माण केलेल्या गटात समावेश केला. याची अंमलबजावणी जून २००८ पासून करण्यात आली होती.

पुणे अर्बन सर्कलमधील उच्च दाब ग्राहकांना कंपनीने दिलेल्या देयकांच्या लेखापरीक्षणात ग्राहकांचे चुकीचे वर्गीकरण आल्याने त्यांना (मार्च २००९) चूकीची बिले देण्यात येऊन त्यांच्याकडून देयकाची कमी वसूली झाल्याची सात प्रकरणे उघडकीस आली. त्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

- गोदरेज प्रॉपर्टीज ॲण्ड इन्वेस्टमेंट लिमिटेड (जीपीआयएल) यांना वाणिज्यिक संकुल करिता विद्युत पुरवठा मंजूर करण्यात आला होता. (फेब्रुवारी, २००४) एप्रिल २००४ मध्ये विद्युत पुरवठा सुरु करण्यात आला. परंतु या ग्राहकांचे वाणिज्यिक गटाऐवजी औद्योगिक गटात चुकीचे वर्गीकरण करण्यात आले व त्यानुसार विद्युत देयक बनविले गेले. चूकीच्या वर्गीकरणामुळे एप्रिल २००४ ते

फेब्रुवारी २००९ या कालावधीमध्ये ग्राहकाकडून रुपये २.८४ कोटीची वसूली (शॉर्ट रिकव्हरी) केली गेली.

- जेस्को कॉर्पोरेशन लिमिटेड (जीसीएल) यांना वाणिज्यिक संकुलाकरिता (कमर्शिअल कॉम्प्लेक्स) करिता विद्युत पुरवठा मंजूर करण्यात आला (नोव्हेंबर २०००) या ग्राहकाबरोबर करण्यात आलेल्या (नोव्हेंबर २०००) करारामध्ये पण वीजेचा उपयोग वाणिज्यिक संकुलाकरीता करणार असल्याचे नमूद करण्यात आले होते. विद्युत पुरवठा एप्रिल २००१ पासून सुरु करण्यात आला. परंतु या ग्राहकाला "वाणिज्यिक ग्राहक" या गटात टाकण्याऐवजी "औद्योगिक गटात" चुकीने टाकून त्याप्रमाणे दर आकारणी करण्यात आली. चुकीच्या वर्गीकरणामुळे मे २००१ ते फेब्रुवारी २००९ या कालावधीत त्यामुळे रुपये २.४९ कोटीची कमी वसूली झाली.

- कंपनीने डिसेंबर २००३-०८ या कालावधीत पुणे येथे नवीन शहर विकसित करण्यासाठी मगरपट्टा टाऊनशिप डेव्हलपर्स ॲण्ड कन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेडला (एमटीडीसीसीएल) दहा उच्च दाब जोडण्या दिल्या. या दहा जोडण्या नव्याने बसविल्या जाणाऱ्या शहरांतील माहिती तंत्रज्ञान, उद्यान, क्लब, व्यायामशाळा, तयार मिश्रण संयंत्र (रेडी मिक्स प्लान्ट), मध्यवर्ती उद्यान व पाणी पुरवठा योजनेस विद्युत पुरवठा करण्यासाठी देण्यात आल्या होत्या. लेखापरीक्षणात असे आढळून आले की, एमईआरसीने मे २००८ मध्ये जारी केलेल्या टॅरीफ ऑर्डर प्रमाणे या १० जोडण्यांपैकी चार चोडण्यांचे (ग्राहक क्रमांक १७००१९०३०२४, १७००१९०३१०७, १७००१९०३१८३,१७००१९०३३०१) पूर्वीच्या

  एचटी-१ इंडस्ट्रीअल ग्राहक प्रवर्गातून नव्याने निर्माण केलेल्या एचटी-II वाणिज्यिक या प्रवर्गात स्थानांतरण न केल्याने जून २००८ व फेब्रुवारी, २००९ या कालावधीत रुपये १.१० कोटीची कमी वसूली झाली.

- कंपनीने भारती एअरटेल लिमिटेड (बीएएल) या कंपनीस ग्राहक सेवा व माहिती केंद्राकरिता उच्च दाब वीज जोडणी दिली (जून २००७) (ग्राहक क्रमांक १७००१९०३२३४), बीएएल द्वारा संचालित गतिविधी वाणिज्यिक स्वरुपाची असल्याकारणाने एमईआरसीने मे २००७ मध्ये जारी केलेल्या व तेव्हापासूनच लागू असणाऱ्या शुल्क-आदेशाप्रमाणे बीएएलचा समावेश "व्यापारी ग्राहक" या गटात करुन एचटी-VI या वर्गवारीप्रमाणे देयक आकारावयास हवे होते. तसेच जून २००८ पासून बीएएलला एमईआरसीने मे २००८ मध्ये जारी केलेल्या टॅरीफ प्रमाणे एचटी-II वाणिज्यिक प्रवर्गास लागू असलेल्या दराप्रमाणे देयक आकारावयास पाहिजे होते. परंतु "व्यापारी" ग्राहकांऐवजी

"औद्योगिक ग्राहक" समजून केलेल्या आकारणीमुळे जुलै २००७ ते फेब्रुवारी, २००९ या कालावधीत रुपये १.१६ कोटींची कमी वसूली झाली.

वरील सर्व प्रकरणात ग्राहकांचे चुकीचे झालेले वर्गीकरण कंपनीने मार्च २००९ पासून दुरुस्त केले.

व्यवस्थापनाने वस्तुस्थिती स्विकारली व सांगितले की (जुलै २००९) जीपीआयएल आणि जीसीएल यांना फरकाच्या रकमेची पुरक बिले (सप्लीमेंटरी बिल्स) पाठविण्यात आली होती. परंतु त्यांनी क्रमश: ग्राहक वाद निराकरण संच आणि मा.उच्च न्यायालयात आव्हान देऊन वसूली करण्याविरोधात मनाई हुकुम मिळविला आहे. शासनाचे उत्तर मात्र प्राप्त व्हावयाचे होते. (डिसेंबर २००९)

एमटीडीसीसीएल व बीएएल यांच्याकडून येणे असलेल्या रुपये २.२६ कोटीची (एमटीडीसीसीएल रुपये १.१० कोटी व बीएएल रुपये १.१६ कोटी) रकमेची क्रमश: मे आणि जून २००९ मध्ये वसुली झाल्याचे सांगितले (जुलै २००९) कंपनीने असे पण सांगितले की, ग्राहकांना देण्यापूर्वी सर्व उच्च दाब देयकाची तपासणी करण्याकरिता सर्कल पातळीवर अंतर्गत तपासणी प्रणाली (इंटर्नल चेक सिस्टीम) अस्तित्वात आहे व उच्च दाब ग्राहकांच्या देयकांचे प्रतिवर्षी अंतर्गत लेखापरीक्षण पण होते. शासनाने व्यवस्थापनाच्या उत्तरास दुजोरा दिला (ऑगस्ट २००९) कंपनीचे उत्तर समर्थनीय नाही. कंपनीच्या म्हणण्याप्रमाणे कनिष्ठ व्यवस्थापक / सहाय्यक लेखाकारांकडून उच्च दाब देयकांची १०० टक्के तपासणी होत असून देखील कंपनीच्या एका सर्कल कार्यालयातील ग्राहकांना चुकीच्या दराने देयके दिली जात असल्याचा प्रकार उघडकीस न येणे अंतर्गत नियंत्रण पध्दतीत (इंटरनल कंट्रोल सिस्टीम) गंभीर स्वरुपाची अकार्यक्षमता असल्याचे सूचित करते. या प्रकरणी प्रत्येक पातळीवर जबाबदारीचे मानदंड (पॅरामीटर्स) ठरवून सर्व दोषी कर्मचाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करावी. कंपनीने आपल्या अंतर्गत तपासणी प्रणालीत विशेषत्वाने सर्व उच्च दाब ग्राहकांच्या विशिष्ठ वर्गीकरणाच्या संदर्भात अमूलाग्र बदल करण्याची आवश्यकता आहे.

१.२ याप्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करतांना असे नमूद केले आहे की,

१) उपभोक्त्याचे नाव मे गोदरेज प्रॉपर्टीज ॲण्ड इन्व्हेस्टमेंट लि. पत्ता : गोदरेज कास्टीमेन, रुबी हॉलच्या पुढे, पुणे -४११ ००१
उपभोक्ता क्र : १७००१९०२७३५-०
जोडलेला भार : १७०९ केडब्ल्यू
करारातील मागणी : १५९१ केडब्ल्यू

जोडणीची तारीख : ०६.०४.२००४
कराराची तारीख : २२.०३.२००४
जोडणीच्या तारखेनंतर लावलेला दर : एच टी-१ आता दर एच टी-२ (वाणिज्य) बदललेला आहे.

मे.गोदरेज प्रॉपर्टीज ॲण्ड इन्व्हेस्टमेंट लि. (GPIL) यांना एचटी जोडणी क्र. १७००१९०२७३७-० यानुसार वाणिज्य संकुलसाठी (Commercial Complex) मंजूर झाले होते व त्यासंबंधात करार दि. २२.०३.२००४ रोजी करण्यात आला. मात्र डी.ओ.सी.कडून एच टी-१ आय एन डी दराने देयक देण्यात आले.

कार्यकारी अभियंता बंडगार्डन विभाग यांनी प्रत्यक्ष पडताळणी केली असता असे आढळून आले की, सदर उपभोक्ता वीज पुरवठा औद्योगिक व वाणिज्य कार्ये अशा संयुक्त हेतुसाठी वापरत होता. कार्यकारी अभियंता बंडगार्डन विभाग यांच्या अहवालानुसार कार्यालयीन आदेश क्र. इइ/बीजीडी/टेस्ट/एचटी-२७३७/१४१५ दि. ३०.०३.२००९ आणि पडताळणी अहवालानुसार दोन पुरवणी देयके देण्यात आली.

१) दि. १६.०६.२००६ ते ३१.०५.२००८ या कालावधीसाठी पुरवणी देयक एच.टी-१ याऐवजी बदललेला दर एचटी-२ वाणिज्य या प्रमाणे रु. १,९७,४८,९६० असे एसइ/आरपीयुसी/एचटी-२७३७/३१२९ दि. २०.०४.२००९ याप्रमाणे दि. ०१.०६.२००८ पासून वाणिज्यिक दराच्यापोटी सुरु केलेल्या नवीन दरपत्रकानुसार देण्यात आले.

२) दि. ०१.०४.२००४ ते ३१.०५.२००६ या कालावधीसाठी पुरवणी देयक दरपत्रक एचटी-आयएनडी ऐवजी एचटी-व्हीआय-सी असे बदलून रु. ८७,२९,२८०/- इतक्या रकमेचे देण्यात आले.

मेसर्स जीपीआयएल यांनी पुरवणी देयकांविषयी दि. १३.०५.२००९ रोजी अंतर्गत गाऱ्हाणी निराकरण कक्ष (युनिट) रास्तापेठ यांचेकडे तक्रार केली. आणि त्याची सुनावणी ०३.०६.२००४ रोजी झाल्यावर सदर IGRU युनिटने महावितरणच्या बाजूने निर्णय एसई/आरपीयुसी/टी/जीआरयू/४४९४ दि. ०९.०६.२००९ नुसार दिला.

मेसर्स जीपीआयएल यांनी अंतर्गत गाऱ्हाणी निराकरण कक्षाच्या निर्णयाविरुध्द तक्रार निवारण मंच, पुणे परिमंडळ यांचेकडे तक्रार नोंदही या मंचाकडे अंतिम सुनावणी दि. ०३.०८.२००९ रोजी घेतली आणि आदेश क्र. इइ/सीजीआरएफ/केस नं. ११ वर्ष २००९/११७ चे दि. १०.०८.२००९ नुसार सदर तक्रार फेटाळून लावली. सदर उपभोक्त्याने मा.विद्युत ऑम्बडसमन, मुंबई यांचेकडे निवेदन क्र. १०८/२००९ दि. ०१.०९.२००९ रोजी दिले. त्यावर मा.विद्युत ऑम्बडसमन, यांनी आदेश क्र. इलेक्ट्रीक/ऑम्बड/एमइआरसी/१०८ वर्ष २००९/३०८ चा दि. ०९.१०.२००९ नुसार अंशतः महावितरण

कंपनीला अनुकूल निर्णय दिलेला आहे. आता महावितरण कं. ने मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडे विनंती अर्ज क्र. ७६१४/२०१० जुलै २००९ मध्ये दाखल केला आहे. तसेच सदर उपभोक्ताने सुध्दा महावितरण विरुध्द जुलै, २००९ मध्ये विनंती अर्ज क्र. ५६८/२०१० दाखल केलेला आहे.

२) उपभोक्त्याचे नाव मे.जेस्को (GESCO)
पत्ता : सीटीएस क्र. १३०/१, वाणिज्य संकुल, विमानतळ मार्ग, येरवडा, पुणे -४११००६.
उपभोक्ता क्र : १७००१९०२४०५-०
जोडलेला भार : २००० के डब्ल्यू
कराराने मागणी : ११०० केव्हीए
जोडणीची तारीख : २३.०४.२००१
जोडणी तारखेनंतर लागु केलेले दर - एचटी -आयएनडी
आता बदललेला दर - एचटी-२ (वाणिज्य) असा आहे.

सदर उपभोक्ताच्या जागेची भरारी पथक, पुणे परिमंडळ यांनी दि. ०३.०३.२००९ रोजी पहाणी केली असता असे निदर्शनास आले की, तेथील वीज पुरवठ्याचा इतर वीज वापर कर्त्यांना ५८ अनधिकृत उप मीटर सब मीटर्स स्थापन करुन विस्तार करण्यात आलेला आहे. याबद्दल हंगामी देयक रु. २१,६४,०४,३९०/- एवढ्या रकमेचे एस इ/ आर पी यु व्ही टी/स्टेनो/३९३८ दि. १२.०३.२००९ विद्युत अधिनियम २००३ च्या कलम १२६(इ) नुसार देण्यात आले. या सुनावणीबाबत मूल्यांकन करणारे अधिकारी अधिक्षक अभियंता, आर.पी.यु.सी.यांनी क्र. एसई/आरपीयुसी/२८०५ दि. ११.०५.२००९ यानुसार हंगामी देयक कायम केले आहे.

आता सदर ग्राहकाने ५० टक्के रक्कम म्हणजे रु. १०,८२,०२,२००/- पावती क्र. पी.यू.०१००३२८४ दि. ०३.०४.२०१० यानुसार भरली आहे. आता विद्युत अधिनियम २००३ च्या कलम १२७ अंतर्गत मुख्य अभियंता (विद्युत) सार्वजनिक बांधकाम विभाग (PWD) मुंबई यांचेकडे अपील केले आहे.

मेसर्स मगरपट्टा टाऊनशीप डेव्हलपमेंट ॲन्ड कन्स्ट्रक्शन कं.लि.या उपभोक्त्याकडून केलेली वसूली खालीलप्रमाणे आहे.

ग्राहक क्र.	वसूल रक्कम (कोटीमध्ये)	वसुलीची तारीख	पावती क्रमांक
१७००१९०३१०७-०	०.४१	१९.५.०९	पीयू ००९०४८७४
१७००१९०३१८३-०	०.११	१८.५.०९	पीयू ००९०४८२८
१७००१९०३३०१-०	०.३०	१८.५.०९	पीयू ००९०४८२७
१७००१९०३०२४-०	०.२८	१६.५.०९	पीयू ००९०४७८०
एकूण	**१.१०**		

३) उपभोक्त्याचे नाव : भारती एअरटेल लि.
पत्ता : इ-स्पेस बिल्डींग नं. ए-३, तिसरा माळा आय.टी.पार्क, वडगाव, शेरी, पुणे.
उपभोक्ता क्र : १७००१९०३२३४-०
जोडलेला भार : ७१९८ डी के डब्ल्यू : १२३२ केडब्ल्यू इतका वाढविला
मागणीचा करार : ७०० केव्हीए : ८५० केडब्ल्यू दि. २८.११.२००७ पासून
जोडणीची तारीख : ०२.०६.२००७
कराराचा उद्देश : दुर संचार (Telecom)
तारखेपासून लागू केलेला दर : एच टी -आय एन डी
ऑफ कनेक्शन :-
आता बदललेला दर - एच टी-(२) आय एन डी

मे.भारती एअरटेल लि. यांनी दुरसंचार कामासाठी अर्ज केला होता. सदर उपभोक्त्याने, उद्योग संचालनालयाचे (डी आय सी) पुणे यांचे दि. ०८.१२.२००६ चे प्रमाणपत्रही जोडले होते. त्यात उद्देश बेसील टेलीकॉम सर्विसेस कॉल ॲन्ड डेटा सेंटर (सर्विस) असा नमूद केला होता.

याच्या कराराची अंमलबजावणी ०७.०५.२००७ रोजी दूर संचार या उद्देशासाठीच झाली होती म्हणून या उपभोक्त्यास जोडणीच्या तारखेपासून एच टी - आय एन हा दर लागू करण्यात आला होता.

आता, म.रा.वि.नि.आयोगाच्या (MERC) दिनांक ३१.०५.२००८ च्या दर आदेशानुसार श्रेणी एच टी-II (२) (वाणिज्य) दि. १ जून २००८ पासून लागू करण्यात आला. जोडणीच्या वेळी लावलेला दर हा बरोबर आहे. कारण त्यावेळी वाणिज्य / दूरसंचार या उद्देशासाठी वेगळा वीज दर नव्हता म्हणून दरामध्ये समाविष्ट नसणाऱ्या श्रेणींना एच टी -II याच दराने देयके दिली जात.

मार्च ०९ मध्ये सदर दर एचटी-२ वाणिज्यिक असा बदलण्यात आला आहे. सदर उपभोक्त्याने मार्च ०९ चे देयक रु. १,०१,५५,१२० आणि दराच्या फरकाची रक्कम रु. १४,१५,९३०/- असे सदर ग्राहकाला या कार्यालयाचे पत्र क्र. एसई/ आरपीयुसी/ एच.टी-३२३४/३१२७ दि. २२.०४.२००९ यानुसार देण्यात आले. सदर उपभोक्त्याने देयके भरली त्याचा तपशील असा :

ग्राहक क्र.	**पावती क्रमांक**	**दिनांक**	**वसूली रु. (कोटीमध्ये)**
१७००१९०३२३४	पी ००९०५३३४	८.३.२००९	१.०१
	पी ००९०५९१६	२०.६.२००९	०.१५
एकूण			**१.१६**

१.३ शासनाने कंपनीच्या उत्तराशी सहमती दर्शविली आहे.

१.४ पुणे अर्बन सर्कलमध्ये उच्च दाब ग्राहकांना सात वाणिज्यिक औद्योगिक ग्राहक म्हणून चुकीचे वर्गीकरण केल्यामुळे त्यांच्याकडून विद्युत आकारापोटी कमी वसुली झाली असा महालेखाकार यांनी आक्षेप नोंदविलेला होता. याबाबत ऊर्जा विभाग व महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी यांनी सादर केलेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने मंगळवार, दिनांक २९ जानेवारी, २०१३ रोजी साक्ष घेतली. याबाबत समितीने महालेखाकारांनी लेखापरीक्षणामध्ये घेतलेल्या आक्षेपासंबंधाने अधिक स्पष्टीकरण करण्याविषयी सांगितले असता, विज वितरण कंपनीचे संचालक (वित्त) यांनी सांगितले की, पुणे सर्कलमध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने गोदरेज प्रॉपर्टीज ॲन्ड इन्व्हेसमेंट लिमिटेड, मे.जेस्को, मेसर्स मगरपट्टा टाऊनशीप डेव्हलपमेंट ॲन्ड कन्स्ट्रक्शन, भारती एअरटेल लिमिटेड या कंपन्यांना वीज दर कमर्शिअल आकारण्याऐवजी औद्योगिक वीज दराची आकारणी करण्यात आलेली आहे. या चारही कंपन्यांकडून ७.५९ कोटी रुपयांची वसूली करावयाची होती. त्याच्यापैकी मगरपट्टा टाऊनशीप डेव्हलपमेंट ॲन्ड कन्स्ट्रक्शन या कंपनीकडून २० लाख व भारती एअरटेल लिमिटेड या कंपन्यांकडून वसुली झालेली नाही. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने गोदरेज प्रॉपर्टीज ॲन्ड इन्व्हेस्टमेंट लिमिटेड कंपनीकडील वसुली ६.८४ लाख होती. त्याच्यापैकी पुरवणी दोन देयके दिली होती. त्या देयकाच्या अगेन्स्ट महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने गोदरेज प्रॉपर्टीज ॲन्ड इन्व्हेस्टमेंट लिमिटेड कंपनीने प्रथम इंटरनल ग्रिव्हेन्स फोरमकडे तक्रार केली. त्या तक्रारी संदर्भात फोरमने विद्युत वितरण कंपनीच्या बाजूने निकाल दिला. यानंतर कंपनी कंज्युमर ग्रिव्हेन्समध्ये गेली. त्या ठिकाणी देखील विद्युत वितरण मंडळाच्या बाजूने निर्णय दिला गेला. सदरहू कंपनीने इलेक्ट्रीसिटी ॲक्ट नव्याने स्थापन केलेला आहे. त्यानुसार मा.विद्युत ऑम्बडसन नेमले आहेत. विद्युत ऑम्बडसनने सदर कंपनीस पार्टली रिलीफ मिळाला. त्या रिलीफच्या विरुध्द विद्युत वितरण मंडळ उच्च न्यायालयात गेले असून सदर प्रकरण न्यायालयात सुरु आहे. उच्च न्यायालयात या प्रकरणाची सुनावणी दिनांक ३० जानेवारी, २०१३ रोजी आहे. विज दराची आकारणी व्यवसायिक दराऐवजी औद्योगिक दराची आकारण्याचे वर्गीकरण चुकीचे केले गेले अथवा विजेचा वापर चुकीच्या पध्दतीने केला जात आहे. याची तपासणी का केली गेली नाही व त्याप्रमाणे दंडात्मक कारवाई का केली गेली नाही? ही बाब कार्यालयीन चुकीमुळे झालेली आहे. त्यामुळे ग्राहकाला तक्रार मंच तसेच त्यांनी दिलेल्या निवाड्यावर न्याय मिळविण्यासाठी उच्च न्यायालयात जाण्यासाठी वाव मिळाला आहे याबाबत स्पष्टीकरण करण्याविषयी समितीने सांगितले असता, संचालक (वित्त) यांनी प्रथम विशद केलेली वस्तुस्थितीच समितीला पुन्हा स्पष्ट केली. याबाबत अधिक खुलासा करतांना विभागीय सचिवांनी सांगितले की, एमईआरसीच्या माध्यमातून विविध संवर्गातील दर हे दर वेळी निर्गमित होणाऱ्या टेरिफ ऑर्डरनुसार बदलत असतात.

वेगवेगळ्या संवर्गातील दर हे निश्चित स्वरुपातील नसल्याने विज आकारणी करतांना यासंबंधी नेहमी वाद निर्माण होतात. एमईआरसीचे स्पष्ट आदेश नसल्यामुळे ग्राहकांना न्यायालयात जाण्याची संधी मिळते. गोदरेज प्रॉपर्टीज कंपनी विजेचा चुकीच्या पध्दतीने वापर करीत होती. वीज मीटरवरील वीजनोंद करुन घेणारा कर्मचारी तांत्रिक नसतो. त्यामुळे दक्षता पथकाकडून पाहणी केल्यानंतर वीज वापराचे देयकाबाबत मत दिले जाते. त्यामुळे विज आकारणी देयकांमध्ये विसंगती आढळून येते. याबाबत प्रथम दिनांक २० एप्रिल, २००९ रोजी गोदरेज प्रॉपर्टीज ॲन्ड इन्व्हेस्टमेंट लिमिटेड कंपनीस योग्य पुरवणी वीज देयके देण्यात आलेली आहेत, असे स्पष्ट केले. ही बाब सन २००४ ते २००९ पर्यंत वीज वितरणच्या अधिकाऱ्यांच्या लक्षात का आली नाही? असे समितीने विचारले असता, ही बाब लक्षात आल्यानंतर कार्यवाही सुरु असल्याचे संचालक (वित्त) यांनी स्पष्ट केले. अधिक स्पष्टीकरण करतांना विभागीय सचिव यांनी सांगितले की, वाणिज्यिक वापरासाठी वीज वापरणारा ग्राहक औद्योगिक प्रयोजनासाठी विजेचा वापर करत असेल तर त्याच्या विज देयकाच्या रक्कमेत वाढ होते. त्यावर विद्युत वितरणचे अधिकारी प्रत्यक्ष जाऊन पाहणी करतात व अशा ग्राहकाचे गेल्या सहा महिन्यांचे वीज बिलाचे परीक्षण केले जाते. ज्या व्यवसायिकांना व्यवसायिक दराची आकारणी करावयाची आहे व जे व्यवसाय औद्योगिक क्षेत्रामध्ये वर्गीकृत करावयाचे आहे अशा ग्राहकांची स्पष्टता यादी होणे आवश्यक आहे. जोपर्यंत ग्राहक त्यांनी मागणी केलेल्या प्रयोजनानुसार वीज वापरत असेल तर त्या प्रयोजनानुसार त्याची आकारणी केली जाते, असे स्पष्ट केले. संचालक, महावितरण यांनी स्पष्टीकरण देतांना असे सांगितले की, सन २००४ मध्ये गोदरेज प्रॉपर्टीजला मॉल उभारणीकरीता विजेची जोडणी देण्यात आली होती. सन २००७ मध्ये त्यांनी व्यवसायिक कनेक्शन घेतले. त्यामुळे प्रयोजनात बदल झाल्यामुळे देयकाच्या रकमेतील फरक म्हणून २ कोटी ८४ लाख इतक्या रकमेचे पुरवणी देयक गोदरेज कंपनीला सादर करण्यात आलेले आहे. यावर समितीने असे विचारले की, देयकांच्या रकमेतील फरक हा काही कोटी रुपयातील असल्यामुळे ही बाब दुर्लक्षित करण्यासारखी नाही. यास जबाबदार कोण होते? अशा अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची आवश्यकता होती. त्यांनी वेळीच सदर विजेच्या देयकांत बदल करावयास हवा होता. तसेच एमईआरसीने विजेच्या दरात बदल केल्यास तो वेळीच ग्राहकाला कळविणे आवश्यक होते. यासंदर्भातील मत समितीने विचारले असता, संचालक (वित्त) यांनी सांगितले की, याबाबत एप्रिल, २००६ ते ऑक्टोबर, २००६ या कालावधीकरीता ग्राहकाचे वर्गीकरण एकाच संवर्गात होते. ऑक्टोबर-२००६ ते मे-२००७ या कालावधीत ग्राहकाचे वर्गीकरण बदलले गेले. तद्नंतर पुन्हा मे-२००७ ते मे-२००८ या कालावधीत पुन्हा वर्गीकरण बदलले गेले आणि १ जून २००८ नंतर पुन्हा वर्गीकरण बदलले गेले असल्याची बाब निदर्शनास आणली असता, समितीने याबाबत नाराजी व्यक्त

करुन वेळीच दक्षता न घेतल्यामुळे विजेच्या दरांतील तफावत निर्माण होऊन त्याला ग्राहकांनी देयक अदा करण्यास नकार दिला आणि प्रथम ग्राहक मंच व तद्नंतर न्यायालयात जाण्याचा निर्णय घेतला ही वस्तुस्थिती असल्याचे स्पष्ट केले.

१.५ अभिप्राय व शिफारशी :-

पुणे अर्बन सर्कलमध्ये उच्च दाब ग्राहकांना सात वाणिज्यिक औद्योगिक ग्राहक म्हणून चुकीचे वर्गीकरण केल्यामुळे त्यांच्याकडून विद्युत आकारापोटी कमी वसुली झाली असा महालेखाकार यांनी आक्षेप नोंदविलेला होता. समितीसमोर स्पष्ट झालेल्या खुलाशावरुन असे निदर्शनास येते की, ग्राहकाला करण्यांत आलेल्या विद्युत पुरवठ्यामध्ये त्यांनी वेळोवेळी अनेक संवर्गामध्ये बदल केला. परंतु, असे करत असतांना वाढीव विजेचा वापर होऊन विजदराच्या रकमेत झालेली वाढ लक्षात आल्यानंतर महावितरणच्या अधिकाऱ्यांकडून सदर ग्राहकांना विज आकारणीबाबत वीज वापराच्या संवर्गामधून बदल झाल्याचे लक्षात आणून पुरवणी देयके सादर केली. पुरवणी देयके भरणा करण्यास सदर ग्राहकांनी नकार दिल्यामुळे ग्राहक याबाबत प्रथम ग्राहक मंच व ग्राहक मंचानी दिलेल्या निर्णयाच्या विरोधात उच्च न्यायालयात गेले त्यामुळे वीज वितरण कंपनीला वीज वापरापोटी मिळावयाच्या आर्थिक बाबीपासून वंचित राहावे लागले. तसेच न्यायालयीन प्रकरणामध्ये अधिकचा खर्च देखील कंपनीला करावा लागत आहे. ही बाब ग्राहकाकडील वीज बिलापोटी यावयाच्या रकमेचा विचार करता दुर्लक्षित करण्यासारखी नाही. या बाबीसंबंधी संबंधित असणाऱ्या अधिकाऱ्यांनी इतर संवर्गातील वीज वापरामध्ये बदल झाल्यामुळे वाढीव दराची कल्पना संबंधित ग्राहकांना करुन देणे आवश्यक होते. यामध्ये कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांकडून कर्तव्यामध्ये दुर्लक्ष केल्याचे जाणून येते. **अत: समिती अशी शिफारस करीत आहे की, विविध संवर्गात बदल होणाऱ्या वीज ग्राहकांना त्यांच्या संवर्गानुसार वीज वापराच्या दरामध्ये बदल होत असल्यास त्याची वेळीच जाणीव करुन देण्यात यावी व त्याप्रमाणे बदललेल्या दराची आकारणी वीज देयकांत करण्यात यावी. जेणेकरुन ग्राहकाला तो वापरत असलेल्या विजेच्या दरासंदर्भात वेळीच माहिती मिळेल व त्यास ग्राहक मंच अथवा न्यायालयात जाण्यास वाव मिळणार नाही. तसेच या आक्षेपासंबंधात जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द चौकशी करुन कडक कारवाई करावी. याबाबत समितीने सन २००६-०७ च्या महालेखाकारांच्या आक्षेपावरील संबंधाने चुकीचे वर्गीकरण केल्यामुळे कंपनीचे झालेले नुकसान बाबत समितीच्या अकराव्या अहवालातील शिफारशीकडे लक्ष वेधण्यात येत असून अशा बाबींची जाणीवपूर्वक कार्यपध्दती अवलंबिली जात असल्याचे समितीचे मत असल्याने याबाबत त्वरेने निर्णय घ्यावा व संबंधीतांवर कार्यवाही करावी. जेणेकरुन भविष्यकाळात कर्तव्यामध्ये कसूर करुन वीज वितरण कंपनीचे**

अधिकारी/कर्मचारी आर्थिक नुकसान करु शकणार नाही. याबाबत करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्याच्या आत कळविण्यात यावी.

दोन : टाळता येण्यासारखा खर्च :-

२.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००८-०९ च्या वाणिज्यिक अहवालातील प्रकरण क्रमांक चार मधील परिच्छेद क्रमांक ४.८ मध्ये **टाळता येण्यासारखा खर्च** याच्या संबंधात महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले आहेत की,

निविदेत प्राप्त झालेला दर न स्विकारल्यामुळे जास्त दराने नंतर खरेदी करावी लागल्याचे रुपये १.७४ कोटीचा अतिरिक्त खर्च झाला.

कंपनीने दहा लाख लघु दाब (लो टेन्शन) एनकोडर असलेले व पाच लाख एनकोडर नसलेले स्टॉटिक मीटर्स खरेदी करण्याकरिता निविदा बोलाविल्या (ऑक्टोबर २००७) एचपीएल सोकोमेक प्रायव्हेट लिमिटेड (एचपीएलएस) यांनी एन्क्लोजरसहित मीटरकरिता रुपये ७६५ प्रती मीटर व एनकोडर विरहित मीटरकरिता रुपये ६.३० प्रती मीटर दिलेला (नोव्हेंबर, २००७) देकार सगळ्या देकारात न्यूनतम ठरला. (लोएस्ट बीड) कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालकांनी संचालक (वित्त), संचालक (संचालन) आणि कार्यकारी संचालक (II) यांच्या समावेश असलेल्या समितीची स्थापना (फेब्रुवारी २००८) करुन समितीस एचपीएलएस बरोबर दोन्ही प्रकारच्या मीटर्सच्या दरात कपाती संदर्भात वाटाघाटी करण्यास सांगितले. परंतु समितीने एचपीएलएस बरोबर फक्त एन्क्लोजरसहित असलेल्या मीटरच्या संदर्भात किंमती कमी करण्यासाठी वाटाघाटी केल्या. पूर्वी जुलै-२००६ मध्ये ऑर्डर दिलेल्या दरापेक्षा (रुपये ५१२.१६ प्रती मीटर) आता प्रस्तुत केलेला दर (रुपये ६३० प्रति मीटर) जास्त असल्याचे सांगून समितीने एन्क्लोजरसहित मीटरचे दर कमी करण्याकरिता एचपीएलएस बरोबर वाटाघाटी अंती रुपये ७६५ ऐवजी रुपये ७४९.७० या दराने पुरवठा करण्यास तयार झाले. त्यानुसार कंपनीने दहा लाख एन्क्लोजरसहित मीटर्स करिता संचालक मंडळाच्या (फेब्रुवारी २००८) मान्यतेने एचपीएलएसला पुरवठा आदेश दिला. (सप्लाय ऑर्डर) (फेब्रुवारी २००८)

ऑक्टोबर २००७ मध्ये बोलाविलेल्या निविदेत दर्शविलेल्या स्पेसीफिकेशन प्रमाणेच पाच लाख एन्क्लोजरसहित व पाच लाख एन्क्लोजरविरहित लघुदाब स्टॅटिक मीटर्स खरेदीकरिता पुन्हा एकदा निविदा बोलाविल्या. (एप्रिल २००८) एचपीएलएसने एन्क्लोजरसहित मीटरकरिता रुपये ७४९.७० प्रति मीटर व एन्क्लोजरविरहित मीटरकरिता रुपये ६३० प्रति मीटर दिलेला देकार सगळ्यात न्यूनतम ठरला. जीनीअस पॉवर इनफ्रास्ट्रक्चर (जीपीआयएल) यांनी एन्क्लोजरसहित व एन्क्लोजरविरहित मीटर्सकरिता

अनुक्रमे रुपये ८११.०८ व रुपये ६७१.०५ प्रती मीटर दिलेला देकार द्वितीय न्युनतम होता. (सेकन्ड लोएस्ट).

न्यूनतम बोलीदाराची (लोएस्ट बीडर) (एचपीएलएस) चार महिने मुदतीत पुरवठा करण्याची क्षमता ध्यानात घेऊन कंपनीने त्यास रुपये ७४९.७० प्रती मीटर दराने ५ लाख एन्क्लोजरसहित व रुपये ६३० प्रती मीटर दराने ७५००० एन्क्लोजरविरहित मीटर्सचा पुरवठा करण्याचा आदेश दिला (ऑगस्ट २००८) उर्वरित ४.२५ लाख मीटरकरिता एन्क्लोजरविरहित रुपये ६७१.०५ प्रती मीटर दराने द्वितीय न्यूनतम बोलीदारास - (सेकंड लोएस्ट बीडर) म्हणजेच जीपीआयएलला पुरवठ्याचा आदेश देण्यात आला.

लेखापरीक्षणात खालील गोष्टी आढळल्या :

- एचपीएलएसशी त्यांनी नोव्हेंबर २००७ मध्ये एन्क्लोजर विरहित मीटरच्या पुरवठ्यासाठी दिलेला दर कमी करण्याबाबत वाटाघाटी न करणे, एप्रिल २००८ मध्ये परत एकदा बोलाविलेल्या निविदेमध्ये तोच दर (नोव्हेबर २००७ चा) स्वीकारुन, ७५,००० एन्क्लोजर विरहित मीटर्स पुरविण्याचा आंशिक आदेश (पार्ट ऑर्डर) एचपीएलएसला देणे, यावरुन एचपीएलएसने कोट केलेला दर वाजवी असल्याचेच सिध्द होते. अशा प्रकारे एचपीएलएसने एन्क्लोजर विरहित मीटर्स पुरविण्याकरिता नोव्हेबर २००७ व एप्रिल २००८ मध्ये दिलेल्या रुपये ६३० प्रति मीटर दराने खरेदी न करण्याऐवजी जास्त दराने खरेदी केल्याने रुपये १.७४ कोटीचा जास्तीचा खर्च झाला. (रुपये ६७१.०५ प्रती मीटर - रुपये ६३० प्रती मीटर * ४.२५ लाख मीटर्स)
- एप्रिल २००८ मध्ये बोलाविलेल्या निविदेत द्वितीय न्युनतम आलेल्या बोलीदाराने म्हणजेच जीपीआयएलने प्रथम न्यूनतम बोलीदाराच्या (एल वन बिडर) न्यूनतम दरास अनुरुप दराने (मॅचींग रेट) पुरवठा करण्यास नकार दिला. दरांतील फरक लक्षात घेता एन्क्लोजर विरहित मीटर्सची संपूर्ण ऑर्डर एचपीएलएस यांनाच द्यावयास हवी होती. यामुळे पुरवठ्याचा कालावधी जरी केवळ तीन महिन्यांनी लांबला असता पण रुपये १.७४ कोटीचा अतिरिक्त खर्च टळला असता. पुढे असे पण दिसून आले की, जास्त दर देऊन सुध्दा ऑर्डर दिलेल्या ४.२५ लाख मीटर्सपैकी फक्त ०.५० लाख मीटर्स (१२ टक्के) जीपीआयएलने विहित मुदतीत पुरविले (डिसेंबर २००८) २.५ लाख मीटर्स मे २००९ पर्यंत तर उर्वरित १.२५ लाख मीटर्स जून-२००९ मध्ये पुरविण्यात आले.

शासन / व्यवस्थापनाने सांगितले (ऑक्टोबर / जुलै २००९) की, जीपीआयएलला पुरवठ्याचे विविध स्त्रोत असण्याच्या दृष्टीकोनातून ऑर्डर देण्यात आली होती. (मल्टीपल सोर्सेस) परंतु हे उत्तर स्विकार्य नाही कारण जीपीआयएलला उर्वरित आवश्यकतेकरिता पुरवठा आदेश देण्याच्या निर्णयामागे एचपीएसएसची उत्पादन व विशिष्ट कालावधीत पुरवठा करण्याची क्षमता यांचा विचार केला गेला होता. हा हेतू पण साध्य झाला नाही. अशा तऱ्हेने स्पर्धात्मक दराने अनेक स्त्रोतांद्वारा खरेदी करण्याच्या व्यवस्थापकीय धोरणात सातत्य नव्हते.

नवीन जोडण्यांसाठी तसेच नादुरुस्त मीटर्स बदलणे या दोन्ही कायम चालू राहणाऱ्या गोष्टी असल्याने शिफारस करण्यात येते की, कंपनीने स्पर्धात्मक दराने मीटर्सची खरेदी करण्यासाठी पर्यायी स्त्रोत विकसित करण्याची शक्यता आजमावी.

२.२ याप्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करतांना असे नमूद केले आहे की, संचालक (वित्त), संचालक (संचालन) आणि कार्यकारी संचालक (२) यांचा समावेश असलेल्या समितीने बाब क्र. १ म्हणजेच सिंगल फेज मिटर्स विथ एन्क्लोजर यांच्या दरासंबंधी वाटाघाटी केल्या याची पुरक टिप्पणी व त्यासोबत मेसर्स एच.पी.एल. सोकोमेस प्रा.लि. यांच्या कार्यकारी संचालकासोबत समितीने वाटाघाटी केल्यानंतरचा दर याच्या अहवालाची टिप्पणी संचालक मंडळाला सादर करण्यात आली. संचालक मंडळाच्या बैठकीत यावर चर्चा झाली व त्याच्या निदर्शनास आणण्यात आले की, बाब क्र. २ म्हणजे "सिंगल फेज मिटर्स विदाऊट एन्क्लोजर" यांच्या दरासंबंधी वाटाघाटी झाल्या नाहीत कारण एच.पी.एल. सोकोमेक प्रा.लि. यांनी उद्धृत केलेला दर (रु. ५१२.१६ प्रती मिटर) हा जुलै २००६ मध्ये निविदा क्र. ए एसपी/टी-१००३/०४०६ यानुसार नोंदलल्या आदेश (Order) च्या दरापेक्षा खूपच वरचा (जादा) होता.

येथे सादर करण्यात येते की, निविदा क्र. एसपी/टी-१००५/१००७ यातील सिंगल फेज मिटर विदाऊट बॉक्स यांच्या विनिर्देशात काही जादा वैशिष्टये आहेत म्हणजे ३३ केव्ही/स्पार्क डिसचार्ज टेस्ट, वॅकलीट डिस्प्रे, हिस्टरी डेटा सिक्स एम.डी.टॅम्पर लॉगींग फिचर्स, इन्क्लूडींग मॅगनेटीक टॅम्पर आणि टॅम्पर इन्हेंट (फोर्सीबली मीटर कव्हर ओपन) याची तुलना एसपी/टी-१००३/०४०६ या निविदेद्वारे जुलै २००६ मध्ये ऑर्डर दिलेल्या (placed) रु. ५१२.१६ या दराच्या मीटरच्या तांत्रिक विनिर्देशाशी केल्यास ही बाब लक्षात येईल. यातील सर्वात कमी दराचा बोलीदार मे.एच.पी.एल.सोकोमॅक प्रा.लि. यांचा विचार आदेशातील त्यांच्या संपूर्ण देण्याच्या क्षमतेनुसार म्हणजेच ४ महिन्यात ५ लाख सिंगल फेज मिटर्स विथ बॉक्स आणि ७५ हजार सिंगल फेज मिटर्स विदाऊट बॉक्स याचा आदेश देण्याबाबत विचार करण्यात आला. उर्वरित ४.२५ सिंगल फेज मिटर्स विदाऊट बॉक्ससाठी पुरवठ्याचा दुसरा पर्यायी पुरवठ्याचा

स्त्रोत म्हणून अन्य स्वीकारार्ह बोलीदार मे.गेनूस पॉवर इन्फा लि. हरिद्वार यांचा विचार त्यांनी उद्धृत केलेल्या दरानुसार करण्यात आला. कारण सदर फर्म सर्वात कमी स्वीकाहारार्ह बोलीदाराशी संमत करण्यास तयार नव्हती.

मे.एच.पी.एल सोकोमॅक प्रा.लि. यांनी उदधृत केलेल्या देण्याच्या क्षमतेनुसार संपूर्ण संख्येने आदेशासाठी विचार करण्यात आला. याशिवाय जुलै-२००८ मध्ये जेव्हा सध्याच्या निविदेचे अंतिमीकरण झाले तेव्हा मे.एच.पी.एल. सोकोमॅक प्रा.लि. यांना निविदा एसपी/टी-१००५/१००७ नुसार सिंगल फेज मिटर्सच्या एकूण १० लाख मिटर्स पैकी ५.२६ लाख मिटर्सचा पुरवठा करावयाचा होता. यामुळे सिंगल फेज मीटर्सचा पुरवठा सातत्याने चालू राहण्याची खात्री असावी म्हणून बहुविध स्त्रोतांचा विचार करुन मेसर्स गेनूज पॉवर इन्फा लि. चा विचार त्यांनी उद्धृत केलेल्या सिंगल फेज मिटर्स विदाऊट एन्क्लोजर्सच्या ४.२५ लक्ष नगाच्या बदलीच्या आदेशासाठी करण्यात आला. येथे नमूद करण्यात येते की, ही महसुलासंबंधीची बाब असल्याने सध्याच्या परिस्थितीत त्यांचा पुरवठा सातत्याने चालू रहाण्याची हमी असण्याची गरज आहे.

मेसर्स गेनूज पॉवर इन्फा लि. यांनी स्वीकारपत्र (LOA) तारखेपासून २ महिन्याच्या आत ५० हजार मीटर्सचा पहिला हप्ता (Lot) याचा पुरवठा करायचा होता. आता पहिल्या हप्त्यातील नमून्यांचे स्वतंत्र प्रयोगशाळेद्वारे समाधानकारक परीक्षण, अहवाल आल्यानंतरच आदेशाला उर्वरित नगांचा पूर्ण पुरवठा करायचा होता. मे.गेनूज पॉवर इन्फा लि. यांच्या पुरवठ्याच्या पहिल्या हप्त्याला मीटर्स नमूने दि. २६.१२.२००८ रोजी मेसर्स इआर डी.ए. यांच्याकडे परीक्षणार्थ पाठविण्यात आली. इ.आर.डी.ए. यांचेकडून पहिल्या हप्त्यातील नमूना मिटर्सच्या परीक्षणांचा अहवाल दि. १८.०२.२००९ रोजी मिळाला. या अहवालाचे बारकाईने वाचन केल्यावर लक्षात आले की, पाठविलेले नमुने इ.आर.डी.ए. यांच्या परीक्षण चाचणीत यशस्वी झाले होते. यामुळे उर्वरित ३.७५ लाख नगासाठीचा पुरवठा करण्याचा आदेश पत्र १५६० दि. ०४.०३.२००९ यानुसार देण्यात आला. या फर्मने संपूर्ण संख्येचा पुरवठा जून २००९ मध्ये केला. त्याचा पुरवठा पूर्ण करण्याची अंतिम मुदत मे-२००९ ही होती.

मीटर्सची गरज ही सतत चालणारी प्रक्रीया आहे आणि त्याच्या संख्येचा अंदाज हा नवीन जोडणीची गरज सदोष मिटर्स बदलणे, वीज चोरी मोहीम इ.च्या अनुषंगाने केला जातो व त्यानुसार मिटर्स खरेदीची प्रक्रीया होती घेतली जाते. मीटर्स ही महसुलासाठी आवश्यक बाब आहे. ग्राहकांनी उपभोगलेल्या विजेची अचूक नोंदणी करण्यासाठी आणि मीटर खराब होण्याचे टाळण्यासाठी दर्जेदार मीटर्सचा पुरवठा होणे जरुरीचे आहे. म्हणून तांत्रिक विनिर्देश वेळोवेळी अद्यावत केले जातात आणि नामवंत उत्पादकांकडून पात्रतेचे निकष पूर्ण करणारे, तांत्रिक विनिर्देश असणारे व निविदा

कागदपत्रातील दिलेल्या इतर अटी पूर्ण करणारे मीटर्स खरेदी केले जातात. त्यासाठी नमूना मिटरचे परीक्षण एन ए बी एल प्रयोगशाळेत करुन घेतले जाते. निविदांच्या अटी पूर्ण करणाऱ्या व ज्यांचे नमूना मीटर्स स्वतंत्र प्रयोगशाळेतील चाचण्यात उत्तीर्ण होतील अशा उत्पादकांचा फक्त विचार केला जातो. त्यामुळे दर्जेदार मीटर्स मिळण्याची हमी मिळते. जाहीर निविदा प्रसारीत करतांना तिला मोठ्या प्रमाणात प्रसिध्दी दिली जाते व नामवंत मीटर उत्पादकांकडून स्पर्धात्मक दराने देकार मागविले जातात. सर्वसाधारणपणे स्पर्धात्मक दरानेच दर्जेदार मीटर्स मिळावे यासाठी ज्यांचे किंमती सर्वात कमी स्वीकारार्ह देकाराच्या १ टक्क्याच्या मर्यादेत आहेत अशा इतर पाच बोलीदारांकडून समतूल्य (matching) दराच्या देकारानुसार दर्जेदार मिटर्स खरेदी करण्याची शक्यता अजमावली जाते. मात्र अपवादात्मक परिस्थितीत अन्य कोणताही पर्याय नसला तर कंपनीला इतर उपलब्ध स्त्रोतांकडून व त्या किंमतीनुसार मीटर्स मिळवावीच लागतात.

२.३ शासनाने वितरण कंपनीच्या उत्तराशी सहमती दर्शविली आहे.

२.४ महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीने १० लाख लघु दाब एन्कोडर असलेले ५ लाख एनकोडर नसलेले स्टॉटिक मीटर्स खरेदी करण्याकरिता ऑक्टोबर, २००७ मध्ये निविदा मागविलेल्या होत्या. निविदेमध्ये प्राप्त झालेला दर न स्विकारल्यामुळे जास्त दराने नंतर खरेदी करावी लागली. या अतिरिक्त झालेला खर्च टाळता येण्यासारखा होता असा आक्षेप महालेखाकारांनी नोंदविला होता. यासंबंधाने प्राप्त झालेल्या विज वितरण कंपनीच्या लेखी माहितीच्या अनुषंगाने विभागाचे सचिव व महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक व इतर अधिकारी यांची मंगळवार, दिनांक २९ जानेवारी, २०१३ रोजी साक्ष घेण्यात आली. महालेखाकारांच्या आक्षेपासंबंधाने अधिक स्पष्टीकरण करण्यासंबंधी समितीने सांगितले असता, कंपनीचे संचालक (वित्त) यांनी सांगितले की, मीटर खरेदी करण्यासाठी निविदा काढण्यात आल्या होत्या. यासंबंधात एचपीएलएस या कंपनीची निविदा कमी दराची असल्यामुळे सदर कंपनीला १० लाख विजेच्या मीटर्सची ऑर्डर देण्यात आली होती. परंतु, सदर बोलीधारकांकडून ४ महिन्यात फक्त ४ लाख ३० हजार मीटर्सचा पुरवठा करण्याची क्षमता होती. सदर कंपनीच्या कमी दराच्या निविदेमुळे कंपनीने बॉक्ससह विजेच्या मीटरचा दर ७६५ रुपये दर्शविला होता. त्यावर २ टक्के सवलत देण्यास सदर बोलीधारक कंपनी तयार होती. त्यामुळे त्या कंपनीला मीटर बॉक्ससह रुपये ७४९.७०/- या दराने १० लाख मीटर पुरविण्याची ऑर्डर देण्यात आली. परंतु, त्यांनी त्यांच्या क्षमतेनुसार ४ लाख ३० हजार मीटर्सचा पुरवठा केला. यासंबंधीचा देकार सन २००७ मध्ये देण्यात आला होता, असे स्पष्ट केले. समितीने अधिक उपस्थित केलेल्या मुद्यांबाबत माहिती देतांना, संचालक (वित्त) यांनी सांगितले की, ऑर्डर दिलेल्या कंपनीकडे ५ लाख मीटर्सची ऑर्डर प्रलंबित होती. त्यामुळे पुन्हा सन

२००८ मध्ये मीटर पुरविण्याच्या निविदा काढण्यात आल्या. त्यावेळी देखील एचपीएलएस कंपनी कमी दराची निविदा दिल्यामुळे सदर कंपनीला पुन्हा मीटर बॉक्ससह १० लाख विजेचे मीटर पुरवठा करण्याची ऑर्डर देण्यात आली होती. त्यावेळी देखील रुपये ७४९.७०/- प्रती मीटर असे कंपनीने दर नमूद केले होते व मीटर बॉक्स नसलेल्या मीटरची किंमत रुपये ६३०/- प्रती मीटर इतकी नमूद करण्यात आली होती. त्या कंपनीने पुन्हा क्षमतेनुसार ५ लाख ७५ हजार विजेच्या मीटरचा पुरवठा केला. सन २००७ मध्ये देण्यांत आलेल्या ऑर्डरची वेळेत पुर्तता न केल्यामुळे कंपनीकडून आठवड्याला २ टक्के दंडाप्रमाणे ८९ लाख रुपये दंडाची रक्कम वसूल केली. सन २००८ मध्ये सदर कंपनीने एमआरपीवर २ टक्के सूट दिली नाही. तरीदेखील सदर कंपनीच्या मीटरचा दर रुपये ६७१.०५/- असा होता असे स्पष्ट केले. सन २००७ मध्ये ऑर्डरप्रमाणे पुरवठा न केलेल्या प्रलंबित मीटरची बोलीधारकांकडून पूर्तता करण्यात आली आहे काय? असे समितीने विचारले असता, संचालक, महावितरण यांनी सांगितले की, मीटर तयार करणाऱ्या कंपन्यांची क्षमता साधारणत: एका वर्षामध्ये ८० लाख मीटर्स इतकी आहे. मागणीनुसार ते पुरवठा न करता उपलब्ध असलेल्या मीटर्सचाच ते पुरवठा करतात. काही कंपन्यांमध्ये याबाबत ८ ते ९ महिन्यांचा कालावधी घेतला जातो. त्यामुळे कोणतीही मीटर तयार करणारी कंपनी मागणी इतके मीटर्स पुरवित नाही, असे स्पष्ट केले. याबाबत समितीने असे विचारले की, किती मीटर्सचा पुरवठा बोलीधारकांकडून होऊ शकतो हे निविदा तयार करीत असतांनाच विचारात घ्यावयास पाहिजे होते. मीटरची किंमत ही बाजारात उपलब्ध होणाऱ्या मीटरच्या किंमतीच्या प्रमाणात ठरविणे आवश्यक होते. यामध्ये निविदेनुसार पुरवठा न केल्यामुळे सन २००७ मध्ये करण्यांत आलेली दंडात्मक कारवाई सन २००८ मध्ये सदर निविदाकाराला ऑर्डर देऊनही पुरवठा न केल्यामुळे तीच कारवाई का करण्यात आली नाही? असे विचारले असता, संचालक, महावितरण यांनी सांगितले की, अन्य राज्यातील विज मंडळांनी विकत घेतलेल्या किंमतीपेक्षा कमी दराने मीटर्स खरेदी केलेले आहेत, ही वस्तुस्थिती आहे हे स्पष्ट केले. या मुद्यांबाबत अधिक स्पष्टीकरण करतांना विभागाच्या सचिवांनी सांगितले की, महालेखाकार यांनी उपस्थित केलेला मुद्या बरोबर असून त्यांनी कमीत कमी दराने मीटर्सचे खरेदी करणे आवश्यक होते असे म्हटले आहे. वितरण कंपनीकडून दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकाच्या कमी दराच्या निविदाकाराला प्रथम क्रमांकाच्या निविदाकाराने निविदेत नमूद केलेल्या दरानुसार मीटर्सचा पुरवठा करावा अशा प्रकारे मंडळाने निर्णय घेऊन खरेदीच्या प्रक्रियेत दुरुस्ती केली आहे. याबाबत नियोजनाच्या दृष्टीने उपस्थित केलेल्या मुद्यांच्याबाबत असे स्पष्ट करण्यात येते की, राज्यामध्ये वर्षाला साधारणत: १३ लाख नवीन कनेक्शन दिली जातात. विजेची जोडणी मागण्यासाठी मागणी करणाऱ्यांवर बंधने घालता येत नाहीत. पुरवठा करणाऱ्या कंपन्या मीटर्स पुरवठ्याची ऑर्डर

घेतात परंतु, अन्य राज्यांतून जादा किंमत मिळाल्यास बोलीधारक दिवाळखोरीत गेल्याचे दाखवून मीटरचा पुरवठा अन्य राज्यांकडे वळवितात. ही वस्तुस्थिती आहे. नियोजन करुन त्यानुसार आखणी करता येणे शक्य आहे. परंतु, मीटर्सचा पुरवठाच झाला नाही तर विजेची जोडणी देता येणे शक्य नाही. महालेखाकारांनी अधिक दराने मीटर खरेदी करण्यात आल्यामुळे आर्थिक नुकसान झाल्याचे विशद केले आहे. ही वस्तुस्थिती जरी बरोबर असली तरी विजेची जोडणी व मीटर्सचा पुरवठा यांचे प्रमाण कधीही व्यस्त रुपात नसते. त्यामुळे महालेखाकारांचा मुद्दा मान्य करावयाचा म्हटल्यास विजेच्या जोडणीचे प्रमाण समतोल राखता येणार नाही. मीटर सप्लाय करणाऱ्या कंपनीला विलंबामुळे प्रत्येक वर्षासाठी अर्धा टक्का या प्रमाणे २८ लाख ६७ हजार रुपये दंड लावला आहे असे त्यांनी स्पष्ट केले.

२.५ अभिप्राय व शिफारशी :-

महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीने १० लाख लघु दाब एन्कोडर असलेलेच रु. ५ लाख एनकोडर नसलेले स्टॉटिक मीटर्स खरेदी करण्याकरिता ऑक्टोबर, २००७ मध्ये निविदा मागविलेल्या होत्या. निविदेमध्ये प्राप्त झालेला दर न स्विकारल्यामुळे जास्त दराने नंतर खरेदी करावी लागली. या अतिरिक्त झालेला खर्च टाळता येण्यासारखा होता असा आक्षेप महालेखाकारांनी नोंदविला होता. महालेखाकारांच्या आक्षेपासंबंधाने समितीसमोर प्राप्त झालेल्या माहितीवरुन असे दिसून येते की, मीटर बनविणाऱ्या कंपनीला सन २००७ मध्ये १० लाख मीटर्स पुरवठा करण्यासाठी कमी दराची निविदा असल्यामुळे ऑर्डर देण्यात आली होती. परंतु, उत्पन्नाच्या क्षमतेनुसार जवळ जवळ निम्म्याच मीटर्सचा त्यांनी पुरवठा केला. निविदेनुसार मागणी नोंदविलेल्या पुरवठा करावयाच्या मीटर्सचा पुरवठा विहित वेळेत न केल्यामुळे सदर कंपनीकडून दंडात्मक रक्कम वसुल केली गेली. परंतु, सन २००८ मध्ये मागणी केलेल्या मीटर्सच्या पुरवठ्याबाबत त्याच पुरवठादार कंपनीने पुन्हा मीटर्सचा पुरवठा विहित कालावधीत न केल्यामुळे पुरवठादार कंपनीवर दंडात्मक कारवाई केल्याचे समितीला दिसून आले नाही. पुरवठा करणाऱ्या कंपनीची उत्पादनाची क्षमता निविदा सादर केल्यानंतर पाहणे गरजेचे होते व मीटर्सची किंमत देखील त्याचवेळी पडताळणे आवश्यक होते असे समितीचे मत आहे. एकंदरीत महाराष्ट्रामध्ये साधारणत: विद्युत जोडणीकरीता लागणाऱ्या मीटर्सची आकडेवारी व त्याचे नियोजन करणेही तितकेच आवश्यक होते. जेणेकरुन ग्राहकाला विहित वेळेत व विनाविलंब मीटर्स घेऊन विद्युत जोडणी मिळविता येईल. महालेखाकारांनी उपस्थित केलेला मुद्या बरोबर असल्याचे प्रतिपादन करुन विभागीय सचिवांनी मीटर्स पुरवठ्याबाबत मीटर पुरवठा करणाऱ्या पुरवठादारांची असलेली मानसिकता समितीला विशद केली होती. त्यावरुन असे दिसून येते की, पुरवठादार अन्य राज्यांतून मीटर्सकरिता जास्त दर मिळत असल्यास पुरवठ्यामध्ये बदल घडवून आणत असतात. याकरिता निविदाकाराला निविदा सादर केल्यानंतर व ती स्विकारल्यानंतर त्यामध्ये विहित कालावधीत पुरवठा न केल्यास आकारावयाच्या दंडात्मक तरतुदीमध्ये वाढ करण्याच्या दृष्टीने विचार करणे गरजेचे आहे. तसेच अशा पुरवठादाराला पुन्हा पुरवठा करण्यासाठी निविदा मागविल्यानंतर निविदा सादर केली असली तरी त्याचा मागील कामाचा अनुभव बघता त्यांना पुन्हा काम देण्याबाबत विचार करण्यात येऊ नये, असे समितीचे मत आहे. **यासाठी समिती अशी शिफारस करीत आहे की, महालेखाकारांनी उपस्थित केलेल्या मुद्यानुसार टाळता येण्याजोगा खर्च टाळणे वितरण कंपनीला सहज शक्य होते. यासाठी भविष्यामध्ये मीटर्स खरेदीच्या दृष्टीकोनातून मागील अनुभव पाहून कार्यपध्दतीमध्ये व त्या दृष्टीने करावयाच्या निविदेच्या स्वरुपामध्ये आमुलाग्र बदल करण्यांत यावा. जेणेकरुन एकदा खरेदीचा व्यवहार ठरल्यानंतर त्यामध्ये पुरवठादाराला**

बदल घडविणे सहज शक्य होणार नाही. याबाबत करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्याच्या आत देण्यात यावी.

तीन : वायफळ खर्च :-

३.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००८-२००९ च्या (वाणिज्यिक) अहवालातील प्रकरण क्रमांक चार मधील परिच्छेद क्रमांक ४.९ मध्ये **वायफळ खर्च** यांचे संबंधात महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले आहेत की, **जागा भाडेकराराने घेतांना किमान भाडे कालावधी संबंधात अवाजवी अट स्विकारल्यामुळे भाड्यापोटी रुपये १.२९ कोटीचा खर्च वायफळ ठरला.**

स्वयंचलित मीटर वाचन प्रणाली (ऑटोमॅटिक मीटर रीडिंग सिस्टीम एएमआर) चा पुरवठा, उभारणी सुरु करणे, संचालन व देखरेखीकरीता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने (कंपनी) पुणे येथील निकामाची इन्स्ट्रुमेंटस (ठेकेदार) ला इरादा पत्र (लेटर ऑफ इंटेट) जारी केले (जानेवारी २००६) इरादापत्रातील तरतुदीनुसार उपकरणे बसविण्यासाठी उभारण्यात येणाऱ्या नियंत्रण कक्षासाठी लागणारी सुयोग्य जागा पुरविण्याची जबाबदारी कंपनीवर होती.

जरी एएमआर प्रणालीच्या कंत्राटास अंतिम रुप द्यावयाचे बाकी होते तरी सुध्दा कंपनीने साई ईरेक्टर्स पुणे यांच्याकडून ८७०० चौ.फुट जागा मासिक रुपये ५.८० लाख भाड्याने (पार्किंग मेंटेनन्स सहित) घेतली. (ऑगस्ट-२००६) लिव लायसन्स ॲग्रीमेंट (एलएलए) सात वर्ष मुदतीकरता असून त्यात तीन वर्षाचा "किमान भाडे कालावधी" नमूद करण्यात आला होता. सदरहू करारामध्ये भाड्याने घेतलेल्या जागेचा फक्त एएमआरच्या प्रयोजनाकरिताच वापर करण्याचे बंधन घालणाऱ्या कलमांचा समावेश होता. ऑगस्ट २००६ मध्ये कंपनीने सुरक्षा ठेव म्हणून रुपये ५७.४२ लाख दिले.

लेखापरीक्षणात (जून-२००८) असे निदर्शनास आले की, एएमआर प्रणाली कंत्राटाचे अंतिमकरण न झाल्याने (नॉन फायनालायझेशन ऑफ कॉन्ट्रक्ट) भाड्याने घेतलेली जागा रिकामी पडून राहिली. कंपनीने जागा परत करण्याचे ठरविले (मे-२००७) वा साई ईरेक्टर्स ना जागा परत घेण्याची विनंती केली. परंतु साई ईरेक्टर्स करारातील किमान भाडे कालावधी संबंधीची अट निदर्शनास आणून सुरक्षा ठेव परत करण्यास तसेच जागा परत ताब्यात घेण्यास नकार दिला.

कंपनीने साई ईरेक्टर्स यांचे विरुध्द दिवाणी दावा दाखल केला (जानेवारी २००८) परंतु कायदेशीर सल्ल्याच्या आधारे ज्यानुसार कंपनीला करारातील तरतुदीनुसार अद्याप न संपलेल्या "किमान भाडे कालावधी" करिता भाडे भरावे लागणार होते. कंपनीने जागा मालकाशी कोर्टाबाहेर तडजोड

(आऊट ऑफ कोर्ट सेटलमेंट) (मार्च २००८) केली व ऑगस्ट २००६ ते जून २००८ या कालावधीकरिता जागा जरी रिकामी पडून राहिली होती तरी रुपये १.२९ कोटीचे भाडे दिले होते.

अशा प्रकारे किमान भाडे कालावधी, जागेचा एएमआर प्रणाली सारख्या विशिष्ट हेतूकरिताच करणे यासारख्या प्रतिबंधात्मक अटीवर जागा भाड्याने घेऊन ती विनावापर पडून राहिल्यामुळे रुपये १.२९ कोटीचा वायफळ खर्च झाला.

व्यवस्थापनाने उत्तरात (मे २००९) ज्याला सरकारने पण दुजोरा दिला (जुलै २००९) ऑगस्ट २००६ ते जून २००८ या कालावधीकरिता भाडे दिल्याचे मान्य केले व लेखापरीक्षण निरीक्षणाचा स्विकार केला. पुढे असे पण सांगितले की संघटनेच्या आर्थिक हितसंबंधाचे संरक्षण करण्यासाठी या पुढे करारात समाविष्ट केल्या जाणाऱ्या अटी / शर्ती मान्य करताना जास्तीत जास्त काळजी घेतली जाईल.

शिफारस करण्यात येते की, कंपनीने दक्ष राहावयास हवे व तिच्या हितसंबंधांना घातक ठरणाऱ्या अव्यवहार्य अटी करारांत स्विकारु नयेत.

३.२ याप्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करतांना असे नमूद केले आहे की,

निकामाची कन्सॉटीयम यांना इरादा पत्र जानेवारी २००६ मध्ये देण्यात आले. कंत्राटाच्या व्यवस्थेनुसार खालील जबाबदाऱ्या महावितरणकडे सोपविल्या होत्या.

१) पुणे येथे एकमेकांच्या संमतीने ठरविलेल्या जागेवर नियंत्रण केंद्र स्थापन करण्यासाठी महावितरण योग्य परीसर तयार करील.

२) नियंत्रण केंद्राचा आवश्यक असणारे सर्व हार्डवेअर म्हणजे सरवर (Server) पी.सी.रुटर्स, विविध ठिकाणी वीज पुरवठा, डेटा बॅकअप डिव्हायसेस इ. आणि या हार्डवेअरला लागणारे सॉफ्टवेअर हे महावितरण कंपनी मिळवेल व त्यासाठी जबाबदार राहील.

३) महावितरण कंपनी केवळ याच प्रकल्पासाठी असलेला एकशेवीस (१२०) अभियंताचा संघ (Team) संपूर्ण महाराष्ट्रात तयार करील.

हा समग्र प्रकल्प १२ महिन्यात पूर्ण करण्याचा प्रस्ताव होता. नियंत्रण केंद्रात आवश्यक असणारे सर्व हार्डवेअर व सॉफ्टवेअर प्रकल्प सुरु होण्याच्या तारखेपासून म्हणजे महावितरण सोबत करारावर सह्या केल्याच्या दिवसापासून ४० दिवसाच्या आत स्थापित करावयाचे होते.

प्रकल्पाची वेळेवर अंमलबजावणी व्हावी यासाठी असे ठरविण्यात आले की पहिल्या टप्प्यातील वेगवेगळी कामे म्हणजेच कंत्राट कराराचे अंतिमीकरण, नियंत्रण केंद्राची स्थापना, वित्तीय करारासाठी म.वि.नियामक आयोगाची (MERC) परवानगी ही सर्व एकाच वेळी करण्यात यावी.

प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी खालील पावले उचलण्यात आली :

१) आयोगाकडे गुंतवणूक प्रस्ताव मंजूरीसाठी फेब्रुवारी २००६ मध्ये सादर करण्यात आला. त्याला मंजूरी फेब्रुवारी २००७ मध्ये मिळाली.

२) पी.एफ.सी.कडे कर्ज सहाय्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात आला.

३) मीटर उत्पादकांना विनंती करण्यात आली की त्यांनी मीटरचा प्रोटोकॉल सादर करावा.

४) जागा पुरविण्यासाठी साई इरेक्टर यांच्याशी "संमती व परवानगी" करार (leave & License) दि. २३.०८.२००६ रोजी करण्यात आला. कारण कराराचे अंतिमीकरण प्रगतीपथावर होते व त्याचे अंतिमीकरण झाल्यानंतर लगेच एएमआरची कार्यवाही सुरु करावयाची होती.

कराराचे अंतिमीकरण करण्यासाठी खालीलप्रमाणे कार्ये करण्यात आली.

महिना	**कार्ये**	**मे.निकामाची आणि महावितरण कं.मर्या. याचा प्रतिसाद**
मे २००६	मे.निकामाची यांनी कराराचा मसुदा आणि संगणकाचे हार्डवेअर विनिर्देश सादर करावे यासाठी त्यांना विनंती करणारे पत्र दिले.	निकामाची यांनी कराराचा मसूदा व हार्डवेअरचे विनिर्देश सादर केले नाहीत आणि इरादापत्रानुसार कामाच्या व्याप्तीचा तपशील मागितला.
ऑगस्ट २००६	१) मे.निकामाची यांना कामाची व्याप्ती देण्यात आली. २) मे.निकामाची यांनी कराराचा मसूदा सादर केला.	१) ती निकामाची यांनी स्विकारली. २) कराराचा मसूदा महावितरण कंपनीने स्विकारला नाही. कारण निकामाची यांनी निविदा कागदपत्रातील अटी व शर्ती बदलल्या होत्या.
सप्टेंबर, नोव्हेंबर २००६	१) प्रकल्पाची गती वाढवावी म्हणून महावितरण कंपनीने कंत्राट कराराचा सुधारीत मसुदा सादर केला. त्यात निविदा कागदपत्र व इरादापत्रे यातील अटी आणि शर्ती समाविष्ट केल्या. २) कंत्राट कराराचे अंतिमीकरण करण्यासाठी निकामाची यांचे समवेत	१) निकामाची यांनी काही अटी व शर्ती नामंजूर केल्या त्या अशा : अ) मे.इट्रॉन, इनकॉ, युएसए यांच्या सोबत करार करणे. ब) पैसे देण्याची मुदत क) निर्धारित नुकसान भरपाई. ड) सोर्स कोड इ) आयात शुल्क एफ) हमी आणि खात्री जी) विमा व दंड एच) मीटर प्रोटोकोल २) सदर कराराचे अंतिमीकरण झाले नाही.

	बऱ्याच वेळा बैठका घेण्यात आल्या. तसेच कराराच्या अंतिमीकरणासाठी निकामाची यांच्याशी पत्रव्यवहारही करण्यात आला.	

महावितरणने मे.इट्रॉन यांना दिनांक ०६.०२.२००७ रोजी पत्र पाठवून मे. इट्रॉन इनकार्पो. युएसए यांच्या सोबत करावयाच्या करारासह अन्य काही विषयांवर स्पष्टीकरण मागविले कारण कराराच्या अटी व शर्तीचे अंतिमीकरण करण्याचे कामी पुढे कार्यवाही करणे हा हेतु त्यामागे होता. याला मे. इट्रॉन यांनी त्यांचे पत्र दि. १२.०२.२००७ यात हे प्रकरण स्वीकारण्याचा इन्कार केला. मे.इट्रॉन यांनी त्यांचे पत्र दि. ३०.०३.२००७ च्या पत्रात महावितरणची बाजू स्वीकारण्याचा इन्कार केला ते अव्यवहार्य व एकतर्फी असल्याचे सांगितले आणि एका कराराचा मसूदा अग्रेषित केला. त्यानंतर दि. ४ मे २००७ रोजी मे.इट्रॉन, इनकॉ. युएसए यांनी पत्राद्वारे मे.इट्रॉन आणि महावितरण यांच्याशी कंत्राट करार करण्यास स्वीकृती दिली आणि आजपावेतो कराराचे अंतिमीकरण करण्याची प्रक्रिया चालू आहे.

साई इरेक्टर्सची जागा रिकामी करण्यासाठी केलेली कामे वर नमूद केलेल्या परिस्थिती आणि ज्यावर आमचे नियंत्रण नाही अशा कारणामुळे म्हणजेच तांत्रिक भागीदाराने अटींना अंतिमरित्या संमती न देणे यामुळे एएमआर प्रकल्प आजपावेतो सुरु होऊ शकला नाही. यासाठी घेतलेली जागा परवानगीवर असली तरी रिकामी होती. या जागेत इतर विभागाचे स्थानांतरण करण्याची शक्यता अजमावण्यात आली. परंतु ते व्यवहार्य ठरणार नाही असे लक्षात आले. साई इरेक्टर्स यांनी सदर जागेत अन्य विभाग हलविण्यात किंवा एएमआर व्यतिरिक्त अन्य कोणत्याही हेतुसाठी जागेचा वापर करण्यास आक्षेप घेतला कारण परवाना हा फक्त एएमआर साठी लागु होता.

ज्या हेतुसाठी ही जागा साई इरेक्टर्सने परवान्याने दिली होती त्यासाठी ती वापरता न आल्यामुळे त्याचा हेतू असफल झाला म्हणून दि. २४.०५.२००७ रोजी सदर जागा परत करावी व सुरक्षा अनामत परत मिळवावी असा निर्णय घेण्यात आला.

महावितरणने दि. २८.५.२००७ रोजी सदर जागा परत करणे व सुरक्षा अनामत परत मिळविणे यासाठी मे.साई इरेक्टर्स यांच्याशी संपर्क साधला परंतु मे. साई इरेक्टर्स यांनी कळविलेल्या करारानुसार जागेचा ३ वर्षासाठी लॉक इन मुदत आहे व त्यापूर्वी जागा परत केल्यास तो कराराचा भंग होईल. त्यांनी असेही कळविले की दुसरा नविन ग्राहक पाहण्याचा आमच्या विनंतीवर विचार करण्यात येईल व ते दुसरा ग्राहक शोधतील. त्या मुदतीपर्यंत सदर जागा महावितरणच्याच ताब्यात राहील.

याबाबत मे.साई इरेक्टर्स पुरेश्या वेळेत उचित कार्यवाही करुन हे प्रकरण सामंजस्याने मिटेल अशी अपेक्षा होती.

साई इरेक्टर्स यांनी नवीन ग्राहक शोधणे किंवा जागेचा ताबा योग्य वेळी घेणे यासाठी काहीही कार्य केलेले नाही साई इरेक्टर्सने ताबा घेऊन सुरक्षा अनामत रक्कम परत करावी यासाठी महावितरणने त्याचे मन बळविण्याचा वारंवार प्रयत्न केला. जेव्हा हे प्रकरण सामंजस्याने मिटत नाही असे लक्षात आल्यावर दि. ३.९.२००७ रोजी महावितरणने निर्णय घेतला व या जागेचा परवाना रद्द करण्यासाठी कायदेशीर नोटीस दि. ६.९.२००७ रोजी पाठवली ती साई इरेक्टर्सवर १३.९.२००७ रोजी बजावण्यात आली.

साई इरेक्टर्सने यापूर्वी दिलेल्या अन्य ग्राहक शोधण्याच्या निवेदनाला प्रतिसाद न देता आपल्या नोटीसला उत्तर दि. १८.९.२००७ रोजी दिले व ३ वर्षाच्या लॉक इन मुदतीचा उल्लेख करुन सुरक्षा रक्कम परत करण्यास नकार दिला. महावितरणने दि. ६.१२.२००७ रोजी आणखी एक नोटीस पाठविली त्याला त्यांनी १४.१.२००८ रोजी काही सबब सांगून उत्तर दिले. अशा परिस्थितीत दिवाणी दावा दाखल करण्याचा निर्णय घेण्यात आला व दिवाणी दावा क्र. २२२ वर्ष २००८ चा दि. २४.१.२००८ रोजी दाखल करण्यात आला.

महावितरण हे प्रकरण सामंजस्याने सोडविण्यासाठी अजूनही प्रयत्न करीत होती. साई इरेक्टर्सने त्याचे पत्र दिनांक १८/३/२००८ यानुसार मा.व्यवस्थापकीय संचालक, महावितरण कं. यांना कळविले की त्यांनी यापूर्वीच जागा ताब्यात घेतली आहे. याबाबत हिशेब अंतिमरित्या पूर्ण करण्याची आणि संमती व परवाना करार ३ वर्षाच्या मुदतीपूर्वी संपुष्टात येत असल्यामुळे त्यांच्या मुक्तीच्या विलेखाची नोंदणीची विनंती केली.

महावितरणने न्यायालयाबाहेर समझोता करण्याची शक्यता अजमावण्याचा निर्णय घेतला आणि त्यासाठी संचालक (वित्त), संचालक (संचालन), मुख्य विधी सल्लागार आणि मुख्य अभियंता (पुणे परिमंडळ) यांचा समावेश असलेली एक समिती नेमून तिच्याकडे समझोत्याच्या अटींची शक्यता अजमावण्याचे काम दिले.

दि. २६.३.२००८ रोजी एच.एस.बी.सी.इमारत, मुंबई येथील कार्यालयात साई इरेक्टर्स यांचे प्रतिनिधी वरील उल्लेखित प्राधिकारी आणि अन्य अधिकारी यांची प्रत्यक्ष चर्चा झाली. प्रदिर्घ विचार विमर्श आणि परवाना करारातील लॉक इन पिरिएड या शब्दाचे विविध अर्थाविष्कार करण्याच्या शक्यता लक्षात घेतल्यानंतर मे.साई इरेक्टर्सच्या प्रतिनिधींनी पुढील मर्यादांत संमती होईल असे सांगितले ते असे:

१) महावितरणने जून-२००८ पर्यंतचे परवाना शुल्क द्यावे.

२) साई इरेक्टर्सने लगेच चावी घेऊन जागा आपल्या कब्ज्यात द्यावी.

३) साई इरेक्टर्स महावितरणला सुरक्षा अनामत रकमेचा चेक देतील.

४) कंपनीने ऑगस्ट-२००७ ते जून-२००८ अखेरपर्यंतचा न भरलेल्या परवाना शुल्काच्या रकमेचा चेक द्यावा.

५) साई इरेक्टर्स यांची इच्छा असल्यास त्यांनी मुक्तता विलेखाची नोंदणी स्वखर्चाने करावी.

६) जर साई इरेक्टर्स यांना जून-२००८ पूर्ण नवीन ग्राहक मिळाल्यास ते परवाना शुल्क इ. चा दावा करणार नाहीत.

महाअधिवक्ता महाराष्ट्र राज्य यांचे मत : लॉक इन पिरिएड या शब्दाचे लावले जाऊ शकणारे विविध अर्थ विचारात घेऊन व मुख्य विधी सल्लागार यांच्या सूचनेनुसार सदर विषय श्री.आर.एम.कदम महाअधिवक्ता महाराष्ट्र राज्य यांनी सर्व वस्तुस्थिती, परिस्थिती व भाडेपट्टीच्या करारातील अटी यांचा सर्वकष विचार करुन त्यांचे मत दिले.

श्री.आर.एम.कदम महाअधिवक्ता, महाराष्ट्र राज्य यांचे मतावरुन स्पष्ट होते की, जरी परवाना करार हा कायदेशीररित्या ३ वर्षाच्या मुदतीपूर्वी रद्द करता येत असला तरी या ३ वर्षाच्या राहिलेल्या काळासाठी नुकसानीची भरपाई द्यावे लागण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सन्माननीय अधिवक्ता यांचे मतानुसार जर साई इरेक्टर्स यांना अन्य भोगवटादार किंवा अनुज्ञाप्तीधारक मिळाला तर महावितरणला अनुज्ञाप्ती फरकाच्या मर्यादेपर्यंत नुकसान भरपाई द्यावी लागेल. याचाच अर्थ असासुध्दा होतो की, जर साई इरेक्टर्स यांना दुसरा भोगवटादार किंवा अनुज्ञाप्तीधारक न मिळाल्यास जरी परवाना लॉक इन पिरिएडच्या पूर्वी खंडीत केला असला तरी, महावितरणला एकूण ३ वर्षाच्या मुदतीसाठी परवाना शुल्क भरावेच लागेल. वरील वस्तुस्थिती व परिस्थितीनुसार या प्रकरणाच्या निकालाविषयी अनिश्चितता दिसून आली व नुकसानभरपाई किंवा अनुज्ञाप्ती शुल्क न संपलेल्या लॉक इन पिरिएडसाठी भरावे लागण्याची शक्यता होती. म्हणून मे.साई इरेक्टर्स व महावितरण यांच्या प्रतिनिधीत परस्पर संमत झालेल्या तोडग्याच्या मंजूरीसाठी सदर विषय संचालक मंडळाकडे नेण्यात आला.

दि. ८ मे २००८ रोजी झालेल्या मंडळाच्या बैठकीस संचालक मंडळाने पुणे येथील दिवाणी न्यायालय वरीष्ठ विभाग येथे प्रलंबित असलेला दिवाणी दावा क्र. २२२ वर्ष २००८ चा हा मागे घेण्याचा निर्णय घेतला. या दाव्यातील दोन्ही पक्ष म्हणजे महावितरण विरुध्द मे.साई इरेक्टर्स यांनी वरील दावा संपविण्यास परस्पर संमती दिली.

दि. २ जून, २००८ रोजी संचालक (वित्त), महावितरण आणि मे. साई इरेक्टर्स यांच्यात साई कॅपीटल, पुणे येथील भाड्याच्या जागेच्या किल्ल्या व ताबा देण्याबाबत एक सामंजस्याचा करार झाला. आणि दि. २४.६.२००८ रोजी मे.साई इरेक्टर्स विरुध्द दाखल केलेला दावा काढून टाकण्यात आला.

मात्र महावितरण व मे.निकामाची यांच्यात अटी व शर्ती याबाबत काही असहमती आहे. त्यामुळे कराराचे अद्याप अंतिमीकरण झालेले नाही.

वरील परिस्थितीमुळे महावितरणला ऑगस्ट-२००६ ते जून-२००८ या काळाचे भाडे भरावे लागले.

लेखापरीक्षणाच्या परिच्छेदात शिफारस केल्याप्रमाणे कंपनी कंत्राटाचे विनिर्देश स्वीकारताना संघटनेच्या वित्तीय हिताचे रक्षण करण्यासाठी सर्वोतोपरी खबरदारी घेईल.

३.३ शासनाने महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीने नोंदविलेल्या उत्तराशी सहमती दर्शविली आहे.

३.४ स्वयंचलित मिटर वाचन प्रणाली पुरवठा, उभारणी, सुरु करणे, संचालन व देखरेखीकरिता पुणे या ठिकाणी उपकरणे बसविण्यासाठी उभारण्यात येणाऱ्या नियंत्रण कक्षासाठी लागणारी सुयोग्य जागा पुरविण्याची जबाबदारी इरादा पत्र दिलेल्या कंत्राटदारावर सोपविली होती. या प्रणालीच्या कंत्राटाच्या करारास अंतिम रुप द्यावयाचे बाकी होते. तरीही इरादा पत्र धारक कंपनीने ८४०० चौ.फुट जागा रुपये ५.८० लाख भाड्याने ऑगस्ट-२००६ मध्ये सात वर्षाच्या मुदतीच्या असलेल्या या जागेसाठी ३ वर्षाचा किमान भाडे कालावधी नमूद करण्यात आला होता. ही जागा भाडे कराराने घेतांना किमान भाडे कालावधीसंबंधात अवाजवी अट स्विकारल्यामुळे त्यासंबंधीचा खर्च वायफळ खर्च ठरला होता असा महालेखाकारांनी आक्षेप नोंदविला होता. याबाबत अधिक स्पष्टीकरण करण्याविषयी समितीने सांगितले असता, संचालक (वित्त) यांनी सांगितले की, इरादा पत्रातील तरतुदीनुसार उपकरण बसविण्याकरिता नियंत्रण कक्षासाठी लागणारी जागा पुरविण्याची जबाबदारी कंत्राटदारावर होती. परंतु, या कंत्राटास अंतिम रुप देण्यापूर्वी या कक्षासाठी लागणाऱ्या इमारतीचे भाडे सुरु झाले. यासाठी मे.साई इरेक्टर्स या कंपनीला ८७०० चौ.फुट इतक्या जागेसाठी दरमहा ५ लाख ८० हजार रुपये भाडे देण्याचा करार होता. सदर कराराची मुदत ७ वर्षाची होती. त्यामध्ये तीन वर्षाचा किमान भाडे कालावधीच्या मुदतीची तरतूद होती. परंतु, या संबंधीच्या करारास अंतिम रुप न झाल्यामुळे भाड्याने घेतलेली जागा विनावापर पडून होती. त्यामुळे सदर जागा परत देण्याचा निर्णय घेतला गेला. त्यानुसार जागाधारककास तसे कळविले होते. परंतु, जागाधारकाने जागा परत केल्यास कराराचा भंग होईल असे कळविले. त्यावर विज वितरण कंपनीने विधी विभागाचे मत घेतले. विधी विभागाने जागाधारकक कंपनीच्या बाजूने निकाल लागण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचा अभिप्राय दिल्यामुळे कंपनीला भाडे देण्यात यावे असे मत दिले. त्यानंतर जागाधारक व विज वितरण कंपनी यांच्यामध्ये तडजोड करण्यात आली. परंतु, ऑगस्ट-२००६

ते जून-२००८ या कालावधीतील सदर जागेच्या भाड्यापोटी कंपनीला १ कोटी २९ लाख रुपये द्यावे लागले ही वस्तुस्थिती आहे, असे विशद केले. स्वयंचलित मीटर वाचन प्रणालीच्या निविदेस अंतिम रुप झाले नसतांना व त्यातील करारास अंतिम स्वरुप दिलेले नसतांना इमारत भाड्याने का घेतली गेली? या समितीने विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देतांना, संचालक (वित्त) यांनी सांगितले की, विज वितरण कंपनी व स्वयंचलित मीटर वाचन प्रणाली बसविण्यासाठी जबाबदारी दिलेल्या निकामाची इंन्स्ट्रुमेंट या कंपनीसोबत अटी व शर्ती अंतिम झाल्या नव्हत्या. या मुद्याला अधिक स्पष्टीकरण देतांना संचालक, महावितरण यांनी सांगितले की, कराराला अंतिम स्वरुप देणे व त्यामधील अटी व शर्ती याबाबत पक्षकाराबरोबर बोलणी सुरु होती. परंतु, या कामातील निविदेला अंतिम स्वरुप प्राप्त झाले नाही. महालेखाकारांच्या आक्षेपासंबंधाने अधिक स्पष्टीकरण देतांना, विभागीय सचिवांनी सांगितले की, यासंबंधी निविदेला अंतिम स्वरुप देतांना त्यामध्ये सदर प्रकल्पाचे काम १२ महिन्याच्या आत पुर्ण करावयाचे होते, अशा प्रकारची अट होती. करार केल्यापासून ४० दिवसांच्या आत अत्यावश्यक साधन सामुग्री महावितरण कंपनीला उपलब्ध करुन द्यावयाची होती. ह्याबाबत एलओआय दिल्यानंतर वितरण कंपनीला इमारत घेणे, त्यासाठी सामान घेणे, इ. साठी वेळ लागणार होता. एलओआय दिल्यापासून करारावर स्वाक्षरी होईपर्यतच्या काळात इमारत घेतली होती. त्यामध्ये मतभिन्नता निर्माण झाली होती. त्यामुळे सदर काम ४० दिवसांत पूर्ण झाले नाही तर त्याबाबत विचारणा होईल म्हणून या संबंधित अधिकाऱ्यांनी ह्यामध्ये जोखीम घेऊन कर्तव्य केले व त्यामुळे या संबंधिताचा अंदाज चुकलेला आहे असे त्यांनी स्पष्ट केले. यावर समितीने असे निदर्शनास आणले की, या घडलेल्या चुकीच्या संदर्भाने सदर इमारतीचे जवळ-जवळ १ वर्ष ६ महिन्याचे भाडे दिले गेले. इतक्या कालावधीत फक्त तडजोडीच करीत होता काय? ही बाब समितीला आश्चर्यकारक वाटत असून वाणिज्यिक प्रथेने कंपनीचे नुकसान टाळण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने निर्णय घेणे आवश्यक होते, असे समितीचे मत आहे.

१.५ अभिप्राय व शिफारशी :-

स्वयंचलित मिटर वाचन प्रणाली पुरवठा, उभारणी, सुरु करणे, संचालन व देखरेखीकरिता पुणे या ठिकाणी उपकरणे बसविण्यासाठी उभारण्यात येणाऱ्या नियंत्रण कक्षासाठी लागणारी सुयोग्य जागा पुरविण्याची जबाबदारी इरादा पत्र दिलेल्या कंत्राटदारावर सोपविली होती. या प्रणालीच्या कंत्राटाच्या करारास अंतिम रुप द्यावयाचे बाकी होते. तरीही इरादा पत्र धारक कंपनीने ८४०० चौ.फुट जागा रुपये ५.८० लाख भाड्याने ऑगस्ट-२००६ मध्ये सात वर्षाच्या मुदतीच्या असलेल्या या जागेसाठी ३ वर्षाचा "किमान भाडे कालावधी" नमूद करण्यात आला होता. ही जागा भाडे कराराने घेतांना किमान भाडे कालावधीसंबंधात अवाजवी अट स्विकारल्यामुळे त्यासंबंधीचा खर्च वायफळ खर्च ठरला होता असा

महालेखाकारांनी आक्षेप नोंदविला होता. साक्षीच्यावेळी समितीसमोर प्राप्त झालेल्या माहितीनुसार असे दिसून येते की, स्वयंचलित मीटर वाचन प्रणाली बसविण्यासाठी त्यासंबंधीचे असलेल्या करारास अंतिम स्वरुप प्राप्त होण्यापूर्वीच सदर इमारतीसाठी लागणारी जागा भाडेतत्वावर ७ वर्षाच्या कालावधीसाठी घेतली गेली व त्यामध्ये ३ वर्षाच्या कालावधीसाठी "किमान भाडे कालावधीची" तरतूद करण्यांत आली होती. यासंबंधीच्या अटी व शर्तीमध्ये बोलीदारासोबत अंतिम स्वरुप न झाल्यामुळे कराराला देखील अंतिम स्वरुप प्राप्त झाले नाही. त्यामुळे भाडे करारावर घेतलेली जागा रिकामी पडून राहीली. वितरण कंपनीने करारास अंतिम स्वरुप होत नसल्यामुळे जागा परत करण्याचे ठरविले. त्यामुळे जागाधारकाने किमान भाड्याची अट निदर्शनास आणून जागा परत घेण्यास नकार दिला. यामुळे कायदेशीर बाबी उत्पन्न

झाल्यामुळे विधी विभागाचे मत घेऊन त्यांनी दिलेल्या सल्यानुसार जागाधारककांस किमान भाडे अदा करावे लागेल व त्यामुळे **महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीचा या कामी वायफळ खर्च झाला हा महालेखाकारांनी घेतलेला आक्षेप योग्यच होता. यासाठी समिती अशी शिफारस करीत आहे की, कायदेशीर बाबी निर्माण झाल्यानंतर पुढील कार्यवाही स्पष्ट होत असतांनाही संबंधित अधिकाऱ्यांनी सुयोग्य वाणिज्यिक तत्त्वांचा उपयोग करुन कंपनीचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी तातडीने कार्यवाही करणे गरजेचे होते. त्यांनी विहित कालावधीत कार्यवाही केली असती तर कंपनीचे होणारे नुकसान निश्चितच कमी झाले असते. यासाठी संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करुन त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात यावी व त्यानुसार कंपनीचे झालेले आर्थिक नुकसान त्यांच्याकडून वसूल करण्यांत यावे. याप्रकरणी करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्याच्या आत कळविण्यात यावी.**

****

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

एक : निष्फळ खर्च :-

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या कामकाजासंबंधी त्यांच्या सन २००८-०९ या वर्षाच्या वाणिज्यिक अहवालातील प्रकरणे क्रमांक चार मधील परिच्छेद क्रमांक ४.११ मध्ये "निष्फळ खर्च" यांचे संबंधात महालेखाकारांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले आहेत.

१.१ इस्पात इंडस्ट्रीज लि.बरोबर औपचारिक करारनामा न केल्याने रु. ८.९९ कोटींचा खर्च निष्फळ ठरला.

वडखळ (जिल्हा रायगड) परिसरातील विद्युत ग्राहकांना खात्रीशीर विद्युत पुरवठ्याकरिता ४०० के.व्ही.नागोठणे उपकेंद्र ते २२० के.व्ही.वडखळ उपकेंद्रापर्यंत २२० के.व्ही. डबल सर्कीट लाईन टाकण्याचे काम महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित (कंपनी) ने केईसी इंटरनॅशनल लिमिटेडला रुपये ८.४९ कोटीस दिले. (फेब्रुवारी १९९६) परंतु रुपये ५७.०९ लाख खर्च झाल्यानंतर तीव्र प्रवेश समस्या (सिव्हीअर वे लिव प्रॉब्लेम) आणि जमीन मालकांकडून सुध्दा विरोध झाल्यामुळे हे काम अर्धवट सोडून द्यावे लागले. (जून १९९७)

इस्पात इंडस्ट्रीज लिमिटेड (आयआयएल) या महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी (एमएसईडीसीएल) च्या महत्त्वाच्या ग्राहकाने ज्याला विद्युत पुरवठा प्रणालीत होणाऱ्या सुधारणांमुळे भरपूर फायदा होणार होता. एमएसईडीसीएल बरोबर झालेल्या बैठकीत (मे २००४) स्वत:च्या खर्चाने प्रवेश समस्या सोडविण्यास तसेच न्यूनतम बोलीदाराने दिलेल्या अंदाजित खर्चापेक्षा जास्त खर्च करावा लागल्यास त्याची भरपाई करुन देण्यास मान्यता दिली. परंतु यासंदर्भात आयआयएल बरोबर कुठल्याही प्रकारचा औपचारिक करारनामा (फॉर्मल ॲग्रीमेंट) करण्यात आला नाही. आयआयएलने दिलेल्या तोंडी आश्वासनावर विसंबून अर्धवट सोडून दिलेले अंदाजे रुपये ५.५४ कोटी खर्चाचे काम अष्टविनायक कन्स्ट्रक्शन यांना रुपये ८.८० कोटीस देण्यात आले. (मे २००६) परंतु जमिनमालकांच्या विरोधामुळे मार्गात बदल करावा लागल्याने कामाचा खर्च रुपये १६.९८ कोटींवर जाऊन पोहोचला. कामाचा नियत कालावधी १५ महिने होता. कंत्राटदाराने रुपये ८.९९ कोटीचे काम केल्यानंतर प्रवेश समस्येमुळे उर्वरित काम करण्यास असमर्थता व्यक्त (मे २००८) केली. कंपनीने उर्वरित काम अद्यापपावेतो पुन्हा हाती घेतलेले नाही. (नोव्हेबर २००९)

अशा प्रकारे आयआयएल बरोबर कुठल्याही प्रकारची करारात्मक व्यवस्था (कॉंट्रॅक्चुअल ॲरेंजमेंट) न करता त्यांच्या सांगण्यावरुन अर्धवट सोडून दिलेले काम हाती घेतल्याने आयआयएलला

प्रवेश समस्या सोडविण्याच्या जबाबदारीतून अंग काढून घेता आले. परिणामी अपूर्ण कामावर केलेला रुपये ८.९९ कोटींचा खर्च निष्फळ ठरला.

व्यवस्थापनाने उत्तरांत सांगितले की (मे २००९) आयआयएलने प्रवेश समस्या सोडविण्याकामी स्वत: होऊन पुढाकार घेतला असल्याने त्यांच्याबरोबर कुठल्याही प्रकारचा कायदेशीर करार करण्याची आवश्यकता नव्हती. आयआयएल बरोबर औपचारिक करार नसल्यामुळे त्यांनी दिलेल्या तोंडी आश्वासनाकडे पाठ फिरवून देखील कंपनीला कायदेशीररित्या अंमलबजावणी करता येण्याजोग्या कराराच्या अभावी आपले हितसंबंध जपण्यात अपयश मिळाले, यांचा कंपनीच्या उत्तरांत उल्लेख नाही.

शिफारस करण्यात येते की, अंमलबजावणी करता न येणाऱ्या तसेच औपचारिक कायदेशीर न करता कुठलीही कामे कोणी स्वत:हून मदत देण्याचे कबूल केले तरी हाती घेऊ नये.

प्रकरण शासन / व्यवस्थापनाला (जून २००९) मध्ये कळविण्यात आले होते, त्यांची उत्तरे मिळाली नव्हती. (डिसेंबर, २००९)

१.२ विद्युत पारेषण कंपनीने स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण केले आहे.

दाभोळ ऊर्जा प्रकल्पातून निर्माण झालेल्या वीजेचे पारेषण करण्यासाठी तत्कालिन म.रा.वि.मंडळाने नागोठणे ते वडखळ २२० के.व्ही बहुपथ (Multi Circuit) वाहिनीचे काम ठराव क्र. ३९१, दि. ०८.०४.१९९३ अन्वये मंजूर केले. मेसर्स इस्पात इंडस्ट्रीज लि. ही कंपनी उपरोल्लेखित वाहिनीची प्रमुख लाभार्थी असून म.रा.वि.मंडळास मोठ्या प्रमाणांवर उत्पन्न देणारी कंपनी होती. म.रा.वि.मंडळाच्या विद्युत पुरवठ्याच्या नियमानुसार सर्विस लाईन चार्जेस (SLC) भरुन घेऊन वर उल्लेख केलेल्या वाहिनीवरुन विद्युत पुरवठा केला गेला. जरी सदर वाहिनीच्या कामाचे कंत्राट मेसर्स के.ई.सी.लिमिटेड यांना दिले गेले होते, स्थानिक नागरिकांच्या विरोध व प्रवेश समस्या (ROW) यामुळे मेसर्स के.ई.सी.लिमिटेड यांना काम थांबविणे भाग पडले. योग्य दाबाने विद्युत पुरवठा होण्यासाठी तसेच पारेषण प्रणालीत पूरक यंत्रणा राहण्याच्या हेतूने सदर वाहिनीचे काम होणे गरजेचे होते. त्यामुळे मेसर्स इस्पात इंडस्ट्रिज लि. ज्यांच्याकडून नियमानुसार सर्विस लाईन चार्जेस (SLC) घेऊन म.रा.वि.मंडळाने जमा करुन घेतले होते, अशा महत्त्वाच्या ग्राहकाच्या विना व्यत्यय विद्युत पुरवठा करण्याच्या हेतूने सदर बंद पडलेल्या कामाचा आढावा घेतला गेला. या पार्श्वभूमीवर प्रवेश समस्या (ROW) सोडविण्यासाठी काही बैठका घेतल्या गेल्या, ज्यामुळे ग्राहकाने (म्हणजेच मेसर्स इस्पात इंडस्ट्रीज लि.) प्रवेश समस्या (ROW) सोडविण्यासाठी पुढाकार घेतला (विना व्यत्यय पुरवठा व योग्य त्या विजेच्या दाबासाठी व काम चालू ठेवण्याचा आग्रह केला) ज्याअर्थी म.रा.वि.मंडळाने सर्विस लाईन चार्जेस (SLC) (रुपये २६.६३ कोटी) भरुन घेतले होते. त्याअर्थी विद्युत पुरवठादार संस्था म्हणून त्या भागातील विद्युत दाबात सुधारणा करणे, ही मंडळाची प्राथमिक जबाबदारी होती. त्याबरोबरीनेच मेसर्स इस्पात इंडस्ट्रीज लि.कंपनीने

म.रा.वि.मंडळासाठी २२० के.व्ही. वडखळ उपकेंद्राची उभारणी त्यांच्या खर्चाने (ज्या खर्चाचा परतावा म.रा.वि.मं. कडून बिन व्याजाच्या कर्जाच्या स्वरुपात परत केला जाणार होता.) केली. सदर काम हे इतर कामासहित संपूर्ण योजना लवकर पूर्ण व्हावे व म.रा.वि.मंडळास आर्थिक अडचणीवर मात करण्यासाठी केले गेले. त्यामुळे म.रा.वि.मंडळाने सदर वाहिनीचे काम मेसर्स रिचर्डसन ॲन्ड क्रूडास व त्यांचे सहयोगी मेसर्स अष्टविनायक कंन्स्ट्रक्शन यांना कामाच्या अंदाजित खर्च रु. ५.५४ कोटी ऐवजी रु. ८.८ कोटींना दिले. काम लवकर पूर्ण होण्याच्या दृष्टीने मेसर्स आय.आय.एल. (इस्पात इंडस्ट्रीज लि.) कंपनीने वर उल्लेखित अंदाजित खर्चापेक्षा जास्तीचे म्हणजे रु. ३.२६ कोटीचा भार उचलण्याचे ठरविले. यापैकी ग्राहकाने म्हणजे मे.आय.आय.एल. कंपनीने रु. २४५ कोटी अगोदरच भरले असून उर्वरित रु. ०.८१ कोटी रक्कमेची वसूली अलिकडे (मे २००९) मध्ये वडखळ उपकेंद्राच्या म.रा.वि.मंडळाच्या परताव्यातून करण्यात आली आहे. वर या अगोदरच म्हटल्याप्रमाणे, काम लवकर पूर्ण होण्यासाठी ग्राहकाने म्हणजेच मे.इस्पात इंडस्ट्रीज लि.म.रा.वि.मंडळाकरिता वडखळ उपकेंद्राचे काम १९९९-२००० मध्ये केले व उपकेंद्राच्या कामाचा खर्च रु. ९.६१ कोटी यांचा परतावा मे २००९ मध्ये रु. ०.८१ कोटी वजा करुन करण्यात आला. परंतु स्थानिक लोकांच्या विरोधामुळे दुसऱ्या कंत्राटदाराकडून सुध्दा काम पूर्ण होऊ शकले नाही. सदर योजनेतील कामे ही म.रा.वि.मंडळाची असल्याने प्रवेश समस्या (ROW) साठी ग्राहक म्हणजेच मे.इस्पात इंडस्ट्रीज लि. यांना जबाबदार धरता येणार नाही. म्हणून एक पारेषण संस्था म्हणूनच प्रवेश समस्या (ROW) सोडवणूक करणे, म.रा.वि.मंडळाची जबाबदारी असून ती कायद्याद्वारे खाजगी ग्राहकाकडे हस्तांतरीत होऊ शकत नसल्याने कायदेशीर औपचारिक करारनामा करण्याच्या प्रश्न उद्‌भवत नाही व तसा औपचारिक करारनामा ग्राहक म्हणजे मे.इस्पात इंडस्ट्रीज लि. यांना प्रवेश समस्या (ROW) सोडविण्यासाठीचा बंधनकारक करण्यात आला नाही. प्रवेश समस्या (ROW) सोडविण्यासाठीचा समझोता हे काम लवकर पूर्ण होण्याच्या हेतूने होता, जे काम विद्युत पारेषणात सुधारणा करणे, अन्यथा म.रा.वि.पा.कं.लि. (पूर्वीची म.रा.वि.मं.) यांना करणे बंधनकारक होते. मंडळाने प्रवेश समस्या (ROW) सोडविण्याचा बराच प्रयत्न केला, पण त्यात स्थानिकांच्या विरोधामुळे यश आले नाही.

मे.आय.आय.एल.कंपनीनेसुध्दा सदर प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार घेतला होता. विश्वसनीय व योग्य दाबाचा विद्युत पुरवठा करण्याच्या हेतूने या सर्व गोष्टी केल्या गेल्या. प्रवेश समस्या (ROW) सुटल्यानंतर त्वरित उर्वरित वाहिनीचे काम पूर्ण करण्यात आले असल्याने सदर झालेला खर्च हा निष्फळ ठरला नाही. सदर वाहिन्याच्या कामाच्या अपूर्णत्वामुळे इतर ग्राहकांच्या विद्युत पुरवठ्यावर परिणाम होत होता व त्यामुळे प्रवेश समस्या (ROW) व स्थानिक प्रश्न सोडविण्यासाठी सर्व प्रकारचे प्रयत्न केले गेले. नुकतीच महापारेषण कंपनीने योजनेच्या सुधारित खर्चास रु. ३१.४ कोटी यांस ठराव

क्र. ४५/४,

दि. ३०.०९.२००९ अन्वये मंजूरी दिली आहे. वरील सर्व पार्श्वभूमीवर असे लक्षात येते की, त्या भागातील विद्युत प्रणाली सुधारणेसाठी सर्व प्रकारचे प्रयत्न केले गेले. वर उल्लेख केल्याप्रमाणे उर्वरित रक्कम रु. ०.८१ कोटी हे वसूल केले गेले आहेत. वडखळ उपकेंद्राचे काम (१९९९-२०००) म.रा.वि.मं.साठी मे.इस्पात इंडस्ट्रीज लि.यांनी बिन व्याजी कर्जाच्या स्वरुपात स्वत:कडून खर्च करुन केले असल्याने त्यांच्याकडून एकूण वसूल केलेल्या रक्कमेवर व्याज लावण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. सदर बाबतीत मे.इस्पात इंडस्ट्रीज लि.यांचेबरोबर करारनामा न करण्याबद्दल स्पष्ट विवेचन वर दिलेले आहे. व तसे ग्राहकावर प्रवेश समस्या (ROW) सोडविण्यासाठी कायद्याने बंधनकारक करता येत नाही. त्यामुळे म.रा.वि.मंडळ असा करार करु शकत नव्हती. ज्यायोगे करारातील तरतूदीचा भंग होऊन सदर बाब कायदेशीरदृष्ट्या अमान्य ठरली असती. सर्विस लाईन चार्जेस (SLC) भरणा केल्यानंतर ग्राहकास जबाबदार धरता येऊ शकत नाही.

१.३ शासनाने महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीने सादर केलेल्या माहितीशी सहमती दर्शविली आहे.

१.४ वडखळ जि.रायगड याठिकाणी नागोठणे उपकेंद्र व वडखळ उपकेंद्रापर्यंत ४०० के.व्ही. विद्युत लाईन टाकण्याचे काम देतांना सदर विद्युत लाईनीसाठी मागणी केलेल्या इस्पात कंपनीबरोबर औपचारिक करारनामा न केल्यामुळे त्यावर झालेला खर्च निष्फळ गेला होता असा महालेखाकार यांनी आक्षेप नोंदविला होता. यासंबंधाने समितीने ऊर्जा विभागाचे सचिव व महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक यांची त्यांनी सादर केलेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने बुधवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०१३ रोजी साक्ष घेतली. महालेखाकारांनी उपस्थित केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने अधिक स्पष्टीकरण करण्याविषयी समितीने सांगितले असता, वीज पारेषण कंपनीचे संचालक (प्रकल्प) यांनी सांगितले की, यासंबंधात सन १९९३ मध्ये एमबीआर करुन तद्नंतर सदर कामासाठी प्रथम केईसी इंटरनॅशनल या कंपनीला लाईन टाकण्याचे काम देण्यात आले. सदर लाईन जाणाऱ्या भागातील शेतकऱ्यांनी विरोध दर्शविल्याने काम बंद पडले. काही कालावधीनंतर पुन्हा यासाठी निविदा काढण्यात आल्या व सदर निविदा ही ६८ टक्के जादा रकमेची होती. या वरील खर्चामध्ये मागणी केलेल्या इस्पात कंपनीने शेअर देण्याचे मान्य केले होते. मध्यंतरीच्या काळात सदर कंपनी जेएसडब्ल्यू या कंपनीने चालविण्यासाठी घेतली. जेएसडब्ल्यू कंपनीबरोबर यासंबंधात बैठक झाली असून त्यांना यासंबंधात फायदा होणार असल्याने त्यांनी सदर काम करण्याचे ठरविले आहे. अशी वस्तुस्थिती आहे. याबाबत प्रथम करण्यांत आलेला करार कशामुळे पूर्ण झाला नाही? असे समितीने विचारले असता, पारेषण कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालक यांनी सांगितले की, लाईन जाणाऱ्या भागातील शेतकऱ्यांनी विरोध

दर्शविल्यामुळे काम अर्धवट सोडण्यात आले. या मुद्याला जोडून अधिक स्पष्टीकरण करतांना संचालक (प्रकल्प) यांनी सांगितले की, इस्पात कंपनीने स्थानिक विरोध असल्यास आम्ही सहकार्य करु असे दर्शविले होते. परंतु, जनसामान्यांचा जास्त विरोध झाल्यामुळे काम अर्धवट स्थितीत राहिले. महालेखाकारांनी याबाबत इस्पात कंपनीबरोबर लेखी करार का केला नाही? असा आक्षेप नोंदविला होता. याबाबत स्थानिक लोकांच्या कामाच्या विरोधामुळेच काम अर्धवट स्थितीत राहिले. याबाबत समितीने असे निदर्शनास आणून दिले की, आत्तापर्यंत व यापूर्वी केलेल्या एकूण रकमेची वसुली झाली आहे काय? असे विचारले असता, पारेषण कंपनीचे मुख्य अभियंता यांनी सांगितले की, नागोठणे ते वडखळ यामध्ये ९३ टॉवर्स उभे करावयाचे होते. त्यातील ५६ टॉवर्सचे काम पूर्ण झाले आहे व ४४ टॉवर्स उभे केले असून त्यावर विद्युत वाहिन्या अजून बसविलेल्या नाहीत. ज्याठिकाणी इस्पात कंपनी आहे तेथील काम अजूनही अर्धवट आहे. या मुद्याला अधिक स्पष्टीकरण करतांना संचालक (प्रकल्प) यांनी सांगितले की, नवीन एमबीआर काढण्यात येऊन नवीन अंदाज करुन त्यादृष्टीने त्यांच्याकडून जादा रकमेची मागणी करणार आहोत. यासंबंधात असलेल्या यापूर्वीच्या अंदाजपत्रकानुसार एकूण ८.८० कोटीपैकी ५.५३ कोटी रुपये खर्च झाले असून उर्वरित रक्कम त्यांच्याकडून वसूल व्हावयाची आहे. परंतु, जेएसडब्ल्यू या तेथील जागेत स्थापित नवीन कंपनीने नव्याने मागणी केली असल्यामुळे त्यानुसार काम करावे लागणार आहे. स्थानिक लोकांचा असलेला विरोध दूर करण्याच्या दृष्टीने कार्यवाही सुरु आहे, असे स्पष्ट केले. हे काम केव्हापासून सुरु आहे? असे समितीने विचारले असता, संचालक (प्रकल्प) यांनी सांगितले की, सन १९९६ पासून सदर काम सुरु आहे. बंदचा कालावधी वगळता सन २००६ मध्ये देखील याबाबत सदर कंपनीकडून मागणी करण्यात आली होती. याबाबत त्यांच्याकडून मागणी प्राप्त झाल्यानंतर त्यासंबंधी आवश्यक ती रक्कम अदा केल्यानंतर साधारणत: एका वर्षात काम पूर्ण होऊ शकेल, असेही त्यांनी स्पष्ट केले. ज्या जमिनीवर टॉवर उभे केले जातात अशा मालकी हक्काच्या जमिनी मिळविण्यासाठी कोणती कारवाई केली जाते, असे समितीने विचारले असता, पारेषण कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालक यांनी सांगितले की, मार्गक्रमण करणाऱ्या प्रकल्पाच्या प्रस्तावातील जमीनधारकांना त्याची माहिती देण्यात येऊन तशाप्रकारची लेखी सूचना केली जाते. सन २०१० च्या शासन निर्णयानुसार तेथील रेडिरेकनरच्या दराप्रमाणे कोरडवाहू जमिनीसाठी २५ टक्के व बागायती जमिनीसाठी ५० टक्के रक्कम दिली जाते. जमिन संपादन न करता त्याची मालकी शेतकऱ्याकडे राहते. याबाबत समितीने असे निदर्शनास आणू दिले की, आपण टॉवर्स उभारलेल्या जमिनीचा शेतकऱ्यांना पुढील काळात उत्पन्नाच्या दृष्टीने काहीही उपयोग होत नसल्यामुळे सदर जमिनीबाबत शेतकऱ्यांना मोबदला देणे आवश्यक आहे याबाबत आपले काय मत आहे, असे विचारले असता, व्यवस्थापकीय संचालक यांनी सांगितले की, आपण सुचविलेल्या संकल्पनेनुसार सद्य:स्थितीत विभागीय पातळीवर

सचिव स्तरावर याबाबत चर्चा सुरु आहे. याबाबत जमिनीच्या अधिग्रहणासाठी त्याबद्दल वाढीव चटई क्षेत्र देणे किंवा काही सवलती देणे. त्यादृष्टीने विचार सुरु आहे. शहरी भागामध्ये नवीन लाईन प्रस्तापित करतांना जमीन मिळणे फार जिकीरीचे असते. ज्या भूखंडामधून लाईन प्रस्तावित होत असते त्या ठिकाणी कुठल्याही प्रकारच्या बांधकामास परवानगी दिली जात नसल्यामुळे सदर भूखंडाचे मिळकतीच्या दृष्टीकोनातून विचार होत असल्यामुळे यासंबंधी विरोध जास्त जाणवत आहे. यासाठीच विभागीय स्तरावर नवीन धोरण निश्चित करण्याच्या दृष्टीने कार्यवाही सुरु आहे. भारतातील केरळ व महाराष्ट्र या दोन राज्यामध्येच जमिनीचा मोबदला देण्याची पध्दत अवलंबिली जात आहे, असेही त्यांनी बैठकीच्या शेवटी स्पष्ट केले.

१.५ अभिप्राय व शिफारशी :-

वडखळ जि.रायगड याठिकाणी नागोठणे उपकेंद्र व वडखळ उपकेंद्रापर्यंत ४०० के.व्ही. विद्युत लाईन टाकण्याचे काम देतांना सदर विद्युत लाईनीसाठी मागणी केलेल्या इस्पात कंपनीबरोबर औपचारिक करारनामा न केल्यामुळे त्यावर झालेला खर्च निष्फळ गेला होता असा महालेखाकार यांनी आक्षेप नोंदविला होता. इस्पात या कंपनीने विद्युत पुरवठा प्रणालीमध्ये सुधारणा करुन जादा फायदा होत असल्यामुळे स्वखर्चाने यादृष्टीकोनातून उद्भणाऱ्या समस्या तसेच न्युनतम बोलीदाराने दिलेल्या अंदाजित खर्चापेक्षा जास्त खर्च करावा लागल्यास त्याची भरपाई करुन देण्यास मान्यता दिली होती व सदर चर्चेला लेखी स्वरुपाच्या करारामध्ये रुपांतर केले नव्हते. त्यामुळे यासंबंधीचे कामकाज सुरु झाल्यानंतर लोक विरोध झाल्यामुळे काम बंद करावे लागले व त्यामुळे झालेला खर्च निष्फळ वाया गेला, ही महालेखाकारांनी परिच्छेदाद्वारे विशद केलेली वस्तुस्थिती योग्य असल्याचेच समितीसमोर झालेल्या साक्षीवरुन स्पष्ट झाले आहे. सन १९९६ पासून सुरु असलेल्या या कामाची अद्यापही पूर्तता होऊ शकलेली नाही. सदर काम इस्पात कंपनीऐवजी नव्याने सदर जागेवर स्थापित झालेल्या जेएसडब्ल्यू या कंपनीकडून करण्याचे प्रस्तावित असून सदर काम त्यांनी मागणी केल्यानंतर व आवश्यक ते शुल्क भरल्यानंतर प्रत्यक्ष कामास सुरुवात झाल्यानंतर एक वर्षाच्या कालावधीत पूर्ण होईल, असे सांगितले गेले. हा प्रकल्प कार्यान्वित होण्यासाठी मुख्य अडचण विद्युत वाहक टॉवर्स उभारण्यासाठी लागणारी जागा उपलब्ध करुन देण्यामध्ये झालेला विरोध ही आहे. अधिग्रहीत केलेल्या जागेचा तद्नंतर उत्पन्नाच्या दृष्टीने वापरासाठी काहीही उपयोग होत नसल्याने यासंबंधी जनक्षोभ वाढत असल्याची ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली. तसेच समितीने प्रकल्प उभारावयाच्या जागेसंबंधाने तेथील मालकी हक्क असलेल्या जमिनधारकांस योग्य तो मोबदला मिळणे आवश्यक असल्याचे निदर्शनास आणले असता, सद्य:स्थितीत विभागीय स्तरावरील सचिव पातळीवर नवीन धोरण निश्चित करण्याची कार्यवाही सुरु असल्याचे सूचित केले आहे. **यासाठी समिती अशी शिफारस करीत आहे की, कुठलाही**

प्रकल्प कार्यान्वित करतांना त्या प्रकल्पासाठी लागणाऱ्या जमिनीचा जमीनधारकाला योग्य तो मोबदला मिळण्याच्या दृष्टीने विभागीय स्तरावर आखण्यात येणाऱ्या धोरणाला शासनस्तरावर मान्यता मिळवून त्याची अंमलबजावणी त्वरेने कशी करता येईल याची कार्यवाही विनाविलंब करण्यात यावी तसेच या परिच्छेदा संदर्भात शेतकऱ्यांनी प्रकल्पाला पर्यायाने टॉवर्स उभारणीला विरोध केला असल्याने शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने योग्य तो निर्णय घेऊन त्यांना आवश्यक तो मोबदला त्वरेने देऊन शेतकऱ्यांशी सामोपचाराने चर्चा करुन कार्यवाही करावी व करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्याच्या आत देण्यात यावी.

******

परिशिष्ट "एक"

विभागाकडून प्राप्त झालेली माहिती

परिशिष्ट "दोन"

(समितीच्या बैठकींचे संक्षिप्त कार्यवृत्त)

सार्वजनिक उपक्रम समितीची बैठक मंगळवार, दिनांक २५ सप्टेंबर, २०१२ रोजी विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली . बैठकीत खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

समिती प्रमुख

१) डॉ.कल्याण काळे, वि.स.स.

सदस्य

२) श्री.सुभाष धोटे, वि.स.स.

३) श्री.दिनानाथ पडोळे, वि.स.स.

४) श्री.शिरीषकुमार कोतवाल, वि.स.स.

५) श्री.संजय वाघचौरे, वि.स.स.

६) श्री.हनुमंत डोळस, वि.स.स.

७) ॲड.अशोक पवार, वि.स.स.

८) श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स.

९) श्री.महादेव बाबर, वि.स.स.

१०) श्री.वसंतराव गिते, वि.स.स.

११) श्रीमती अलका देसाई, वि.प.स.

१२) डॉ.दिपक सावंत, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

श्री. विलास आठवले, उप सचिव

महालेखाकार यांचे कार्यालय :

श्रीमती आर.राजलक्ष्मी, उप महालेखाकार

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी :

१. श्री.अजय मेहता, अतिरिक्त प्रधान सचिव (ऊर्जा) तथा व्यवस्थापकीय संचालक
२. श्री.दत्तात्रय वाव्हळ, संचालक (वित्त), महावितरण
३. श्री.मारुती देवरे, संचालक (संचालन), महावितरण
४. चंद्रकांत थोटवे, संचालक (संचालन), महावितरण
५. श्री.उत्तम झाल्टे, संचालक (संचालन), महाजनको
६. श्री.प्रताप मोहिते, संचालक (वित्त), महापारेषण
७. श्री.भगवान गडदे, मुख्य महाव्यवस्थापक (अलेप)
८. श्री.प्रभाकर देवरे, मुख्य अभियंता, पारेषण, पुणे
९. श्री.सिध्दार्थ नागटिळक, मुख्य अभियंता, महावितरण, पुणे
१०. श्री.नारायण बिघाणे, मुख्य अभियंता, महाजनको, मुंबई
११. श्री.अशोक चव्हाण, मुख्य अभियंता (महावितरण)

समितीने भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००७-२००८ च्या वाणिज्यिक अहवालातील "महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित" यांच्या परिच्छेदासंबंधात विभागीय सचिवांची तथा महामंडळाच्या प्रतिनिधींची साक्ष घेतली.

सार्वजनिक उपक्रम समितीची बैठक मंगळवार, दिनांक २९ जानेवारी, २०१३ रोजी विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली . बैठकीत खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

समिती प्रमुख

१) डॉ. कल्याण काळे, वि.स.स.

सदस्य

२) श्री.सुभाष धोटे, वि.स.स.
३) डॉ.राजेंद्र शिंगणे, वि.स.स.
४) श्री.योगेश सागर, वि.स.स.
५) श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स.
६) श्रीमती अलका देसाई, वि.प.स.

निमंत्रित

७) ॲड.आशिष शेलार, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

श्री. दिलीप येवला, अवर सचिव (समिती)

महालेखाकार यांचे कार्यालय, मुंबई :

श्री.पी.एन.शेषाद्री, महालेखाकार (वाणिज्यिक)

विभागीय प्रतिनिधी :

१. श्री.अजय मेहता, अतिरिक्त प्रधान सचिव (ऊर्जा) तथा व्यवस्थापकीय संचालक
२. श्री.अरविंद सिंह, व्यवस्थापकीय संचालक, पारेषण
३. श्री.दत्तात्रय वाव्हळ, संचालक (वित्त), महावितरण
४. श्री.प्रताप मोहिते, संचालक (वित्त), महापारेषण
५. श्री.मारुती देवरे, संचालक (संचालन), महावितरण

समितीने भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००८-२००९ च्या वाणिज्यिक अहवालातील "महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित" यांच्या परिच्छेदासंबंधात विभागीय सचिवांची तथा महामंडळाच्या प्रतिनिधींची साक्ष घेतली.

===ooo===

सार्वजनिक उपक्रम समितीची बैठक बुधवार, दिनांक ६ फेब्रुवारी, २०१३ रोजी विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली . बैठकीत खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

समिती प्रमुख

१) डॉ. कल्याण काळे, वि.स.स.

सदस्य

२) श्री.दिनानाथ पडोळे, वि.स.स.
३) श्री.शिरीषकुमार कोतवाल, वि.स.स.
४) डॉ.राजेंद्र शिंगणे, वि.स.स.
५) श्री.हनुमंत डोळस, वि.स.स.
६) श्री.योगेश सागर, वि.स.स.
७) श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स.
८) श्री.चिमणराव पाटील, वि.स.स.
९) डॉ.दिपक सावंत, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

१) श्री. विलास आठवले, उप सचिव,

२) श्री. दिलीप येवला, अवर सचिव (समिती)

महालेखाकार यांचे कार्यालय :

१) श्रीमती पुनम पांडे, प्रधान महालेखाकार, (ऑडिट-३)

२) श्री.वेंकटरमण, उप महालेखाकार

लघु व मध्यम उद्योग विभाग :

श्रीमती राधिका रस्तोगी, सचिव

महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ :

श्री.जे.पी.गुप्ता, व्यवस्थापकीय संचालक

महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ :

श्री.कुंदन पाटील, मुख्य प्रशासकीय अधिकारी

संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, मुंबई :

श्री.सदाशिव सं.बेनके, व्यवस्थापकीय संचालक

समितीने भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००५-२००६ व सन २००६-२००७ च्या वाणिज्यिक अहवालातील "महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ" यांच्या परिच्छेदासंबंधात विभागीय सचिवांची तथा महामंडळाच्या प्रतिनिधींची साक्ष घेतली.

===ooo===

सार्वजनिक उपक्रम समितीची बैठक बुधवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०१३ रोजी विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली . बैठकीत खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

समिती प्रमुख

१) डॉ. कल्याण काळे, वि.स.स.

सदस्य

२) श्री.सुभाष धोटे, वि.स.स.
३) डॉ.राजेंद्र शिंगणे, वि.स.स.
४) श्री.संजय वाघचौरे, वि.स.स.
५) श्री.हनुमंत डोळस, वि.स.स.
६) श्री.विकास कुंभारे, वि.स.स.
७) श्री.योगेश सागर, वि.स.स.
८) श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स.
९) श्री.चिमणराव पाटील, वि.स.स.
१०) श्री.संजय दत्त, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

१) श्री. विलास आठवले, उप सचिव,

२) श्री.दिलीप येवला, अवर सचिव (समिती)

महालेखाकार यांचे कार्यालय :

१. श्री.आर.वेंकटरमन, उप महालेखाकार

२. श्री. एस.व्ही. खेडकर, वरिष्ठ लेखा परीक्षा अधिकारी

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी :

श्री.अजय मेहता, अतिरिक्त प्रधान सचिव (ऊर्जा) तथा व्यवस्थापकीय संचालक

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी :

१. श्री.अरविंद सिंह, व्यवस्थापकीय संचालक
२. श्री.प्रताप मोहिते, संचालक (वित्त), महापारेषण
३. श्री.उत्तम झाल्टे, संचालक (संचालन), महाजनको
४. श्री.ओमप्रकाश एम्पाल, संचालक (प्रकल्प)
५. श्री.रवींद्र चव्हाण, मुख्य अभियंता (प्रकल्प)
६. श्री.आर.सुरेश, मुख्य अभियंता
७. श्री.संतोष आंबेरकर, मुख्य महाव्यवस्थापक (वित्त व लेखा)

समितीने भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००८-२००९ च्या वाणिज्यिक अहवालातील "महाराष्ट्र राज्य वीज पारेषण कंपनी मर्यादित" यांच्या परिच्छेदासंबंधात विभागीय सचिवांची तथा महामंडळाच्या प्रतिनिधींची साक्ष घेतली.

===ooo===

सार्वजनिक उपक्रम समितीची बैठक गुरुवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०१३ रोजी विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली . बैठकीत खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

समिती प्रमुख

१) श्री.योगेश सागर, कार्यकारी समिती प्रमुख

सदस्य

२) श्री.सुभाष धोटे, वि.स.स.
३) श्री.दिनानाथ पडोळे, वि.स.स.
४) डॉ.राजेंद्र शिंगणे, वि.स.स.
५) श्री.चिमणराव पाटील, वि.स.स.
६) श्री.संजय सतिशचंद्र दत्त, वि.प.स.
७) श्रीमती अलका देसाई, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

१) श्री. विलास आठवले, उप सचिव,

२) श्री. दिलीप येवला, अवर सचिव (समिती)

महालेखाकार यांचे कार्यालय :

१. श्री.आर.वेंकटरमन, उप महालेखाकार

२. श्री.एस.व्ही.खेडकर, वरिष्ठ लेखा परीक्षा अधिकारी

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित :

१) श्री.अजय मेहता, अतिरिक्त प्रधान सचिव (ऊर्जा) तथा व्यवस्थापकीय संचालक,

२) श्री.चंद्रकांत थोटवे, व्यवस्थापकीय संचालक

समितीने भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००७-२००८ च्या वाणिज्यिक अहवालातील "महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित" यांच्या परिच्छेदासंबंधात विभागीय सचिवांची तथा महामंडळाच्या प्रतिनिधींची साक्ष घेतली.

===ooo===

सार्वजनिक उपक्रम समितीची बैठक मंगळवार, दिनांक ९ एप्रिल, २०१३ रोजी विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली . बैठकीत खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

समिती प्रमुख

१) डॉ. कल्याण काळे, वि.स.स.

सदस्य

२) श्री.संग्राम थोपटे, वि.स.स.
३) श्री.सुभाष धोटे, वि.स.स.
४) श्री.दिनानाथ पडोळे, वि.स.स.
५) श्री.पंकज भुजबळ, वि.स.स.
६) श्री.संजय वाघचौरे, वि.स.स.
७) श्री.हनुमंत डोळस, वि.स.स.
८) ॲड.अशोक पवार, वि.स.स.
९) श्री.योगेश सागर, वि.स.स.
१०) श्री.चिमणराव पाटील, वि.स.स.
११) श्री.वसंतराव गिते, वि.स.स.
१२) श्री.संजय दत्त, वि.प.स.
१३) श्रीमती अलका देसाई, वि.प.स.
१४) श्री.राजेंद्र जैन, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

१) श्री. विलास आठवले, उप सचिव,

२) श्री. दिलीप येवला, अवर सचिव (समिती)

समितीने प्रारुप अहवालाच्या मसुद्यांवर विचार करून तो काही सुधारणांसह संमत केला.